साल अखेर „ ७ „ १ ८८

किरकोळ अंकास..................................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस ............८१ ८६

दुसरे खेपेस ............ ८

Six monthly......... 3 ...... ... ....„ 8 as

Single copy ............... ...... ... 4 as

Advertisement.

Below 10 lines ... 2 Rs

Per line over 10 ... 4 as.

Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY 2 NOVEMBER 1896 — NO 43

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख २ माहे नोवेंबर सन १८९६ इ० — अंक ४३



## जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याचा बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातीत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent


## नोटीस

गिरजी भर्द नारायण सोनार राहणार नांदूरा ईस नारायण वल्लद सखाराम सोनार राहणार नांदूरा ह्या नाटिसीनें असें कळवितों कीं, तूं मजला ता० १७।१०।९६ ची नोटीस दिली ती पावली नोटीशींत लिहिलेला मजकूर अगदीं खोटा आहे. तूं माझी गंधर्वाची बायको आहेस तूं च्यार गैरसीत लोकांच्या सांगणे वरून हे फंद चालविले आहेस तर ह्यात तुझें कोणच्याही प्रकारानें कल्याण नाहीं. हे तुजला अगोदर कळविलें आहे तर नोटीस पावल्या पासून दिवस २ चे आंत माझे जवळ येऊन राहावे. असें झाले नाहीं तर तुजला ताब्यात घेणें बदल काम चालवून ताब्यांत घेतली जाईल. मी तुजला सोड चीठी दिली नाहीं व देणार नाहीं सर्व प्रकारानें रीत सीर तुजला वागविण्यास तयार आहे. तुझ्या निवा भावास व अन्न वस्त्राबद्दल सर्व प्रकारानें योग्य बंदोबस्त आहे. हे तुजला कळावें. तादरी लिहीले प्रमाणें झाले नाहीं तर सरकारात काम चालविले जाईल. म्हणून दिली नोटीस सही तारीख २६ माहे आक्टोबर सन १८९६ इसवी

सही

सहीची निशाणी हातोडी नारायण वल्लद सखाराम सोनार राहणार नांदूरा याच्या हातची असें.

## पत्रव्यवहार

दारव्हा २६।१०।९६

रा० रा० वऱ्हाडसमाचा पत्र कर्ते यांस—

वि० वि० येत्या अंकीं खालील मजकुरास जागा मिळेल ही आशा आहे.

दारव्हे मराठी शाळची वार्षीक परिक्षा संपून तारीख २० अक्टोबर या दिवशीं मे० डे० कमिशनर साहेब जि० वर्णा यांचे हस्ते बक्षिस समारंभ झाला. या वेळेस तहशिलदार, पेस्कार, पोष्टाचे इन्स्पेक्टर वगैरे प्रमुख मंडळी असून शिवाय हा थाट पहाण्यास गांवांतील सुमार २०० मंडळी होती. डे० कमिशनर साहेब यांचे आभार कविताबद्ध भाषेनें येथील विद्यार्थ्यांनीं प्रदर्शित केले. येथील शाळेची व्यवस्था चांगलीं, व मास्तर साळ स्वभावाचे असल्याबद्दलचे कित्येका संभाषणातून उद्गार निघाले व अध्यक्षांनीं " ही शाळा चांगले स्थितींत आहे " असा शेरा दिला शाळा चांगल्या स्थितींस ठेवणें हेंच मास्तरास भुषणास्पद आहे. या गांवचे मानानें बक्षिस समारंभ बऱ्याच थाटानें झाला.

येथील क्लार्क बळवंत रामचंद्र शिंपी यांची बदली पांढरकवडा येथें झाली. व पांढरकवडा येथील क्लार्क येथें आले. दारव्हे येथील क्लार्क येथें ९।१० वर्षे होते याच्या बदलीमुळें यांच्या सारख्या मित्र मंडळीस फार वाईट वाटतें.

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन वद्य १२ शके १८१८

हिंदुस्थानांत कंपनीची कल्पना अनुकरणानें आली आहे आणि तिचा फैलाव उत्तरोत्तर होत आहे ही मोठि आनंदाची गोष्ट होय. इंडियांतील कंपन्यांचा वार्षिक रिपोर्ट १८९५-९६ सालाचा प्रसिद्ध झाला आहे त्यांतील माहितीवरून आपला देश या कामीं किती पुढें सरसावला आहे याचि अटकळ सहजीं होईल आपल्या देशांत मोठी उणीव ही आहे कीं लक्षावधि रुपये भांडवल लागणार यांत्रिक कारखाने, आगबोटी तयार करण्याच्या गोद्या किंवा धातूच, व कांचेचे वगैरे कारखाने किंवा अशाच प्रकारचीं प्रचंड यंत्रालयें हीं अजून निघत नाहींत; अथवा त्यांच्या उभारण्याची अवश्यकता न वाटल्यामुळें भांडवल एकत्र जमत नाहीं अगर भांडवल न उभारतां आल्यामुळें यंत्रालयें अस्तित्वांत येत नाहींत ही दुर्दशा नाहींशी होण्यास उपाय एवढाच कीं आपल्या देशाच्या गरजा देशी मालावर भागविल्या गेल्या पाहिजेत ह्मणजे युक्तीप्रयुक्तीनें देशांत निरनिराळे कारखाने सुरू होतील. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व आमच्या देशाला लागू करून विलायतची जी दुकानदारी या देशांत चालविली आहे तिच्यामुळें आमचा देश सफै बुडाला आहे. या गोष्टीचा प्रतिकार होईल अशी इंडियन लोकांच्या प्रगतीला दिशा लागली पाहिजे.

सध्यां इंडियांत १३०९ मंडळया असून त्यांचें सांकेतिक भांडवल ४१.८९,१४,४७० रुपयांचें आहे यापैकीं मंडळयाच्या कामानिमित्त भागिनदारांकडून २९,३८,७२,७९० रुपये भांडवल वसूल करण्यांत आलें आहे. १८९५-९६ सालीं नवीन मंडळया १६८ निघाल्या असून त्यांचें वसूल केलेलें भांडवल ८९,९८,१४० रुपये होतें पण ६२ मंडळया बंद झाल्यामुळें ९५,१४,५४० रुपयांचें भांडवल व्यापारांतून नाहींसें झालें हें असमाधानीस कारण आहे; तथापि कांहीं १४१ मंडळ्यांनीं आपल्या कार्याच्या महत्वामुळें १,८८,६२,१२० रुपये भांडवल नवीन वसूल करून उपयोगांत आणिलें हें चांगलें झालें दोन तीन वर्षांत मंडळ्यांची संख्या वाढली आहे पण बंगाल्यांत किरकोळ भांडवलाच्या मंडळ्या पुष्कळ निघाल्या आहेत. १८९३ पासून अशा १७९ मंडळ्या निघाल्या आहेत. ऋणशोधफंड, टीन-गृह-निर्माण-सहाय-संभिती, कृषि-सहाय-भांडार इत्यादि नामाभिधानाच्या मंडळ्या निघाल्या तशा संततीच्या लग्नादि कार्यांच्या प्रसंगीं पैसा मिळावा ह्मणून आगाऊ पैसा भरण्याच्या विमा मंडळ्याही निघाल्या. या क्षुद्र मंडळ्या मध्यें, लोक फार फसतात आणि त्यांची फसवणूक होऊं नये ह्मणून कंपनीचा कायदा सक्तीनें अमलांत आणण्या विषयीं व्हाईसराय साहेबांची सूचना आहे. मुंबई इलाख्यांत मंडळ्या कमी पण भांडवल मोठें आहे. याच्या उलट स्थिती बंगाल्यांत आहे. कंपनी लिमिटेड केली ह्मणजे तिच्या भागिदारांवर कंपनीच्या भांडवला पेक्षां अधीक व्यक्तिविषयक जबाबदारी पडत नाहीं ह्मणून मद्रास व म्हैसूर या प्रांतीं सामान्य व्यापारी लोकांनीं देखील आपापल्या कंपन्या नोंदवून घेतल्या आहेत. ही हकीकत कांहीं चांगलीशी नाहीं किंवा देशी कारखान्यांच्या भरभराटीची खूण नाहीं.

व्यांक व पेढी मिळून २९७ आहेत आणि त्यांचें वसूल केलेलें भांडवल ४२,४,९७,२१० रुपये आहे. विमा उतरणाऱ्या कंपनीचें भांडवल ८,२९,०१० रुपये आहे असें दिसतें. आगगाड्या, आगबोटी, व्यापार इत्यादिकामध्यें सरासरीनें कंपन्यांतून ४,०९,९८,१२० रुपयांचें भांडवल खेळतें आहे. गिरण्या, फ्याक्टरी वगैरे मधून १३,६८,७७,९९० रुपयांचें भांडवल गुंतलेलें आहे आणि सध्यां हेच कारखाने उदयास आले आहेत.

---

टुना नांवाची आगबोट सोमाली किनाऱ्या नजिक बुडाली आणि त्या वरील सर्व उतारूं व माल समुद्रास अर्पण झाला. ही आगबोट एडन व बारबारा यांच्या दरम्यान जाणारी होणारी होती. चार पांच पार्शी गृहस्थ व एक बाई अशीं माणसें उतारूं मध्यें होतीं तीं बुडून मरण पावलीं. या आगबोटी संबंधानें कच्ची हकीकत अद्याप कळली नाहीं पण प्राणहानी मोठी आहे असें ह्मणतात. ईश्वरीक्षोभा पुढें कोणाचें चालत नाहीं!

---

नागपूरच्या ' देशसेवका ' मध्यें श्रीमान धर्माभिमानी लोकांस एक विनंति करण्यांत आली आहे कीं हल्लीं मिशनरी लोकांनीं अन्नदानाच्या आमिषानें जीं मुलें बाळें व स्त्री-पुरुषहीं येशूच्या जाळ्यांत ओढलीं आहेत व पुढें ओढली जातील त्यांच्या संरक्षणा एक अन्नछत्र घाला; नाहीं तर अन्नाकरितां दीन लोक भडाभड धर्मभ्रष्ट होत आहेत. खरोखर ही सूचना सर्वांनीं आपापल्या शक्ती प्रमाणें अमलांत आणिली पाहिजे. पाद्री भटांच्या कृतीचा प्रतिकार तर झालाच पाहिजे. त्यांच्या दानधर्माला आह्मी नांवें ठेवीत नाहीं पण त्या दानधर्माच्या अंतीं ते जो विषाचा प्याला पुढें करितात ता फेंकून देण्यासाठीं आमची सर्व इंडियनांस प्रार्थना आहे. वंचकाचें परिवंचन करण्यात दोष नसतो ह्मणून आह्मी दुसरी एक गोष्ट सूचवितों. कीं जे दुष्काळामध्यें धर्मभ्रष्ट होतील त्यांस स्वल्प प्रायश्चित्तानें पुन्हा स्वधर्मांत तलें जावें.

---

सरकारच्या साऱ्या सारखें जबरदस्त ऋण दुनियेंत कोणतेंच नाहीं सावकारी कर्जाला नादारिगाचा दाखला हा रामबाण उपाय आहे परंतु सरकारच्या साऱ्यापासून मुक्तता कोणत्याही कंत्राटानें होण्या सारखी नाहीं सर्व कर्जामध्यें सरकारी साऱ्याला प्राधान्य आहे आहे आणि दिवाणी व माजी स्टेटी सरकारच्याच वरची असल्यामुळें सरकारच्या साऱ्याचा वसूल तत्काळ होतो. ज्या कुळाकडे सारा थकतो तें कुळ सर्व जमीन

निर्भय आहे आणि त्याला कोणाचेंच देणें घेणें लागूं नाहीं. सरकारी सारा थकला ह्मणजे प्रजा निर्धन झाली इतकेंच नाहीं तर साऱ्याच्या कराचा जुलूम पर काष्ठेला पोचला असें बिनहरकत समजावें मुल्की रिपोर्टांतील पुष्कळ गोष्टी वरील विधानांची सत्यता स्थापित करितील.

---

राज्यक्रांतीच्या चक्रा खालीं हिंदुस्थान देश चिरडून चालला होता अशा वेळीं इंग्रजी राज्य स्थापित झाल्यामुळें या देशाचे मोठे फायदे झाले आहेत. देशांत स्वस्थता व शांतता झाली आणि तदनुसधानानें सर्वत्र सुबत्ता व आबादानी झाली. इंग्रजी राज्याची थोरवी मोठी आहे पण हें परकीय राष्ट्र इंडियांत सत्ताधारी असल्यामुळें इंडियाचे सांपत्तिक झरे या देशांत उगम पावून सर्व विलायतेंत निरनिराळ्या मुखांनीं एकत्र होतात आणि त्या सर्वांचा प्रवाह विलायतभर जोरानें व झपाट्यानें खेळत असतो. राजयक्ष्म्यानें मनुष्य जसा हळू हळू क्षीण होऊन अखेर निस्तेज होतो व शेवटीं त्यांतच त्याचा अंत होतो तद्वत परकी राष्ट्राची सत्ता इंडियाच्या संपत्तीला झुरणीला लावीत आहे आणि परिणामीं या देशाची स्थिती हीन, दळिद्री व परवश होईल याचीं दुष्ट स्वप्नें अलिकडे चांगलीं पडूं लागलीं आहेत. इंग्रजी कायदे व राजनिती यांच्या अंमलाखाली जी दशा या देशाला येत चालली आहे ती बुद्धिपुरस्सर राज्यकर्त्यांनीं आणिली असें आमचें ह्मणणें नाहीं. पण हल्लींच्या राजकीय कारणमालेचा निश्चित परिणाम निदान वाईट होत आहे असें अलिकडे बहुतेक विद्वानांच्या लक्षांत येऊन चुकलें आहे. परकीय राज्यकर्त्यांचा हा दोष कदाचित नसेल आणि एतद्देशीय लोकांच्या कृतींचाच हा परिणाम असेल तथापि सांप्रतची दरिद्रावस्था राज्यकर्त्यांस व प्रजेस हितावह नसून अनिष्टकारक आहे आणि ती तशीच दुणावत चालली तर कसे भयंकर परिणाम ओढवतील याची कल्पना देखील स्थिर चित्तानें होत नाहीं.

कदाचित वरील विचार एकपक्षीय वाटून त्यावर आक्षेप कित्येक घेतील अशी आह्मांस ही भिती असत. पण आपलें विधान सत्याला धरून आहे आणि त्रयस्थांसही या देशाची स्थिति आपल्या ह्मणण्याप्रमाणें खरोखर तशीच वाटते असें कळलें ह्मणजे एका प्रकारें आल्हाद वाटतो. रशियाच्या झारचे राजपुत्र हिंदुस्थानात आले होते ही गोष्ट आमच्या वाचकांच्या लक्षात असेलच. त्यावेळीं त्यांनीं प्रत्यक्ष दर्शनानें येथील लोकस्थितीची चांगली ओळख करून घेतली तेव्हां इंग्रजी वर्तमान पत्रांतून इंडियन राष्ट्राची सांपत्तिक भरभराट वाचण्यांत येत होती तिच्या खरेपणाविषयीं त्यांची उत्तम खात्री झाली. आशिया खंडातील प्रवासाच्या वर्णनामध्यें झार साहेबांनीं आपले अभिप्राय नमूद केले आहेत त्यापैकीं एक अभिप्राय हिंदुस्थानच्या सद्यास्थिती संबंधानें आहे तो राज्यकर्त्यांनीं चांगला मनन करण्यासारखा असून प्रजेनें देखील त्यांत दर्शविलेल्या स्थितीचा प्रतिकार करण्याचा बोध घेण्यासारखा आहे. झार साहेबांनीं काढलेलें देशस्थितीचें चित्र आमच्या विचार सृष्टींतल्या चित्राशीं कितपत तंतोतंत जुळतें हें पाहण्याचें काम आह्मी वाचकावरच सोपवितों.

झार साहेब लिहितात कीं:—

"पूर्वी रयतेपासून वाटेल तसा पैसा पुष्कळवेळां जुलमानें वसूल करीत असत पण तो सर्व पैसा हिंदुस्थानांतच रहात असे. सांप्रत सरकारचे कर बाह्यदृष्ट्या कमी दिसतात आणि सरकारची दयाद्रताही दिसून पडते तरी देशाची संपदा हळूं हळूं क्षय पावत आहे किंवा ती परकी राष्ट्रांत जात चालली आहे. आणि त्यामुळें या परतंत्र प्राच्य देशाचें जीवनात्मक रक्त शोषून परकी राष्ट्रें आपल्या कारागिरीच्या निरर्थक वस्तूंनीं हा देश ओतप्रोत भरून टाकीत आहेत आणि नेटिवांची सांपत्तिक भरभराट बुडाशींच खणून काढीत आहेत. हे नेटिव लोक वर वर पाहाणाऱ्यास सुखी व समाधानवृत्तीचे दिसतात आणि त्यांचे आपसांतील तंटे ही मोड या सारखे दिसतात ही गोष्ट दृष्टांतानें स्पष्ट होते. बडोद्याचे गायकवाड सरकार हे हल्लीं पेक्षां ज्या वेळीं अधिक स्वतंत्र होते तेव्हां ८० हजार पौंड किंमतीचे रेशिम व कपडा अमदाबाद पेठेंतील दरसाल विकत नेत होते परंतु या मराठी संस्थानाचा अपकर्ष होऊं लागला तेव्हांपासून गुजराथेच्या व्यापारांचा आश्रय सुटत चालला तो इतका कीं कांहीं उत्तम कारागिरांस बिलकूल काम मिळेनासें झालें किंवा काम मिळालें तरी तें हलक्या रोजींचें असते."

---

## दुष्काळ

पाऊस बिलकूल नाहीं ह्मणून लोकांचीं मनें त्रस्त व उद्विग्न आहेत. पाऊस आठदहा दिवसांत येईल अशीं चिन्हें दिसत नाहींत. निराशा उत्तरोत्तर दुणावत आहे आणि दुष्काळाचें पाऊल जलदीचें व पुढें पुढें आहे. दुष्काळाचें भयंकर स्वरूप निदर्शनास येत चाललें आहे आणि भावी स्थिती किती कष्टमय व नाशप्रद होणार याची कल्पना देखील करण्यास मनाचा धीर सुटतो. लोकांची स्थिती अगोदरच शोचनीय झाली आहे आणि तशांत ईश्वरी अवकृपेचा फेरा एकवेळ फिरला ह्मणजे सर्वत्र प्रजेच्या झुंडी अन्नासाठीं गायाबाया करिताना दिसूं लागतील. ही गोष्ट भविष्यकालीन देखील नाहीं तर तिचा अनुभव प्रस्तुत काळींच येत चालला आहे.

दुष्काळाच्या प्रारंभींच फार मोठा प्रजासमूह विपत्तीनें ग्रासून गेला आहे. त्यांच्या परिपालनार्थ कांहीं मोलमजुरीचीं कामें काढलीं पाहिजेत अशी स्थानिक सरकारची खात्री लवकरच झाली हें दुःखांत सुख होय. धान्याचा पुरवठा मुबलक होण्याचा संभव पुष्कळ आहे प्रांतांतच धान्याचा जो सांठा आहे त्याला द्वीपान्तरावरील आलेल्या धान्याची भर मोठी पडेल. पण महर्गतेमुळें तें धान्य बहुत लोकांस असून नसून सारखेंच आहे. मोलमजूरीचीं कामें भक्कम निघालीं आणि लोकांची रोजी चालूं झाली तर घट्टेकट्टे, लोक उपासमारीच्या प्रसंगीं कसेबसे दिवस कंठू शकतील. बाकीच्या माणसांचा हवाला परमेश्वरावर! सरकार मार्फत कांहीं योजना होणार असल्याचें घाटत आहे आणि त्या प्रमाणें कांहीं कामें दुष्काळानें पीडलेल्या लोका निमित्त लवकर सुरू झालीं तर खरोखर मोठा उपयोग होईल. लांबणीवर हीं कामें टाकण्यास आतां सवड नाहीं. वऱ्हाड प्रांताची शिल्लक ४०।५० लक्ष रुपये आहे तेव्हां दुष्काळाच्या प्रसंगीं ही शिल्लक लोकोपयोगार्थ खर्चली तर त्यांत कांहीं अन्याय होणार नाहीं असें आह्मी समजतों.

गरीब लोका साठीं ह्मणून गांवोगांव जी दुकानें निघालीं आहेत तीं सध्यां आजचा काल उद्यावर लोटीत आहेत श्रीमान व उदार लोकांच्या कृपेनें व आश्रयानें हीं दुकानें चालली आहेत. पण त्यांस राजाश्रय बिलकूल नसावा हें मोठें नवल होय. राजाश्रया शिवाय अशीं मोठमोठीं धर्मकृत्यें निभणार नाहींत. गरीब लोकांस मजूरीचीं कामें दिलीं पाहिजेत आणि मजूरीच्या मानानें योग्य भावांत त्यांस विकत मिळालें पाहिजे ही गोष्ट जितपत तडीस जाईल त्या मानानें सरकाराच्या हातून प्रजेचें प्राणसंरक्षण होईल. प्रजारक्षण हा राजधर्म आहे पण आमचा प्रांत मुलूख अमानी असल्यामुळें त्या राजधर्माच्या इलाख्यांत तो आला नाहीं असें नामदार वुडबर्न यांच्या भाषणांत वऱ्हाडाचा नामनिर्देशही नव्हता त्या वरून वाटतें. धर्मार्थ धान्याचीं दुकानें सरकारी पैशाच्या बलावर चाललीं तर लोकांच्या दानश्रेणीला भरती येईल आणि गरिबासाठीं काढलेलीं दुकानें पद्धतशीर व कायमपणें चालतील. वऱ्हाडच्या उत्पन्नांतून जर लक्षावधि रुपये शिल्लक राहिलेली आहे तर ते निदान लोककाजाकडे खर्चण्यास ट्रस्टी जें ब्रिटिश सरकार त्यानें माघार घेऊं नये.

---

इंडियाच्या राज्यकारभाराचा खर्च सर्व राष्ट्रामध्यें मोठा प्रचंड आहे. कुबेरनगरीला कृपण, हव्याशी, व परकी राजानें लुटीच्या आशेनें जसा गराडा द्यावा व सर्व नगरी फस्त करावी तद्वत् स्थिती राज्यकारभाराच्या खर्चाच्या मिषानें आमच्या देशाची ब्रिटिश राज्याखालीं झाली आहे. न कळतां अग्नीवर पाय पडला तरी दाह होण्याचें चुकत नाहीं त्या प्रमाणें ब्रिटिश राज्यकारभारांत जो खर्चाचा अग्नी प्रदीप्त आहे तो सर्व भस्म करील तर तें कांहीं नवल नाहीं.

अशा दिवाळखोरीच्या इंडियन राज्यकारभारांत वऱ्हाड प्रांताच्या राज्यकारभारानें खर्चाच्या बाबतींत कळसच केला आहे. या प्रांतांतील खर्चाच्या अवाढव्यते बद्दल पायोनिअर सारखीं वर्तमानपत्रें देखील साक्ष देऊं लागलीं आहेत ही गोष्ट मोठी आश्चर्याची पण समाधानीची आहे.

वऱ्हाड प्रांत परत निजाम सरकारास देण्याची गोष्टच काढूं नये असा सरकारी बंत दिसतो. पण निदान, धर्मन्यायानें वऱ्हाडी प्रजेचा समाचार सरकारनें घेतला पाहिजे ह्मणून आह्मी, वारंवार ओरड करीत असतो. पण सरकारच्या बधिरपणाला आमच्याजवळ उपाय नाहीं. रयत ह्मणजे सरकारची कामधेनु आहे. ती जो पर्यंत दुध देतें तोंपर्यंत तिचें दोहन करणें राजधर्माला अनुसरून आहे पण सारा वगैरे वाढवून अनेक करांच्या द्वारांनीं रयतेची नागवणूक व ओढाताण केली तर त्यापासून सरकारास भूषणास्पद किताब कोणी देणार नाहीं. लक्षावधि रुपये शिल्लक रहात असतांना देखील जमिनीवरील सारा दिढीनें वाढविला ही गोष्ट अगदीं राजनीतीस प्रतिकूळ आहे. पण सरकारी सत्ते पुढें शहाणपण चालत नाहीं. खर्च कमी करावा, करांचा बोजा हलका करावा, आणि प्रजेस आबादानींत ठेवावें ही आमच्या देशाची जुनी राजनीती आहे पण ती सध्यांच्या कालांत ब्रिटिश सरकारानें निरुपयोगी ठरविली आहे.

---

गेल्या गुरुवारीं आसामांतील तेजपूर जिल्ह्यांत पावसानें कल्लोळ उसळून दिला. २४ तासांत १३ इंच पाऊस पडला. सर्वत्र पाणीच पाणी होऊन नासधूसही मोठी झाली. असाच पाऊस आमच्या या दुष्काळपीडित प्रांतांत पाठविण्याचा ईश्वरी संकेत होईल तर खरोखर लोकांचें पुण्य फळास आलें असें होईल.

---

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 2 1896

Our subscribers will, we hope, allow us the usual Dewali Holidays which they have hitherto done ungrudgingly As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 9th. current.

---

It is a matter of great satisfaction to note that the Berar Commission is being gradually recruited with graduates in the executive branches of the administration. About a year back Mr. G. W. Bapat B. A. LL. B. High Court pleader was appointed a Tehsildar at Mehkar. This year Mr. Azimmuddin B. A. Hindustani Deputy Educational Inspector, has been nominated to the Tehsil of Ellichpur It is thickly rumoured that Mr. K. P. Bhat B. A. LL. B. pleader is to act as Tehsildar in the Basim District. The gentlemen named above are all good and very promising. Sooner or later they may have to serve in Judicial line which requires an efficient staff of men of legal training and practical good sense. Messrs Bapat and Bhat being both graduates in Law, are well fitted to administer it. The most gratifying circumstance regarding these two gentlemen is that they both owe their entire education to Berar. Bred and cherished on the Berar soil and educated at Berar's costs they are bound to serve Berar gratefully and willingly. They have accordingly offered their services to the Berar Government and the people of Berar have to exult in their nominations to high offices. Berar feels proud of these men and earnestly hopes that the very high expectations formed of them will be fully realized in due course of time. Such nominations serve the Administrative purposes in more ways than one. The executive body is being strengthened with competent men. The confidence of the Berar people is secured by the fact that the very men whom they would desire most to attend to their wants and needs, are being secured in the Commission.

Nagpur 29th October 96

The impending calamity of the disastrous famine which had hitherto-fore been restricted to the North West Provinces and the Jubbulpore and Saugor side alone of the C. Ps. and which till lately was hovering over the out skirts of these Provinces, has presently succeeded in making an entrance, nay it is now predominent even in the very heart thereof. The whole of the country has assumed a fearful aspect. The insufficiency or rather the irregular downpour of rain and the consequent failure of crops, of the rice crop especially, chiefly constitute the reasons that led to the scarcity and dearth of food. The exportation of corn to provinces where there are greater signs of famine, and the unfortunate riots of the last month can also, with some truth, be attributed to have aided this scarcity. The merchants dare not take their stores out and this results in the considerable extent of the sale. The erelong anticipated famine has put a spoke in the wheels of the laboring classes who have no work, there being little possibility of their obtaining any as there is very little demand for it. People in hundreds are dying of starvation. The surrounding villages are sending off numbers of the poor and the city roads and lanes are every day crowded with the famine—stricken and starving beggars. Children are found dying on the roads uncared for, unclaimed and left to their fate. Instances are not wanting to prove that some have thrown themselves into wells, preferring death rather than the unbearable hardship of starvation and destitution. The helplessness and the pangs of the miserable wretched struggle for existence have become too serious to be connived at any longer and have at last succeeded in invoking the feelings of mercy lying dormant in the hearts of the well—to—do gentlemen, who, out of humanity, have opened poor—houses and orphanages—a thing truly creditable to them. But also it is a matter of regret that unless some substantial help from Government is forth—comming, there is every likelihood of the shops being closed in their very infancy. Blessed we are that robberies, dacoities, plunders, murders and the like have not yet begun their work; but in case these good—measures collapse for want of an adequate and timely help from Government undoubtedly people will have no other alternative left them and there will be disorder reigning all over the land! So to obviate all this and in public interest we fervently desire that influencial persons will at once represent the matter to Government and ask for its help, which it is ever prepared to lend on well—grounded requests. The officers will, we fully believe, not turn a deaf ear to the cravings of their subordinates, especially the menial class, for compensation allowances. Lastly and of most importance, we trust that the Government, in its turn, will not hesitate, at such a crisis, to render every possible help and thus realize, to the word the truth of the saying "Under Her Majesty's rule there is justice and *Mercy*."

Sympathiser.

## वऱ्हाड

सुट्टी—पुढील आठवड्यांत दिपवाळीचा मोठा उत्सव असल्यामुळें पुढील सोमवारचा वऱ्हाडसमाचाराचा अंक निघणार नाहीं

रा. रा. नारायण गोविंद डोर्ले, नायब तहाशिलदार, पुसद हे वारल्यामुळें त्यांच्या जागीं उमरावतीचे आफि० नायब तहाशिदार यांस कायम करण्यांत आलें.

वऱ्हाड-शिक्षक समाजाची चालू सालची बैठक येत्या १८ वे तारखे पासून आकोल्यास भरणार आहे

मि० ए० सी० करी नांवाचे गृहस्थांस वऱ्हाडांत असिस्टंट कमिशनर वर्ग ३ नेमण्यांत आल्यांची जाहिरांत इंडिया-ग्याझेटांत आहे. खर्च करण्याचा नामी उपाय!

राव साहेब सितारास विश्वनाथ पटवर्धन हे गुण पा तांच पारितोषक तत्काळ देतात उदाहरणार्थ, शेगांवचे विद्यार्थी अकोला हायस्कूलचे प्रवेश परिक्षेचे वेळीं राव साहेबांच्या परीक्षेला चागले उतरले. लागलींच १० रुपये दरमहाची बढती शगांवचे हेडमास्तर रा० रा० पुरुषोत्तम विष्णु जोगदंड बी० ए० यांस गेल्या महिन्या पासून देण्यांत आली.

रा. रा. कृष्णराव हरी कोल्हटकर एक्स्ट्रा असि. कमिशनर, मलकापूर यांस अर्धांगवायूच्या विकृतीनें हैराण केलें आहे. औषधोपचारासाठीं उमरावतीस गेलें असून ते एक वर्षाची फर्लो रजा घेणार आहेत. ईश्वर करो आणि राजश्री दाजी साहेव यांच्या प्रकृतीस लवकर चांगला आराम पडो!

उमरावतीच्या 'प्रमोदसिंधू' वरून कळतें कीं क्याप्टन हार्सबरो असि. कमिशनर उमरावती हे रजेवर गेल्यामुळें मि. माडविट यांनीं त्यांच्या कोर्टाचा चार्ज घेतला.

रा० रा० शेषाचिलम मुदलियार, तहशीलदार, वाशिम यांनीं पेनशन घेतल्यामुळें त्यांच्या जागीं वाशिमास रा० रा० कृष्णराव पुरुषोत्तम भट बी० ए० एल० एल० बी० यांस तहशीलदार नेमिलें.

रा० रा० विष्णु हरी जोशी तहशीलदार इलिचपूर यांस बडतर्फ केल्या मुळें त्यांच्या जागीं मि. अजिमुद्दीन साहेब बी० ए० हिंदुस्थानीं इनस्पेक्टर, वऱ्हाड यांस तहशिलदार नेमिलें.

पुसद, ता० २८।१०।९६

हवामान— पावसाची आतां बहुतेक निराशाच झाल्यासारखें आहे. उष्मा अतिशय होत असून थंडीचें नांव नाहीं. खरीपाचीं पिकें खराबलीं व रब्बीचें पीक होईलस दिसत नाहीं. धान्याचे संग्रहाचे मानानें ह्या भागांत पुढील वर्षापुरतें धान्य आहे परंतु व्यापारी लोकांच्या अति तृष्णेमुळें आजच दुष्काळ येऊन ठेवला आहे. धान्याचे भाव मनस्वी वाढल्यामुळें बरीच चळवळ होऊन गरीब लोक पोटा करितां दिवसा दरोडे घालूं लागले आहत व अशा रीतीनें प्रत्येकाचे जीवित व संपत्ति धोक्यांत, आहेत. सरकार या वेळींच कांहीं उपाय करील तर बरें.

येऊन गेले— या तालुक्यांत शेंबाळपिंपरी येथें तेथील कांहीं लोकांनीं भर दिवसा एका मारवाड्याचा कोठा उघडून आंतील धान्य नेलें ह्या गुन्ह्याची चौकशी करण्या करितां मे० एडवर्ड साहेब येथें आले होते. चौकशी करून परत गेले.

सार्वजनिक धान्याचें दुकान—थोडे दिवसांपूर्वी येथील बाजारांत व्यापाऱ्यांनीं धान्य न आणल्यामुळें गिऱ्हाईकांचा बराच जमाव मे० तहसिलदार साहेबांकडे गेला होता तेव्हां त्यांनीं स्वतां बाजारांत जाऊन चालू भावानें सर्वांत धान्य देवविलें व लागलींच सर्व व्यापारी मंडळी एकत्र जमवून सुमारें २० खंडी धान्य गोळा करून त्याचे विक्री करितां एक दुकान घातलें आहे. ह्या दुकानामुळें गरीब लोकांस धान्य मिळण्याची अडचण राहिली नाहीं. मात्र रोजचा भाव व्यापाऱ्यांचे हातीं ठेविल्यामुळें त्यापासून गरिब लोकांस कांहीं फायदा होत नाहीं ह्या कामांत आमचे येथील लोकप्रिय तहशीलदार मि० विठूजी नारायण यांनीं फक्त सामोपचार योजून शांतता राखिली ह्याबद्दल प्रत्येक जण त्याचा आभारी आहे.

श्री बाळासाहेबांचे—देवालय बांधण्याचें काम सुरू आहे.

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९५ रुपय |
| जवारी | ८२-८५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | १०५ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ७।⁝ मण |
| सोनें | २६ तोळ |
| चांदी | ८८ |

नोटीस

रा. रा. बाबूजी जगन्नाथ या नांवचे दुकानचे मालक बाबूजी वलद सखाराम मयत वारीस पुत्र नारायणराव व. बाबूजी व जगन्नाथ वल्लद सर्वेइराम दुकान अकोलें वस्ती खैसांग यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येत कीं तुमच्या कडेस खात्यावरून वसूल वजा जाता बाकी घेणें रुपये ३७९ व व्याज कटमितीचे मानानें दरमहा दरशेंकडा १ रुपया प्रमाणें रुपये १६०१ एकूण रुपये ३९१४१ घेणें निघत आहे त्याजबद्दल आपणास अकोलें दुकानीं असतांना मागणें केलें व आपण केबूल केलें असून उलगडा करीत नाहीं हें बरोबर नाहीं. करितां ही नोटीस पावल्यापासून दोन दिवसाचे आंत आमचे दुकानीं येऊन या नोटीशीचे खर्चीसुद्धां रुपये चुकेत देऊन रसीद घेणें असें न केल्यास रीतिप्रमाणें तजवीज करून खर्चीसुद्धां रुपये घेण्याची तजवीज केली जाईल. हें आपणास कळावें ता ३१ अक्टोबर सन १८९६ इसवी.

( सही ) जानकीदास गंगाधर अज्ञान
पालन करणार इष्टमित्र या नात्यानें
लक्ष्मीचंद जेनारायण तर्फे मुखत्यार जैराम बळवंत दुकान
अकोलें दस्तुर खुद.

नोटीस

रा. रा. हरीराम आनंदराम या नांवाचें दुकानेच मालक शीवबक्ष सुरजमल दुकान ताजनापेठ अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमचेकडून ताजनापेठेंतील चालू पैकीं दुकान २ भाड्यानें आहेत त्याचें भाडें मिति कार्तीक शुद्ध १ ते मिती आश्विन वद्य ३० संमत १९६२ पावेतों माहे १३ चे रुपये २२७॥ घेणें व गुदस्त सालचें खातें बाकी बद्दल रु- ७७॥।-। एकूण रुपये ३०५।-। देणें त्यांत किरकोळ वसूल रुपये ११५॥ आला तो वजा जातां बाकी रुपये १८९॥।-। तुमचे कडेस घेणें निघत असून तुमचेवर रुपये ९७ चा आकडा शेख चांद वल्लद हाजी अमीर ताजनापेठकर याचा केला तो तुह्मी स्विकारला नाहीं. तो आकडा परत केला. सबब नोटीस देणें भाग झाले. तरी आतां ही नोटिस पावल्या पासून दोन २ दिवसाचे आत आमचे रुपये चुकते करून पावती घेणें व आमचीं दुकानें कार्तिक शुद्ध १ संमत १९५३ रोजीं खालीं करून देणें या प्रमाणें न केल्यास रुपयाबद्दल रीतीं प्रमाणें तजवीज करून या नोटीशीचें खर्चीसुद्धां वसूल करण्याची तजवीज केली जाईल. व पुढील सालचा किराया दोन्ही दुकानांचा एक वर्षाचा रुपये ३०० प्रमाणें घेतलें जातील हें आपणास कबूल असल्यास राहावे नाहीं पेक्षां सदहूं लिहिल्या प्रमाणें रुपये देऊन दुकान खालीं करून दावी कळावे. तारीख ३१ माहे अक्टोबर सन १८९६ इसवी.

( सही ) जानकीदास गंगाधर आज्ञान
पालनकरणार इ० मित्र या
नात्याने लखमीचंद जैनारायण
तर्फे मुक्त्यार जैराम बळवंत
दुकान अकोलें द. खु.

नमुना नं १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्लास १९ मिसल नंबर $\frac{९}{९६}$

वि० सिवील ज्यडज्य साहेब जिल्हां अकोला यांचे कोर्टात.

नांव---- पृथ्वीगीर

बापाचे नांव—हरीगीर गोसावी

राहणार—हल्लीं आकोला तालुके आकोला

जिल्हा—अकोला यांस मयत

हरीगीर सेकंड ग्रेड ओव्हर सियर राहणार आकोला तालुके आकोला जिल्हां अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यानीं तारीख २१ माहे ११ सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जीची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकिकत दाखल करावी.

तारीख ३० माहे १० सन १८९६ इसवी.

Sheikh Ismail
सिव्हील जडज

## वर्तमानसार.

महाराणी सरकारांनीं आपली रत्नखचित प्रतिमा तयार करून ती चीनच्या बादशहास प्रेमादरानें नजराणा पाठविण्याचा विचार केला आहे.

कोण हा निर्लज्यपणा—बडोदें येथील शिरदी बक्षीकडील एक मुसलमान शिपायी गेल्या शनिवारीं दिवसां ३ वाजतां आपल्या मित्रमंडळींत पैज मारून कांहीं द्रव्याच्या आशेनें रावपुऱ्यांतील खर्ची कराचे खाऱ्यापासून लहरीपूर दरवाज्यापर्यंत रहादारीचे भर रस्त्यांतून नागवा गेला व नागवा आला! न्या- सु.

एका शास्त्रवेत्त्याचें असें ह्मणणें आहे कीं, मनुष्य जेव्हां झोपतो तेव्हां त्याची सर्व इंद्रियें एकदम झोंपीं जात नाहींत तर प्रथम डोळ्यांच्या पापण्या, नंतर जीभ, नंतर नाक, नंतर कान, व सर्वांच्या मागून स्पर्शेन्द्रिय. या स्पर्शेन्द्रियास सर्वांपेक्षां कमी झोंप पुरें होते आणि तें सर्वांत लवकर जागें होतें.

आइर्लंड देशांतील बायकांस म्युनिसिपालिटींत मत देण्याचा पूर्ण अधिकार आहे व तेथें बायकांच्या संबंधाचा कांहीं प्रश्न कायदे करणाऱ्या मंडळी पुढें निघाल्यास त्यांच्या जाहीर सभाही भरतात.

निजामच्या राज्यांतील कोणत्याहि ब्रिटिश पोष्टांत येत्या जानेवारीच्या पहिल्या तारखेनंतर इंग्लिश नाण्याशिवाय इतर नाणें घेतलें जाणार नाहीं अशी मंद्रासचे पोस्टमास्तर जनरलनें नोटीस काढली आहे.

बजबज येथे एक हिंदु गृहस्थाचें कुटुंब आहे त्या कुटुंबांत ७०० मनुष्यें आहेत! ही कुटुंबाची सगळी माणसें आनंदानें व गोडीगुलाबीनें एकत्र रहातात. ह्या काळांत तर भाऊ भाऊ एकमेकांचीं शेंडी धरावयास धावतात, असें असून हा एक चमत्कार आहे. व्य.०

उत्तर हिंदुस्थानांतील रल्वेवरील २ स्त्रियांवर स्टेशनमास्तर व पोलीस यांजकडून बळात्कार झाले. या बाबतींत एक सभा स्थापन होऊन थेटपावेतों पल्ला पोंचविण्याचें काम केल्यावांचून हें बंड मोडणार नाहीं. आ० व०

सौथ आस्ट्रेलियांतीलही पिकें अवषर्णामुळें अनी गेलीं.

युरोपियन ख्रिस्ती राष्ट्रांच्या गुरगुरण्यामुळें तुर्कस्थानच्या सुलतान साहेबांनींही लढाईची तयारी चालविली आहे.

उत्तर हिंदुस्थानांत एकही जिल्हा असा नाहीं कीं, तेथें दुष्काळ पडल्यावांचून राहिला आहे.

बिहारचे श्रीमान मुसलमान गृहस्थ मयत मौलवी अबदुल अझीझ यांच्या विधवा बिबी सुग्रा ह्यांनीं आपली सगळी दौलत मुसलमान धर्माचा प्रसार करण्याकरितां व स्वधर्मीतील लोकांस शिक्षण देण्याकरितां अर्पण केली! सगळी दौलत ह्मणजे बरोबर ४० लाख रुपयांची आहे.

आकाशांत वारो फिरत असल्या ह्मणजे त्या गांवीं पटकी उपद्रव वगैरे नाहीं असें समजावें, असें एका विज्ञानी गृहस्थानें प्रसिद्ध केलें आहे.

ही ईश्वर करणीच ह्मणावयाची:—यावर्षी कोणासही सुखी ठेवावयाचें नाहीं असा ईश्वरी नियम दिसतो. काळाच्या दाढेंतून जर कोणी सर्पिणीच्या गर्ताप्रमाणें निसटून गेला तर त्यावर अन्य तऱ्हेनें संकट ओढवावयाचें. असें पुढील उदाहरणावरून दिसतें. यावल पेठ्यांत कुंभारखेडें नांवाचें एक खेडें आहे. पर्जन्याचे कमतरतेमुळें इतर ठिकाणांप्रमाणेंच तेथीलही पिकांची दुर्दशाच आहे. तथापि एका बाजूची जमीन चांगली भारी असल्यानें समारें ९ शेतांतील पिकें फार नामी स्थितींत असून त्यांना पावसाची गरजही पण नव्हती. शेतांचे धनी मनाचे मांडे खाऊं लागले. परंतु ईश्वरी इच्छाच वेगळी. मागील आठवड्यांत सायकाळचे वेळी एकाएकीं एक ढग यऊन नेमक्या त्या ९ शेतांतच फार मोठ्या जोरानें गारांची वृष्टी झाली. त्या योगानें फळ व फुल सर्व झडून जाऊन निव्वळ काड्या उभ्या राहिल्या! क. त.

धान्याचा पुरवठा—सिंधप्रांतानें आजकाळ धान्याच्या पुरवठ्याचे संबंधानें मुंबई इलाख्याला चांगला हात दिला आहे सिंधेंतील हजारों खंडी गहूं कराची येथून विलायतेस जात असतात; परंतु हल्लीं ते तिकडे न जातां त्यांची वाहाणी मुंबईस लागली आहे अलिकडे कराचीहून तांदुळ सुधां मुंबईस बरेच येतात; अशा रीतीनें कराचीच्या धान्यानें मुंबईचा रस्ता धरल्यामुळें विलायतेशीं व्यापार करणाऱ्या तेथील कांहीं इंग्लिश व्यापाऱ्यांनीं धान्याच्या ऐवजीं उंटें पाठविण्याचा धंदा योजिला आहे असें कराचीच्या तारेवरून समजतें. हिंदुस्थानांत चोहोंकडून धान्यांचा पुष्कळ पुरवठा होण्यासाठीं बाहेरून येणाऱ्या धान्यावरील जकात उठविण्याचा विचारही सरकारांत चाल यांचें ऐकण्यांत येतें. मुंबईस तांदुळ गोणींचा भाव थोडा उतरल्याची बातमी आहे. बाहेरून धान्याचा पुरवठा अशा रीतीनें होत गेला तर "हल्लीच्या दुष्काळास सहज जिंकितां येईल" अशा अर्थाचे ज उद्गार नाम० उढबर्न साहेबांनीं कायदे कौन्सिलांत काढिले आहेत, ते खरे होऊं शकतील.

कलादगी—येथील खाजगी पत्रावरून कळतें कीं—दुष्काळामुळें लोक घरेंदारें सोडून हैसूर, धारवाडाकडे जात आहेत. गुरांस वैरण नाहीं यामुळें मोठाल्या किंमतीचीं गुरें रुपया दोन रुपयांस भराभर देऊन टाकीत आहेत. प्रसंग कठीण आहे.

एक काना चुकल्यानें झालेला घोटाळा—दुर्भगाचें महाराजांनीं पुण्याहून नाशिकच्या तीर्थोपाध्यांस पत्र पाठविलें होतें कीं—"दोसो ब्राह्मनकु भोजदेव" (दोनशें ब्राह्मणांस भोजन घाला); परंतु भोज शब्दांतील एक काना चुकून त्या ठिकाणीं भेज (पाठवा) असा अर्थ पत्रांत झाल्यामुळें उपाध्यांनीं २०० ब्राह्मण पुण्याचीं तिकिटें काढून गाडींतून रवाना करून त्याप्रमाणें तार दिली! ही तार पोंचल्यावर कान्याची चूक झाली असें महाराजांस उमगून त्यानीं लागलींच खऱ्या अर्थाची तार दिली. ती वाटेंत कल्याण स्टेशनावर पोंचल्यामुळें २०० भट तेथून नाशकास परत आले!!

गोव्यांत काथ्याचे कारखाने सुरूं करण्याची परवानगी मुंबईतील एका पोर्तुगीज व्यापाऱ्यानें २९ वर्षांच्या मुदतीनें घतली आहे. स. शो.

रशिया देशांत स्मोलेन्स्क नांवाचें एक लहानसें संस्थान आहे त्याचें क्षेत्रफळ सुमारें २९ मैल असून तेवढ्या त्या टापुंत बरींच खेडीं आहेत. या संस्थानास स्त्रीराज्य ह्मणतात. याचें कारण येथील सर्व पुरुष उन्हाळ्याच्या सुमारास जवळच्या शहरांत मजुरीचीं कामें करण्यास जातात. अर्थातच सर्व खेड्यांतील एकंदर व्यवस्था--शेतकाम, घरकाम व सार्वजनिक काम, हीं सर्व कामें स्त्रीयांच्याच हातीं राहतात. गांवकाम करण्यास त्यांची सभा जमते, व तिची अध्यक्षीण आपलें काम फार सुव्यवस्थित रीतीनें करिते, या संस्थानांची राजकीय व सांपत्तिक स्थिति फार चांगली आहे असें ह्मणतात. क०

दुष्काळग्रस्त लोकांस कामावर लावण्याकरितां तुमच्या प्रांतांत रेलवेचे नवे रस्त कोणकोणते करण्या सारखे आहत ते कळवा ह्मणजे गरजेप्रमाणें एकेका रस्त्याचें काम सुरू करण्यांत येईल असें नार्थवेस्ट व पंजाब या प्रांतांच्या सरकारास हिंदुस्थान सरकारानें कळविलें आहे.

येत्या महिन्यांत अमेरिकेंतला पुष्कळ गहूं हिंदुस्थानांत येऊन दाखल होईल अशी अटकळ आहे आणि कलकत्यास ९ शेर व दिल्लीस १० शेर याप्रमाणें गव्हाचा भाव होण्याचा रंग आहे; तरी दुःखाची गोष्ट आहे कीं, रशियांतल्या गव्हाच्या विकास यंदा बराच हिसका बसला आहे असें सांगतात.

भिल लोकांस रिझर्व फॉरेस्टांतून फुकट गवत आणण्यास खानदेशच्या कलेक्टरानें मोकळीक दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

आमचे हत्यारांचे जुने परवाने पुन्हा बदलून द्या अशा बद्दल बरद्वान जिल्ह्यांतल्या १२,३९८ लोकांनीं अधिकाऱ्याकडे अर्ज केले व त्यांतील १७४ लोकांस मात्र परवाने देण्याचें नाकारलें.

हल्लीं कलकत्याचा व्यापार वाढत असून यांत कलकत्यास कापडाची खरेदी जास्त होत आहे असें सांगतात.

बिहार येथें नुकताच एक दंगा झाला व त्यांत तेथील सब डिव्हिजनल माजिस्ट्रेटासही चांगला ठोक मिळाला. झाडांस टिळे लावण्याचा प्रकार याच प्रांतांत सुरू झाला होता व या एकंदरीवरून तिकडच्या लोकांत नाखुषी वाढत आहे असें ह्मणतात.

डार्डनल खाडीवर हल्लीं टर्कीच्या सुलतानाची मालकी आहे आणि त्याच्या परवानगीवांचून त्यांत कोणाही परकीय राजास आपलीं लढाऊ गलबतें त्यांत घालतां येत नाहीं असा नियम आहे. इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्यांत हल्लीं असा विचार चालू आहे कीं, सुलतानाच्या सुरक्षितपणाची हमी घेऊन त्यांत पाहिजे त्यास लढाऊ गलबतें घालण्याचा अधिकार आहे असें करावें.

टर्की लढाईची तयारी करावयास लागून त्याकरितां नवा कर बसवून पैसा जमा करूं लागला आहे.

इंग्लंडानें सैप्रस बेट सोडून द्यावें आणि टर्कीच्या प्रकरणांत युरोपियन राजांचें मत आपल्यास अनुकूल करून घेण्याकरितां इजिप्त देशही सोडून द्यावा असें पार्लमेंट मेंबर मि. कोर्टनें यांचें ह्मणणें आहे. सैप्रस सोडावें पण इजिप्त सोडूं नये असें डेलीन्युजचें ह्मणणें आहे. अ. द.

एका नामांकित इंग्लिश गृहस्थानें हिंदुस्थानांत सरकारी हुद्याच्या मोठमोठ्या जागा चालवून आतां पेनशन घेतलें आहे, त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, इंग्लंडांतल्या एखाद्या भिकार गांवांतल्या भिकारी लोकांचा अर्ज पार्लमेंटांत आला असतां त्याची जी दाद लागते, ती दाद, हिंदुस्थानांतल्या मोठमोठ्या लक्षावधि लोकांनीं केल्या अर्जास पार्लमेंटांत मिळत नाहीं, हें अगदीं खरें आहे. पण तें बरें नाहीं इंग्लंडा या हातून ही एक मोठी चूक होत आहे. हिचें प्रायःश्चित्त, इंग्लंडाचें कांहीं एक नुकसान न होतां. नुसत्या चटकानें मिळावें, असें त्या गृहस्थाचें ह्मणणें आहे. पण तें कसें व्हावें कोण जाणे. पश्चात्तापाशिवाय खरें प्रायःश्चित्त होत नसतें. इं प्र.

एक गावढळ मनुष्य शहरांतील एका श्रीमंत गृहस्थाच्या घरीं दोन दिवस गेला होता. तो आपल्या खेड्यांत परत आल्यानंतर आपल्या स्नेह्यांस तेथली हालहवाल सांगूं लागला. सांगतां सांगतां ह्मणतो, "अहो, सगळ्या गोष्टी झाल्या पण अतिशय विलक्षण आहे ती ऐकाल तर आश्चर्यानें अगदीं गुंगच व्हाल, त्यांच्या घरीं एका कोपऱ्यांत एक लहानशी पेटी आहे, तींत एक काळेंसें जनावर घालून ठेविलेलें आहे. जें जनावर घालून ठेवलेलें आहे. तें जनावर गाण्यांत मोठें पटाईत आहे. जेव्हां कुणाला त्याचें गाणें ऐकायचें असेल तेव्हां तो खुर्ची घेऊन त्या पेटीजवळ जातो व पेटी उघडून त्याला उठवून उभें करितो, उठून उभें राहताच तें आ लें तोंड उघडतें, पण गायला सुरुवात करीत नाहीं. मग हा गृहस्थ त्याच्या शेपटावर पाय देऊन त्याच्या त्या पांढऱ्या शुभ्र दातांवर बोटें मारतो, इतकें करण्या बरोबर तें बेटं गायला लागतें- गाणें पण किती सुंदर असतें ह्मणून सांगूं? इतका सगळा त्याला त्रास दिला तें कधीं कोणाला चावत नाहीं, कीं ओरबडीत नाहीं. आपल्याला त्याचें गाणें नको असलें कीं पुन्हा त्याला खालीं बसवितात ते आपण होऊन कधीं उठत नाहीं व हालत नाहीं, जात नाहीं, येत नाहीं, आपले सदोदित पेटींत बसून राहतें." करमणूक.

एका मनुष्यानें सकाळीं आपल्या मुलीचें एका इसमाबरोबर लग्न लावून त्याच रात्रीं तिचें पुन्हां दुसऱ्या एका मनुष्याबरोबर लग्न लाविलें ही गोष्ट दोन्ही मनुष्यांस आधीं समजली नाहीं. दुसऱ्यानें लग्न लाविलेल्या मनुष्यापासून बापानें पुष्कळ पैसे घेतले- ही गोष्ट पुढें उघडकीस येऊन त्या मनुष्यानें आपणास मुद्दाम फसविलें ह्मणून त्या मुलीच्या बापावर अलीपूरच्या डे० माजिस्ट्रेटाकडे फिर्याद केली आहे- निकाल काय होईल तो पहावा- आ० व०

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास.......................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ..........०१ ०६
दुसरे खेपेस .... ........ ०

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 ae 5
Six monthly......... 3 ...... ... ...,, 8 as
Single copy ............... ...... ... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXX AKOLA MONDAY 16 NOVEMBER 1896 NO 44

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १६ माहे नोवेंबर सन १८९६ इ० अंक ४४

नमुना नं १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यांनें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्लास १९ मिसल नंबर १०/९६

वि० सिवील ज्यडज्य साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव---- गणू
बापाचे नांव—झालोजी
राहणार—ताजनापूर तालुके आकोला
जिल्हा—अकोला यांस मयत

कृष्णाजी बापाचे नांव शेकोजी राहणार ताजनापूर तालुके आकोला जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २८ माहे ११ सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जीची चौकशीं होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १० माहे ११ सन १८९६ इसवी.

Sheikh Ismail
सिव्हील जडज्य

---

नोटीस

मेहरबान चेअरमन, सेक्रेटरी, व ट्रेझरर, ऑफ "धी आकोला नेटिव्ह कॉटन जिनिंग प्रेसिंग आणि स्पिनिंग कंपनी," यांस—

बदरी नारायण धनराज बलदवा--राहणार आकोला. अर्जदार

इंडियन कंपनीज् आक्ट नंबर ६ सन १८८२ चा कलम २९ अन्वयें.

मी अर्ज कारितों कीं वरील कंपनींत माझ्या मालकीचे व माझ्या नांवानें १६ शेअर्स आहेत ते मी तारीख २४ अक्टोबर सन १८९६ इसवी रोजीं केशरीमल रिदकरण साहू दुकान ज्याहनाबाद; बऱ्हाणपूर यांस फरोक्त करून दिले आहेत तर ते १६ शेअर्स सदर्हू केशरीमल रिदकरण साहू यांच्या नांवानें बदलून त्यांचें नांव मेंबरांच्या रजिस्टरांत शेरिक करावें. ही विनंती तारीख ११ नोवेंबर सन १८९६ इसवी.

सही
बदरीनारायण धनराज मारवाडी दस्तुर खुद्द.

---

नोटीस

मुक्ती मर्द सूर्यभान थेराट हल्लीं राहणार पळशीसुपो तालुके जळगांव इस नोटीस देणार तुळशी मर्द दामाजी पांडे राहणार मानेगाव नोटीशीनें असें कळवितें कीं तूं आमची भावजय आहेस आमचा भाऊ सूर्यभान थेराट हा गयत होऊन अजमासें एक वर्ष झालें. सूर्यभान याची स्थावर जंगम इस्टेट आहे ती--बैलजोडी अजमासे रुपेये (१००) ची दागदागीने रुपये (१००) चे, दोन तिफणेंचे वावर, व राहतें घर धांबे खांब १५ चें व इतर जिनगी आहे. तूं दुसरा घरठाव करणार आहेस व त्याच्या अगोदर सदरील जिनगी तूं विकणार आहेस असें पक्कें समजलें आहे. तर सदरहू जिनगी विंकणें किंवा कोणत्याही प्रकारची जिनगीची व्यवस्था करणें काडीइतका हक्क तुझा नाहीं. दुसरा घरठाव न करितां सूर्यभान थेराट याचे नांवावर तूं मरेपर्यंत राहिलीस तर सदरहू जिनगी बद्दल आमचे कांहीं विचारणें नाहीं आणे तसें झालें नाहींतर तुजवर फिर्याद करून जिनगी सर्व भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस सही. तारीख १० माहे नावेंबर सन १८९६ इसवी.

सही
सहीची निशाणी बांगडीची तुळशी मर्द दामा पांडे राहणार मानेगांव दस्तुर केशव यादव पटवारी राहणार इसापूर तालुके खामगांव.

---

ज्याहीरात.

सर्वत्र लोकांस तुळसी मर्द दामाजी पांडे राहाणार मानेगांव तालुके जळगांव.

असें ज्याहीर करिते कीं, मुक्ती मर्द सुर्यभान थोराट राहाणार मालगांव ही माझी भावजई आहे. सूर्यभान हा माझा लहाना भाऊ मयत जाहाला त्यास अजमासे बारा महिने जाहाले. माझे भावाची स्थावर जंगम जिनगी आहे ती बैल जोडी अंदाज कींमत रुपये १०० दागीनें रुपये १०० वावर तीफण २ दोनचे व राहाते घर पंधरा खांबाचे धाबे अशी जिनगी आहे. मुक्ती ही दुसरा घरठाव करणार आहे. तर सदरी लिहिलेले इस्टेट किंवा त्यातील कोणचा ही भाग कोणीही माझ्या संमती शिवाय गाहाण किंवा विकत घेईल तर सदरील जिनगी किंवा मी कोणच्याही प्रकारानें जबाबदार नाही. मुक्ती इने दुसरा घरठाव न करीता सदरील जिनगी वगैरे घेऊन सूर्यभान याच्या नांवावर मरे पर्यंत आनंदानें रावें. म्हणजे सदरील जिनगी बद्दल आमचे कांहीं ह्मणणें नाहीं हें सर्वत्रांस कळावें ह्मणून ही जाहिरात सही ता० १० माहे नोवेंबर सन १८९६ इसवी.

सही
सहीची निशाणी बांगडी तुळशी मर्द दामा पांडे राहणार माणेगांव दस्तुर पटवारी खुद्द केशव यादव राहणार इसापूर जळगांव.

---

NOTICE

Notice is here by given that at an adjourned Special General Meeting of the Akola Municipal Committee held at Akola on the 26th day of October 1896 a resolution was passed proposing the imposition, through-out the area within the Municipal limits except ward No. III ( Civil station ) of a scavenging tax under section 42 of the Berar Municipal law 1886.

The discription of property to be taxed, the rate and system of assessment proposed to be adopted will appear from the rules herewith printed.

Any inhabitant within the Municipal limits objecting to the proposed imposition will do so in writing within 30 days from the date of publication here of.

Dated Akola 12 November 1896 } Shankar Govind Secretary M. Committee Akola.

SCAVENGING TAX

I The area within the Municipal limits shall for the purpose of these rules, be divided into such circles as the Committee may from time to time consider desirable.

2 Each circle shall be placed in charge of a beat peon whose duty it will be to see that private latrines draines, cesspools or other receptacles of offensive matter are duly cleaned.

3 A private latrine is a place which is used as a necessary and is attached to a building or land.

Proviso I—Where two or more necessaries are constructed in one building or land for the convenience of men, women, and children respectively of the family it should be considered as one latrine.

Proviso II—Where there are more latrines than one used by separate families living in one building each such latrine shall be considered separate latrine.

4 The cleaning and regulation of all private latrines, drains, cesspools, or other receptacles of offensive matter shall be carried on under the orders of the Municipal Committee. For this purpose the Committee shall keep sufficient staff of sweepers. The owner of building or land may, however, engage his own sweeper provided that no Municipal sweeper is so privately engaged.

5. Each private latrine drain, cesspool or other receptacle of offensive matter shall be cleaned once every day.

Persons holding 1st class licenses shall be entitled to have their latrines cleaned twice a day,

6. Persons olding licenses of other classes shall be entitled to have their latrines cleaned twice a day on payment of Rs. 2 extra per annum.

7. The Committee may make special arrangements with the managers of factories and residents of the Civil station for cleaning their latrines or using night soil cart.

The Committee will undertake to serve the residents of the Civil station on the following conditions:—

i No request on behalf, of a few shall be entertained except when they agree to the terms that the Committee may, looking to the expenditure necessary to maintain an extra Establishment, impose.

ii If all residents express their desire, the Committee will undertake the work of serving their private latrines by its agents. But in in that case the owner or occupier of each building or land should provide at his own cost and on the Committee's design a servants privy within his own compound where his private sweeper should collect the night soil removed from the privies attached to the main building. The servant's privy shall be served by the Municipal sweeper who shall remove the night soil collected there to the Municipal trenches.

iii The charge for the service mentioned in para 2 will in no case be less than Rs. 2 a month.

Note i In case the requisition is made according to para 2, the Committee will ascertain the value of buildings or lands within the portion called civil station and assess them accordingly.

Note ii If the committee undertakes the service by their sweepers of these private latrines, they would also undertake to remove the dirty water within the same charge.

8. Every owner of an existing private latrine in use and every person wishing to construct a new private latrine shall provide himself with a latrine license.

EXPLANATION

An owner in this rule also includes the occupant or manager of a building or land in which the latrine is situate.

9. The license fee for each latrine cleaned by Municipal sweepers shall be regulated an the annual income of the buildings or lands or portions of a building or land to which it belongs and that at the following rates:—

Buildings or lands or portions of buildings or lands of which the annual letting value is

upto Rs. 6——Rs. 1½ a year
Do—is above Rs. 6 but does not exceed Rs 25—Rs. 3
Do—Rs 25—Do Rs. 50—Rs. 5
Do—„ 50—Do—100—„ 7
Do—„ 100—Do—200—„ 10
Do—is above Rs. 200—12

Buildings or lands to which there are no privies but are attached drains, cesspools, or other receptacles of offensive matter only shall be assessed at a rupee and half a year in respect of the drains cesspools or other receptacles of offensive matter.

Note—Where there are more than one family residing in separate buildings or in separate parts of one building using one latrine, the income of all these buildings shall be taken in calculating the rate to be imposed.

10 Persons other than those mentioned in rule 7, if employ private sweepers under the provision of rule IV shall pay in advance a fee of rupee one and half per annum towards the cost of night soil carts.

11 The private latrine cess should be paid in advance yearly, half yearly or quarterly at the option of the license holder.

12 No license shall be valid unless the payment of the cess for the period for which it has been issued is made in advance.

Provided that no license shall be issued for a period shorter than three months.

13 The license shall be issued under the signature of the Vice—Chairman on application at the Municipal office between the hours of 11 A. M. and 5 p. m on all days except sundays and public holidays.

14 Each applicant for a latrine license shall write an application in the form annexed paying at the same time the license fee; if he be unable to write, the form shall be filled in for him without charge at the office of issue and he will be required to sign it or affix his mark.

15 The issuing office shall then grant a license in the form B annexed.

16 If the holder of latrine license lose the same during the period of its currency he shall be entitled to receive a duplicate license on payment of a fee of 2 annas and such duplicate license shall have the same effect as the original one.

17 The following persons shall have the right to inspect private latrines between sunrise and sun set and demand the production of latrine license.

1 Peon of the division
2 Conservancy Jamadar
3 Conservancy Inspector.
4 Conservancy Superintendent.
5 Any other member of the Committee.

18 Every owner of an existing private latrine shall be bound to keep it in proper repairs and no latrine adjoining a high road shall be continued or any new latrine opened unless the place, position, and design have been approved of by the officer whom the Committee from time to time may appoint for the purpose.

The Conservancy Superintendent will ordinarily approve of the place, position and design.

19 The Committee may by written order require any owner of a private latrine to furnish the same with galvanized iron pans or such other receptacles as may be approved of by the Committee for the retention of excreta

The persons required by the Committee as above shall furnish the latrines with such pans or receptacles within the time allowed by the Committee.

20 Persons infringing any of these rules shall be held to have committed an offence punishable under section 138 of the Berar Municipal Law 1886

Shankar Govind
Secretary
Municipal Committee
Akola.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध ११ शके १८१८

## दुष्काळ

दिवाळी बरोबर पावसाचीही आशा लयास गेली. सध्यांच लोक हवालदील होऊन गेले आहेत. धान्य अति महाग झालें आहे आणि अशा तडाक्यांत गरीब लोक व मध्यम स्थितींतले लोक यांचा चक्काचूर होऊन जात असल्यामुळें मोठी दहशत पडली आहे. सध्यां कांहीं थोडी मोलमजूरी मिळते पण संक्रांती नंतर किंवा महाशिवरात्रीनंतर दिवस कोणता उगवेल याचा नेम सांगवत नाहीं. आकोल्या जिल्ह्यांत पांच इसम उपासमाऱ्यामुळें मरण पावल्याची बातमी कळेत. दुष्काळाच्या विपत्तीनें सर्व देशाला फार सत्वर वेढा दिला आणि तो इतका जबरदस्त आहे कीं पुढील १०।११ महिने हें ठाणें कायम बसत असल्याचीं दुश्चिन्हें डोळ्यापुढें खेळूं लागलीं आहेत.

वऱ्हाड प्रांतांत धान्याचा पुरवठा सुबलक नाहीं तरी कांहीं वाईट नाहीं. जेमतेम दुष्काळांतून लोकांची निभावणी कांहीं महिने होईल. परंतु सध्यां बाह्य प्रांतीं धान्य अतिशय जात आहे आणि त्यामुळें मोठीच चिंता उत्पन्न झाली आहे. बाह्य प्रांतांतले लोक या सुखी ह्मणून नाणवेलल्या प्रांतांत हळूं हळूं येत आहेत. खेड्यापाड्याचे लोक आसपासच्या, धान्यसमृद्ध खेड्यांत वस्तीला चरितार्थासाठीं जाऊं लागले आहेत. कित्येक कुणबी भाजीपाल्यावर कसा बसा दिवस लोटीत आहेत. सध्यां मरणाच्या द्वारीं बसलीं आहेत अशीं माणसें ह्मणजे शेती कामावर पोट भरणारे मजूरदार, बटाईनें व नफ्यानें शेती वाहणारे शेतकरी, आणि किरकोळ वीण कामाचे, लोहार कामाचें वगैरे हुन्नर व कसब करणारे कोष्टि, लोहार वगैरे लोक हे होत. महाराष्ट्रांत धान्याच्या लुटी झाल्याच्या बातम्या ऐकूं येतात तशाच प्रकारची स्थिती या प्रांतीं प्राप्त होत चालली आहे. लोक सध्यां आपल्या जवळील सर्वस्व खर्चून प्राणरक्षण करीत आहेत. त्यांच्या जवळ असलेल्या गुराढोरांस व इतर चीजवस्तूंस कांहीं मोल नाहीं असें वारंवार निदर्शनास येते.

लोक जेरीस येण्यापूर्वी सरकारची मदत येऊन पोचली तर मोठा फायदा असतो. किरकोळ दहा बारा हजारांचीं कामें तालुक्याशिहाय अकोला जिल्हा- बोर्डानें सुरूं केलीं आहेत आणि त्याप्रमाणें इतर जिल्ह्यांतून व्यवस्था होईल हें उघड आहे. पण या पेक्षां विशेष तजविजी झाल्या पाहिजेत आणि त्याबद्दलचा फंड व योजना या विषयीं आतां पासून खल होऊन पक्का निर्णय काय तो ठरून गेला पाहिजे. सरकारी सारा किती जबरदस्त आहे हें यंदा चांगलें समजतें. कित्येक स्थळीं साऱ्याचा निव्वळ माफी दिली पाहिजे आणि कित्येक स्थळीं सारा एक वर्षभर वसूल करितां कामा नये. लोकांचीं जनावरें जगतील अशा प्रकारच्या जंगलाच्या सवलती मिळाल्या पाहिजेत. पाण्याचे पुरवठे पुढील पावसाळ्या पर्यंत टिकतील अशा विषयीं खबरदारी घेण्यांत येईल तर बरें. मोठमोठीं दुष्काळा-निमित्त मोलमजूरीचीं कामें उभारलीं पाहिजेत इतकेंच नाहीं तर स्थानिक सरकारानें धान्याचें दुकान घालून तोट्यानें गोरगरीबांस धान्याचा पुरवठा केला पाहिजे. जोंपर्यंत सरकार आपल्या पैसा खर्चीत नाहीं तों पर्यंत व्यक्तिविषयक औदार्याला चलन मिळत नाहीं. आमच्या जिल्ह्यांतील कांहीं अधिकारी बाहेर फिरण्यास गेले तेव्हां त्यांनीं गरीबांस आश्रय देण्यासाठीं व धान्य गांवाबाहेर जाऊं न देण्यासाठीं लोकामध्यें चांगली प्रेरणा केली आहे पण अशा वेळीं लोकांची खरोखर स्थिती व सरकारच्या मदतीचें स्वरूप या दोन गोष्टी खुलाशानें सरकारच्या नजरे समोर येतील तेव्हां रयतेचा फायदा होणार आहे.

---

महाराणी सरकारांनीं आपल्या इंडियन प्रजेवर दुष्काळामुळें ओढवत असलेल्या प्रसंगाला उद्देशून मोठ्या कळकळीचा विद्युत्संदेश पाठविला आहे. स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं ही आपल्या अंतःकरण पूर्वक मदतीचें अश्वासन दिलें आहे. पण कृतीमध्यें कांहींच दिसत नाहीं. हल्लीं राज्यकारभाराचा ह्मणून जो कोट्यावधी रुपये खर्च होत आहे तो दुष्काळा निमित्त कांहींच कमी होऊं शकत नाहीं असा समज असेल तर मग निराशाच आहे पण सहस्त्रावधि रुपये पगार घेणाऱ्यांस कांहीं तोषीस देशासाठीं लावली तर त्यांत कांहीं पातक नाहीं. कामपेनसेशन अलावन्स बंद केला तर कांहीं वावगें होईल असें नाहीं. इन कमट्याक्सचें उत्पन्न दुष्काळ फंडाकडे देण्यास कांहीं प्रत्यवाय नसावा. लष्करी खर्च, इजिप्तच्या मोहिमेचा खर्च वगैरे बंद किंवा रद्द होण्यासारख आहेत. परंतु इंग्रजी राज्यांत गोड बोलण्यांतच सर्व कृती विरून जाते.

---

माध्यान्हाची वेळ मोठी कठीण असते. जेवावयाला मिळालें नाहीं ह्मणजे ती मात्रा सर्व व्यसनावर रामबाण त्रैलोक्य चिंतामणी प्रमाणें काम करिते. हल्लींच्या दुष्काळामुळें मद्यपी लोकांनीं दारूचा त्याग केला आहे आणि ते इतके सत्वस्थ बनले आहेत कीं कलाली मक्तेदार व पोट मक्तेदार यंदा ठार बुडत आहेत. कलालीचीं दुकानेंच चालत नाहींत. आणि मक्तेदाराकडे माहवारीचा पैसा थकतो व मोठ्या कष्टानें वसूल होत असतो. मक्तेदार व पोट मक्तेदार यांनीं आज तागाईत जर सरकारास कोट्यावधि रुपयांचें उत्पन्न दिलें आहे तर आमच्या मतें सरकारानें कलालांची दुकानदारी पाहून थोडीबहुत सूट दिली पाहिजे. हा काल लोकांस छळून पैसा वसूल करण्याचा कांहीं नाहीं!

---

हल्लीं फारेस्टाच्या कुरणांची व्यवस्था ठीक नाहीं. कुरणें उध्वस्त झालीं आहेत. श्रीमान लोकांनीं व आफिसरांनीं आपल्या साठीं गवत कापून नेऊन रमणे पुष्कळ खल्लास केले. गरीब रयते जवळ गुरासाठीं चारा नाहीं आणि त्यांस पोसण्याचें काम मोठ्या खर्चाचें झालें आहे. शेतकामाच्या जनावरांस बंदीचीं जंगलें यंदा थोड्या फीवर मोकळी केलीं पाहिजेत. यंदा फारेस्ट आफिसरावर प्रांतांतील शेत कामाचीं जनावरें जगविण्याची मोठीच जबाबदारी आहे आणि ती ओळखून ते वर्तन ठेवितील तर चांगलें होईल.

## The Berar Samachar

MONDAY NOVEMBE
16 1896

The scarcity of food—grains is fast developing into a regular famine. The distress is most acute and intense. It is not likely that it will shortly rain. To expect rain in the near future is simply to hope against hope. We are no longer a dupe of tomorrow. Famine stares us in the face and gloomy days seem to be in store for us.

The question is how well we shall meet the deadly foe.

The first requisite is an ample supply of food—stuffs. We are told that the local supply will meet at least more than half the demand of the people. But gradually the old stock is being depleted by exports to outside provinces. If this state of facts continues the danger is that we shall have to purchase anew a similar quantity at the rates of the time when we shall be forced to import grain. The difficulty is to arrest such adventures in the large consignments of food—supplies to other provinces. The principle of free—trade regulates the policy of the Government and no orders can contravene the rules of public policy. Prudence will however dictate that whatever stock may be over and in abundance of the people's demand may well be sent to relieve the people in other localities. Interference on the part of the Government will not set matters right but will cripple private trade with no distinct grain in return. The best remedy seems to lie in the foundation of a big Famine Fund for each locality. Each locality should act in concert with other ones and all in other turn should organize a central agency of introducing an effective control and stimulating a decisive rivalry towards the relief of the poor. Such a general scheme will promote its ends very well if it can grain ground in time. With this fund in hand the leading people of each town or village will be able to stay the rapid rises and falls in the market-prices and to hold a balance between the disturbing elements of foreign and local demands for food—stuffs.

Private benevolence will play a great part. But it is helpless without a noble sacrifice on the part of the Government Let the British Government follow Natives states in the matter of remission of land revenue. The tenants of Government will gladly remit the land—tax to the institution of the Famine-Fund if they be so allowed. Without such a prospect of funds we do not think that any measure of relief will thrive well. The first and fremost relief lies in relief works on a big scale. People will work there and purchase their food—stuffs at the shops maintained upon charitable contributions.

---

Social embers are still alive at Poona. There is now a complete breach between the rival parties. The political arena is also beset with the same strife. No where the gulf is so wide as in the midst of the opposing parties of the Poona Sarvajanik Sabha. Rival and bitter jealousies reached the highest pitch when the party in minority bid adieu to the Sarvajanik Institution and began to flock under the standard of the Deccan Sabha. The Sabha may rise or fall but it takes, under the auspicious signatures of the Poona. Rao Bahadurs, its stand to promote the political interests of India. We are sorry for the event which the Deccan Sabha signalizes It pains us the more to see that the organizers of the new Sabha could not succeed in moving along with the people. This event will create new political races and creeds and the danger is therefore prominent. Let us hope however that both the Sabhas will march along their own lines to attain one highest *ideal*. We hope both assemblies will work to achieve the same good and will merge their ill feelings in the realization of it. We would however request the movers of both the Sabhas to follow the noble advice that is conveyed in the propoganda of the Deccan Sabha:—

"For some time past the conviction has been forcing itself on many earnest lovers of political progress in the country that it was necessary to take effective steps to give adequate expression to the spirit of moderate liberalism which animates the more thoughtful leaders of public opinion on this side of India. When the Poona Sarvajanik Sabha was first established twenty-five years ago, it was intended by its promoters to serve as an exponent of such public opinion in the Deccan generally in matters of public interest, and for many years this function was admittedly discharged by that body to the satisfaction of the whole country. The Sabha always aimed at securing the co—operation of all classes and it scrupulously avoided identifying itself with any preponderent sectional interest. Recently, however, the conditions which ensured this cautious balance of judgment have been to a large extent disturbed; and taking a technical advantage of a certain laxity in the constitution of the Sabha, sectional interests have now obtained an ascendancy, which added to the general spirit of reaction, has alienated the sympathies of those whose long association with the Sabha was principalty instrumental in building up for it whatever prestige it possesses and securing to it the measure of success it has achieved as an intermediary between the Government and people one result of this alienation has been that for the last year and a half the voice of the Sabha has almost been silent on the great public questions of the day and it has busied itself with small matters in a spirit which is not calculated to further true public interests. It was hoped by those of its friends who had devoted their best energies—almost a life—time work—to its advancement that things would correct themselves after a temporary departure from the old traditions. But all those who had cherished this hope most fondly have been forced by stress of circumstances to admit that there is now no chance of such a result being reached and that the only way to set matters right is not to abstain from all public movements but to put their own shoulders to the wheel, and by guarding against the possibility of old mistakes, repeating themselves to secure a well conducted political organization, which will subserve, in these more advanced times, the interests identified with moderate and liberal public opinion.

"Liberalism and moderation will be the watch-words of this Association. The spirit of Liberalism implies a freedom from race and creed prejudices and a steady devotion to all that seeks to do justice between man and man, giving to the rulers the loyalty that is due to the law they are bound to administer but securing at the same time to the ruled the equality is their right under the law. Moderation imposes the conditions of never vainly aspiring after the impossible or after too remote ideals, but striving each day to take the next step in the order of natural growth by doing the work that lies nearest to our hands in a spirit of compromise and fairness. After all, political activities are chiefly of value not for the particular results achieved but for the process of political education which is secured by exciting interest in political matters and promoting the self-respect and self-reliance of citizenship This is no doubt a slow process but all growth of new habits must be slow to be real."

---

Here we give below from the pages of India some learned and interesting arguments against the present policy of the British Government in regard to the enhancement of land—revenue.

"The struggle for land is thus intensified year after year. Old industries are gone or decaying, and new industries are not springing up. The decay of our industries lets loose on agriculture another large flood of comparatively alien population. The scramble for land becomes intense. The old agricultural and cultivating landholder finds himself unable to pay the assessment which the eager bid of a large class of people convinces the not over—sympathetic revenue official that the land could well bear. He has accordingly to reduce himself to the level of a coolie proprietor of land under Government, satisfying himself with an income from land equal to a minimum living wage, and be content with the standard of comfort of the class of labourers. Where he cannot so reduce himself to a level of life his ancestors and himself have not been accustomed to, he is sold up for arrears of revenue or he relinquishes his land to Government, and the land is taken up, whatever the assessment might be, by one who has accustomed himself to a much lower standard of life, and who hopes therefore to pay the Government assessment. If he again is mistaken in his calculation and fails to pay the Government revenue, he also relinquishes the land, or is sold up in his turn, and a more sanguine coolie speculator steps in, with the same result. If the cultivator is able to pay the revenue by improving the land, by investing his own money on it, or otherwise, that is itself accepted as an indication of the lightness of the assessment, with the result that the assessment is soon increased. No law stands between the the rayat and the revenue official. No Civil Court may enquire into the question of any increase of taxation. He has therefore to lower again his standard of life, or to relinquish or submit to the sale of the land. The revenue official flourishes in the face of the world the fact that the lands are seldom unoccupied, that every land relinquished is soon taken up, forgetful of the circumstance that where land is the only means of livelihood for by far the great majority of the population, every bit of land, if possible, will find an occupant."

"No unnecessary reduction can injure the country, and the Government revenue can only suffer from it to the extent of such reduction. An error upon one side involves the inevitable ruin of the country; an error upon the other some inconsiderable sacrifice of the finances of the State; and with such unequal stakes depending, can we hesitate as to which should be given the preponderance? The line of true policy under such circumstances is not in an attempt to fix assessment at what the land will exactly bear, but in fixing it as far within this limit as the exigencies of the State will permit."

## वऱ्हाड

हवामान—पावसा विषयीं आशा सरली उष्मा होतां आणि थंडीहि थोडथोडी पडत असते. दुष्काळाच्या प्रसंगामुळें लोकांचा दील सुटल्या प्रमाणें झाला आहे. रोगराइ ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट, बी. ए. एल. एल. बी, यांस मंगरूळपीरास तहशीलदार नेमल्या अन्वयें ते गेल्या आठवड्यांत तेथें दाखल झाले.

रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल. एल. बी. तहशीलदार, मेहकर यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर नेमणार असल्या विषयीं आनंदकारक बातमी कळते.

अलिशान रेसिडेंट मि. प्लौडन साहेब यांची स्वारी येत्या बुधवारीं वऱ्हाडांत येऊन प्रथमतः उमरावतीस भेट जाणार आहे असा बेत दिसतो.

रा. रा. विश्वनाथ मोहनीराज धर्माधिकारी हेडमास्तर इंग्लिश मराठी शाळा, अकोला यांस कारंजाच्या शाळेवर बदलून तेथील हेडमास्तर रा. रा. गोविंद महादेव आसखेडकर यांस आकोल्यास बदललें.

रा. रा. सदाशिव गोविंद दामले हेडमास्तर, इंग्लिश-मराठी शाळा, परतवाडा यांस पेनशन मिळाल्यामुळें त्यांच्या जागीं रा. रा. अंनत परशराम खरे यांस २५ रुपये बढती देऊन १०० रुपयांवर खामगांवाहून परवाड्यास बदललें.

खामगांव येथील हेडमास्तरच्या जागीं रा. रा. काशिनाथ वामन कुळकर्णी बी. ए. असि. मास्तर, हायस्कूल आकोला यांस बढतीवर नेमण्यांत आलें.

भयंकर खून—उत्तर हिंदुस्थानांतून एक नारायण वल्लद परमसुख नांवाचा भोई आपल्या राखलेल्या औरतसह आकोल्यास नुकताच आला होता. त्यांच्या बरोबर या अशुद्ध संभोगांतली चंम्पा नांवाची दोन वर्षांची मुलगी होती. धर्मशाळेंत रात्रीं तळ असतां त्या चांडाळ नारायणानें औरतीस बाजारांत रवाना केलें आणि मुलीचा वस्तऱ्यानें खून केला. आरोपीवर काम चालूं आहे.

शेगांवचे भाटे राजश्री खटाव फरमू यांच्यावर क्याप्टन आयव्हर्स यांच्या कोर्टांत खोट्या वजनांचा उपयोग करून गिऱ्हाईकांस फसविल्या बद्दल आरोप होता. चौकशी अंतीं गेल्या शनिवारीं तीन महिन्यांची सक्त मजूरी व २०० दंड अशी शिक्षा सांगण्यांत आली. सत्ताधारी मनुष्यापुढें कोणाचाच इलाज चालत नाहीं!

हिवरखेडाहून आकोल्यास येत असलेल्या पासेंजर गाडीखालीं एक दहा वर्षांचा महाराचा मुलगा चिरडून गेल्या बुधवारीं मरण पावला.

तरोंडे तालुके बाळापूर येथील वीस बावीस इसमांनीं एक उभें शेत लुटलें ह्मणून त्यांस गेल्या शनिवारीं पकडून आकोल्यास आणिलें आहे.

येत्या बुधवारापासून अकोल्यास यंदाच्या शिक्षक समाजाला बैठकीला प्रारंभ होईल.

रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार, अव्याची यांची बदली वाशिमास झाल्या प्रमाणें ते तिकडे रुजूं झाले.

पिंजरच्या मस्तानशावलीचें पवित्र स्थळ गोरक्ष्यानें भ्रष्ट केल्याच्या आरोपावरून दावल, सोनमहमद व गुलाब या तिघांस एक एक वर्षाची सक्त मजूरी व आबास याला ४ महिने साधी कैद अशा शिक्षा देण्यांत आल्या.

हायस्कूल प्रवेश परीक्षेला एकंदर २९० विद्यार्थी आले होते त्यांचा निकाल येणें प्रमाणें:—

| हायस्कूल | विद्यार्थ्यांची संख्या | पास | वरघेतले |
|---|---|---|---|
| आकोला | १२१ | ३९ | ३७ |
| उमरावती | १६९ | ५३ | ४३ |

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | १०५ रुपये |
| जवारी | ९७॥ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२५ रु० |
| ,,( बनशी ) | १३५ रु० |
| चणे | १०५ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ७॥ मण |
| सोनें | २५॥ तोळा |
| चांदी | ८६ |


## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्यांक आकोला १०।७।९६. } B. Aitken Agent


## वर्तमानसार.

मद्रास येथील साऊथ इंडियन रेलवे वर्कशापाच्या अधिकाऱ्यांनीं त्यांतील मजूर लोकां संबंधानें आतिशय कडक कायदे केले होते ह्मणून त्यां लोकांनीं कामावर येण्याचें नाकारलें. ट्राफिक सुपरिंटेंडट मेल ट्रेनीनें आज ह्मणजे तुमची नीट व्यवस्था लावतील अशी समजूत घालून पोलीस सुपरिंटेंडटानें त्यांस कामावर आणिलें. परंतु, मेल ट्रेन आली तरी ट्राफिक सुपरिंटेंडट मागेंच राहिले असें जेव्हां त्या लोकांनीं पाहिलें तेव्हां अधिकाऱ्यांनीं त्या मजूरांस वर्कशापाच्या बाहेर हाकून लाविलें. त्याचा असा परिणाम झाला कीं सकाळीं अकरा वाजतां दंग्यास सुरुवात झाली. लोक बिथरले आहेत, तेव्हां ७० पोलिसांची एक टोळी अगोदर आणून ठेविली होती. आपल्या दुःखांचें निवारण वडग्यांनीं नाहीं झाल्यास बंदुकांनीं होणार हें पाहून तर त्या मजुरांचा अतिच संताप झाला. पोलिसांनीं गोळ्या झाडल्या, दोन असामी ठार केले व कित्येक जखमी झाले. वर्कशापकडे बंदुकीचा मारा पाहून ते लोक रेलवे स्टेशनाकडे वळले. सगळी हपीसें लुटलीं. तारा तोडून टाकल्या. दोन मैल पर्यंत रेलवेचा रस्ता सबंध उखळून टाकला. मध्यरात्रीं पर्यंत दंगा सारखा चालला होता. त्रिचनापल्लीहून पायदळीच्या दोन पलटणी रवाना झाल्या आहेत. तारा वगैरे पुनरपी आजपासून सुरू झाल्या आहेत.

अहमदनगर— खून क. सोनई येथे गुराच्या वैरणी संबंधानें सावकार व त्याचें कूळ यामध्यें तंटा होऊन मारवाडी सावकार व त्याचा मुलगा या दोघांचें खून झाले आहेत दिवसें दिवस प्रसंग कठीण येत चालला आहे. न्या. सिं.

---


### जाहिरात

जाहिरात देण्यांत येतें कीं, आकोले म्युनिसीपाल कमिटीनें ता. २६–१०–९६ इसवी रोजीं भरलेल्या स्पेशल कमिटींत वार्डनंबर ३ ( सदर स्टेशन ) खेरीज करून म्युनिसीपल हद्दीमध्यें वऱ्हाड म्युनिसीपल कायद्याचें कलम ४२ अन्वयें ‘ मेहेतरपटी ’ बसाविण्याचे ठरविलें आहे.

कर बसविण्यास पात्र असलेल्या मिळकतींचें वर्णन, कराचा दर आणि कराची आकारणी करण्याची रीत, सोबतच्या छापलेल्या नियमावरून दिसून येईल.

ज्या इसमास सदर्हू सुचविलेले करासंबंधीं तक्रार करायाची असेल त्यानें ह्या नोटिसीचे तारखेपासून ३० दिवसांचे आंत लेखी तक्रार कमिटीकडेस करावी.

आकोला ता. १२–११–९६ } Shankar Govind. सेक्रेटरी म्यु० क० आकोला.


### मेहेतर पट्टी

नियम

१ कमिटीस वेळोवेळीं योग्य वाटतील तितके भाग म्युनिसीपाल कमिटीचे हद्दीचे ह्या नियमांचे अमलवारी करितां केले जातील.

२ असा प्रत्येक भाग बीट शिपायाचे ताब्यांत दिला जाऊन त्यानें आपले हद्दीतील खानगी पायखाने रोजचे रोज सफा केले जातात की नाहीं हें पाहिलें. पाहिजे,

३ इमारतींत किंवा जमिनींत शौच्यास जाण्याकरितां जी जागा उपयोगांत असेल तीस पायखाना अशी संज्ञा दिली आहे.

प्रोव्हीजो. १ जेव्हां एकाच इमारतींत किंवा जमिनींत एकाच कुटुंबांतील स्त्री, पुरूष, आणि मुलें याचे सोईकरितां दोन किंवा दोहोपेक्षां अधिक पायखाने केले असतील तो एकच पायखाना आहे असे समजलें जाईल.

प्रोव्हीजो. २ ज्या इमारतींत किंवा जमिनींत एकापेक्षां अधिक पायखाने असून त्याचा निरनिराळीं कुटुंबें उपयोग करीत असतील तर असा प्रत्येक पायखाना निराळा पायखाना समजला जाईल.

४ सर्व पायखाने मोऱ्या, डाहारे किंवा घाणीचे पदार्थ सांचविण्याकरितां केलेलीं इतर सांठवणें सफा करण्याची व त्यांची व्यवस्था करण्याची तजवीज कमिटीचे हुकूमानें होईल व ह्या कामाकरितां पुरेसे भंगी वगैरे लोक ठेविले जातील तथापि एकादे इमारतीचे किंवा जमिनीचे मालकास कमिटीचे नोकरांशिवाय दुसरा भंगी नोकर ठेवितां येईल.

५ प्रत्येक पायखाना दररोज एकवेळ सफा केला जाईल.

पहिले प्रतीचें लायसेन्स घेणार इसमाचे पायखाने दररोज दुवक्ता सफा केले जातील.

६ इतर प्रतीचे लायसेन्स घेणारांपैकीं ज्यांस आपले पायखाने दुवक्ता साफ करून घ्यावे अशी इच्छा असेल त्यांनीं दरसाल २ दोन रुपये ज्यास्त दिले पाहिजेत.

७ सदर स्टेशन मध्यें राहणारे लोकांचे व काटन फ्याक्टरींतील पायखाने वगैरे साफ करण्या बद्दल किंवा कमिटीचें गाड्यांचा उपयोग करण्याबद्दल कमिटी विशेष तजवीज करील.

सदर स्टेशनमध्ये राहणारे लोकांचे पायखाने सफा करण्याचें काम कमिटी खालील शर्तीवर कबूल करील.

सदर्हू इसमांपैकीं कांहीं लोकांनीं केलेली विनंती मान्य केली जाणार नाहीं. त्यांनीं केलेल्या विनंतीमुळें कमिटीस नोकर ज्यास्त महकमा ठेवावा लागेल. त्याचे खर्चाचे मानानें कमिटी ज्या शर्ती ठरवील त्या शर्ती कबूल केल्यास त्याची विनंती मान्य केली जाईल.

ii जर सर्वांची इच्छा असेल तर कमिटी सदर्हू काम पतकरील. परंतु प्रत्येक मकानाचे अथवा जमीनीचे मालकानें अथवा त्यांत राहणारे इसमानें स्वताचे खर्चानें आपल्या हद्दींत कमिटीचे नमुन्याप्रमाणें एक नोकरां करितां पायखाना बांधला पाहिजे. सदर्हू पायखान्यांत खानगी भंग्यानें मुख्य मकानांतील पायखान्याचा मैला जमा करावा सदर्हू नोकरांच्या पायखान्यांतील मैला कमिटीचा भंगी काढून कमिटीचे नाल्यांत नेऊन टाकील.

iii सदर्हू प्यारा २ यांत सांगितलेलें नोकरीबद्दल दरमहा २ रुपयांपेक्षां कमी फी पडणार नाहीं.

नोट १. प्यारा २ प्रमाणें विनंती असल्यास कमिटी सदर स्टेशन मधील इमारती किंवा जमीनींची किंमत ठरवून त्या प्रमाणें त्यावर कराची आकारणी करील.

नोट. २ जेव्हां कमिटी पायखाने साफ करण्याचें काम पत्करील तेव्हां ती त्याच खर्चात मेला पाणी नेण्याचेंही कबूल करील.

८ हल्लीं ज्या इमारतींत किंवा जमिनींत पायखाने, मोऱ्या, डाहोर किंवा घाणीचे पदार्थ सांचविण्या करितां केलेलीं इतर सांठवणें आहेत व पुढें नवीन होतील त्या प्रत्येक इमारतीचे किंवा जमिनीचे मालकानें पायखान्या बद्दल लायसेन्स घेतलें पाहिजे.

विशेष खुलासा— वरील नियमांत ‘ मालक ’ या शद्बांत ज्या इमारतीं किंवा जमिनींत पायखाना आहे अशा इमारतींचा किंवा जमिनीचा वहिवाटदार किंवा तींत राहणारा यांचा समावेश होतो.

९ म्युनिसिपालिटीचे भंग्याकडून जे पायखाने सफा केले जातील त्याबद्दल लायसेन्स फी ते पायखाने ज्या इमारतींत किंवा जमिनींत अथवा इमारतीचे किंवा जमिनीचे भागांत असतील त्याचे सालचे उत्पन्नावर खालीं लिहिल्या प्रमाणें घेतली जाईल. इमारती अथवा जमिनी किंवा इमारतीचे अथवा जमिनीचे भाग ज्यांचें सालिना भाड्याचें उत्पन्न. ६ रुपया पेक्षां अधिक नाहीं त्यास सालीना रुपया १ $\frac{1}{2}$

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सदर्हू ६ रुपयावर आहे परंतु २५ चे वर नाहीं. | | | | ३ |
| सदर्हू २५ | सदर्हू | ५० | | ५ |
| „ ५० | „ | १०० | | ७ |
| „ १०० | „ | २०० | | १० |
| „ २००चे वर | | | | १२ |

ज्या इमारतींत किंवा जमिनींत शौचकूप नसून फक्त मोऱ्या, डाहारे, किंवा घाणीचे पदार्थ सांचिवण्याकरितां इतर सांठवणें आहेत. अशा इमारती किंवा जमिनी बद्दल सालिना कर फक्त १ $\frac{1}{2}$ रु. आहे.

टीप— निरनिराळ्या इमारतींत किंवा एकाच इमारतीचे निरनिराळ्या भागांत रहाणारीं एका पेक्षां अधिक कुटुंबें एकाच पायखान्याचा उपयोग करीत असतील तर त्या सर्व इमारतीचे किंवा एकाच इमारतीचे निरनिराळ्या भागांचे एकमाईक उत्पन्नावर कराची आकारणी केली जाईल.

१० रूळ ७ यांत सांगितलेले लोक शिवाय करून रूळ ४ यांत सांगितल्या प्रमाणें जे लोक आपले पायखाने खानगी भंग्याकडून साफ करवतील त्याजला कमिटीचे गाड्याचा उपयोग करण्याबद्दल सालिना अगाऊ १॥ दीड रुपया फी द्यावी लागेल.

११ हा कर अगाऊ तीन माही साहामाही अगर वार्षिक देण्याचे जसें मालकाचें सोईस येईल त्या प्रमाणें दिला पाहिजे.

१२ सदर्हू लायसेन्साचा ज्या मुदतीपर्यंतचा आकार चुकविला असेल तितके मुदतीपर्यंत ते अमलांत राहील तीन महिन्यापेक्षां कमी मुदतीचे लायसेन्स कोणास ही दिलें जाणार नाहीं.

१३ हीं लायसन्सें व्हाईस चेअरमन साहेब याचे सहीचीं म्युनिसीपालटीचे आफिसांत रविवार व इतर सणाचे दिवस शिवाय करून दिवसाचे ११ वाजे पासून ५ वाजे पावेतो कोणतेही दिवशीं अर्ज केला असतां मिळतील.

१४ कमिटीचे आफिसांतून छापील [ अ ] नमुना दिला जाईल. त्यावर लायसेन्साचे फी सह प्रत्येक अर्जदारानें लायसेन्सा करितां अर्ज केला पाहिजे जर कोणी मनुष्य सदर्हू नमुना स्वतः लिहिण्यास असमर्थ असेल तर आफिसांतून फुकट लिहून मिळेल. व त्याजवर त्यास आपली सही अगर निशाणी करून द्यावी लागेल.

१५ आफिसांतून त्यास (ब) नमुन्याचे लायसेन्स दिलें जाईल.

१६ सदर्हू लायसेन्स ज्यारी असलेल्या मुदतींत ज्यांजकडून तें हरवेल जाईल त्यानें २ आणे फीदिली असतां त्यास दुप्लीकेट लायसन्स मिळेल व त्याचा असल प्रमाणेच उपयोग होईल.

१७ खालीं लिहीलेल्या आफिसरांस सुर्योदयापासून सुर्यास्ताचे पूर्वी हरएक पायखाना तपासण्याचा व लायसेन्स पाहण्याकरितां मागविण्याचा अधिकार आहे.

१ भागाचा शिपाई. २ कानसरव्हंसी जमादार. ३ कानसरव्हंसी इन्स्पेक्टर. ४ कानसरव्हंसी सुपरींटेन्डट. ५ व कमिटीचा कोणताही मेंबर.

१८ प्रत्येक पायखान्याचे मालकानें आपआपले पायखाने योग्य दुरुस्तींत ठेविले पाहिजेत. मोठ्या रस्त्याचे बाजूस असलेले पायखाने, कमिटी वेळोवेळीं जो आफीसर मुकर करील त्यांनीं पास केले त्या नमुन्याचे असल्या वाचून चालू ठेवूं दिले जाणार नाहींत. तसेच नवीन कोणतेही पायखाने बिगर नमुन्याचे बांधू दिले जाणार नाहींत.

१९ प्रत्येक खानगी पायखान्यांत बकेट्स किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कुंड्या कमिटी पसंत करील त्या मैला सांचविण्या करितां ठेवणें लेखी नोटीसीनें भाग पाडण्यास कमिटीस अधिकार आहे ज्या इसमास कमिटीनें वर प्रमाणें नोटीस दिली असेल त्यानें नोटीशींत दिलेले मुदतींत पायखान्यांत बकेट किंवा सांठवण ठेविलें पाहिजे.

२० ह्या नियमांचें उल्लंघन ज्याजकडून होईल त्याजकडून वराड म्युनिसिपल कायदा कलम १३८ प्रमाणें गुन्हा झाला असें समजले जाईल.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ८
किरकोळ अंकास ............... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ......... ८। ८६
दुसरे खेपेस ........... ८।

Six monthly......... 3 ...... ... ..., 8 as
Single copy ........... ...... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX | AKOLA MONDAY 23 NOVEMBER 1896 | NO 45

वर्ष ३० | आकोला सोमवार तारीख २३ माहे नोवेंबर सन १८९६ इ० | अंक ४५

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याचीं बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्लास १९ मिसल नंबर ११/१८९६

वि॥० सिव्हील ज्यडज्य साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव---- सिताबाई
नवरा अंबादास सोनार
राहणार—आकोला तालुके आकोला व जिल्हा—अकोला यांस मयत

अंबादास बापाचे नांव बाबन सोनार राहणार आकोला तालुके व जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २८ माहे ११ सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १६ माहे ११ सन १८९६ इसवी.
Sheikh Ismail
सिव्हील जडज्य

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ४ शके १८१८

## राष्ट्रीय सभा

राष्ट्रीय सभेचा बारावा वार्षिक समारंभ कलकत्यास करावयाचा असा संकल्प गुदस्ता ठरल्या नंतर नानाविध विघ्नें सभेच्या कार्यांत आलीं. प्रथम दर्शनीं बंगाल्यांतील पुढाऱ्या मध्येंच फाटाफूट व दुही माजली पण ईश्वर कृपेनें सर्व वाद थोडक्यांत मिटला आणि राष्ट्रीय सभेच्या तयारीला सर्व बंगाली लोक कडेकोट बंदोबस्तानें लागले. पण दुष्काळानें डोळे वटारले आहेत आणि त्या कारणानें राष्ट्रीय सभा भरावी किंवा भरूं नये अशा विषयीं वाटाघाट चालू आहे. बहुतेक ठिकाणच्या लोकमताची दिशा अशी दिसते कीं राष्ट्रीय सभा यंदा भरवावी इतकेंच नाहीं तर तिच्या वार्षिक बैठकींत पुढील कांहीं वर्षे खळ पडूं देतां कामा नये. नामदार सुरेंद्रनाथ बानरजी असें ह्मणतात कीं मागील समारंभा प्रमाणेंच यंदाची बैठक ही यशश्रीला पावेल. दुष्काळामुळें सभासदांची संख्या कांहीं कमी होईल तथापि त्या निमित्तानें राष्ट्रीय सभेचा पूर्व संकेत बदलता कामा नये.

राष्ट्रीय सभेला जे लोक जातात येतात ते श्रीमान, व सुखसंपन्न असतात. त्यांचें ओझें दुसऱ्यावर नसतें तथापि प्रश्न हा आहे कीं राष्ट्रीय सभेच्या निमित्तानें जो हजारो रुपये खर्च होतो तो यंदा करावा किंवा तो खर्च न करितां त्या रकमेचा उपयोग दुष्काळानें पीडलेल्या लोकांच्या संरक्षणाकडे करण्यांत यावा. शेवटील विचार कांहीं वाईट नाहीं पण मोठी नड हीच कीं त्या हेतूप्रमाणें फंड जमण्याची व तत्संबंधीं व्यवस्था होण्याची वानवा आहे. तेव्हां अशा स्थितींत खर्च आटोपता घ्यावा आणि राष्ट्रीय समारंभ कसा तरी साजरा करावा हें विशेष सोयीचें दिसतें. कलकत्याच्या स्वागत-मंडळीकडे पंधरा हजारावर वर्गणीची रक्कम जमा झाली आहे आणि बंगाल्यांतील निरनिराळ्या भागांतून राष्ट्र कार्यासाठीं वर्गण्या जमत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. दुष्काळा सारख्या खडतर व बिकट प्रसंगीं देखील आरब्ध राष्ट्रीय सभा भरविली पाहिजे अशी जनसमूहाच्या मनाची शहानिशा झाली ह्मणजे एका प्रकारचा उत्तम राजकीय शिक्षणाचा धडा लोकांस मिळाला असें होईल. प्राण जावो अथवा राहो, राष्ट्रीय सभा सतत चालविली तरच देशाचें कल्याण आहे असा सर्व राष्ट्राचा निर्धार अशा आणिबाणीवर दिसून आला तर आपल्या सत्कार्याची महती कळून येईल आणि राज्यकर्त्यांस आमच्या कृतीची धन्यता वाटून आमची राजकीय उन्नति प्रचलित होईल यांत काडीमात्र शंका नाहीं. बुद्धिबल, विद्याबल व धनबल हीं जितपत ईश्वरदत्त व उपलब्ध असतील त्यांच्या मानानें यथाशक्ति व्यक्तिमात्रानें राष्ट्रीय सभेला मदत करावी अशी सर्व देशाभिमानी लोकांस आमची विनंती आहे.

बाराव्या राष्ट्रीय सभेच्या स्वागत मंडळीचे अध्यक्ष सर रामेशचंद्रमित्र आहेत आणि बाबू जे. घोसाल हे सेक्रेटरी आहेत. बंगालच्या लोकांनीं यंदाच्या बैठकीची तयारी कडेकोट चालविली आहे. येत्या बैठकीच्या वेळीं कोणकोणते विषय विचारांत घ्यावेत अशाबद्दल बाबू घोसाल यांनीं एक विषय पत्रिका स्टांडिंग कमिट्याकडे पाठविली आहे. या पत्रिकेंतील विषय येणें प्रमाणें:—

( १ ) महाराणी सरकारास सिंहासनारूढ होऊन ६० वर्षे पुरीं झालीं ह्मणून आनंद प्रदर्शक धन्यवाद प्रदर्शित करणें. इंग्लिश बादशहामध्यें इतकीं पुष्कळ वर्षे राज्य करण्याचें भाग्य महाराणी सरकारास प्रथमच लाभलें आणि त्या शिवाय इंग्लिश राजनितीचीं विजयदुंदुभी हीं महाराणी सरकारच्या कारकिर्दींतच सर्व जगभर ऐकूं गेली.

( २ ) राष्ट्रीय सभेची सशास्त्र रचना. पुण्याच्या बैठकीला हा नियमांच्या मसूदा सभेपुढें मांडण्यांत आला. या प्रमाणें राष्ट्रीय सभेचीं सर्व सूत्रें एका मध्यवर्ती मंडळीच्या हातीं राहतील आणि सर्व कार्यांत एक दिशा लागून तीं विशेष पद्धतशीर होत जातील.

( ३ ) सांप्रतचा दुष्काळ आणि दुष्काळ फंड पूर्वीं प्रमाणें कायमचा चालूं ठेवण्याची जरूरी.

( ४ ) प्रांतिक सरकाराला उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबदींत अधीक स्वतंत्रता मिळावी ह्मणून मुख्य इंडियन सरकाराशी होत असलेल्या पंचवार्षिकी करारामध्यें आवश्यक फेरफार.

( ५ ) इंडियाच्या घोर दारिद्र्याचा विचार.

( ६ ) मुलकी खातें व न्यायखातें हीं परस्परा पासून पृथक् व स्वतंत्र करणें.

( ७ ) इंग्लंड व इंडिया या उभय स्थळीं समकालीन सिव्हील सरव्हिसच्या परीक्षची आवश्यकता.

( ८ ) राव बहादूर न्यायमूर्ती रानडे यांनीं युनिव्हरसिटीच्या परीक्षा संबंधानें सुचविलेल्या सुधारणा.

( ९ ) एजुकेशन सरव्हिसची निराळी रचना केल्यामुळें होणारी नेटिवांच्या हक्कांची पायमल्ली.

( १० ) कायदे कौंसिलांच्या रचनेंत फेरबद्दल. प्रश्न विचारण्याच्या हक्कांचा विस्तार आणि बजेटावरील वादाअंतीं बहुमताचें स्वीकरण.

( ११ ) जूरीचा प्रश्न.

( १२ ) 'मेडिकल सरव्हिस' मधील सुधारणा.

( १३ ) दक्षिण आफ्रिकेंतील इंडियनांचा बचाव.

( १४ ) मागील ठरावांची पुनर्वाच्यता व दृढीकरण.

कलकत्यास जी सामाजिक परिषद भरावयाची आहे तेथें खालील दहा विषय विचारांत घ्यावेत अशा विषयीं रावबहादूर रानडे यांची सूचना आहे:—

( १ ) स्त्री शिक्षणाची आवश्यकता व त्यांचा फैलाव करण्याचे शालास्थापनादि उपाय.

( २ ) अनेक पत्नी करण्याची वाईट चाल आणि कुलीनिझमचें बंगल्यांतील वृथा स्तोम.

( ३ ) जलपर्यटन करणाऱ्यास बहिष्कार नसावा.

( ४ ) पुनर्विवाहाची अभिवृद्धी.

( ५ ) धर्मकृत्या निमित्त संस्थापित फंडाची दुर्व्यवस्था होऊ नये ह्मणून कायदा.

( ६ ) मद्यपान निषेध आणि पवित्र वर्तन.

( ७ ) ज्ञाती ज्ञातींतील पोट विभागांमध्यें बेटी व्यवहाराची आवश्यकता.

( ८ ) वधुवरांचीं वयें प्रौढ असावींत. आणि लग्न, श्राद्ध वगैरे संस्कारानिमित्त खर्च कमी करणें.

( ९ ) परधर्मांत गेलेल्याचें स्वधर्मांत संग्रहण.

( १० ) इंडियांतील मूळ रहिवाश्यांचा व हाफ कास्ट लोकांचा हिंदु समाजाशी संबंध.

गुरांस किंमतच नाहीं अशी वेळ समीप येत चालली आहे. चांगले चांगले बैल, गायी व ह्मशी फार स्वस्त किंमतीनें विकल्या जातात. हल्लीं गुरांची विक्री व संहार हीं इतक्या सपाट्यानें चाललीं आहेत कीं खाटीक लोक जें मांस पूर्वीं तीन आणे शेरा प्रमाणें विकत होते तें हल्लीं अर्ध्या आण्याच्या भावानें विकलें जातें. गुराच्या कातड्यावर त्याची किंमत येते आणि मांस फुकटांत पडतें अशी दुर्दशा कळते. या गोष्टीच्या प्रतिकारासाठीं कांहींच उपाय योजण्यांत येत नाहींत ह्मणून वाईट वाटतें.

सध्यां सर्व गोष्टीची जपमाळ सरकारापुढें ओढण्याचा क्रम ठेविला पाहिजे. रयतेची स्थिती सरकारास कळविली पाहिजे आणि सरकारास कर्तव्याविषयीं वारंवार जागृती दिली पाहिजे, हें काम मोठें बिकट आहे आणि तें सार्वजनिक सभे सारख्या लोकसंस्थांनीं बजावलें पाहिजे. वऱ्हाड सार्वजनिक सभा येत्या २९ वे तारखेला प्रांतिक सभा उमरावतीस भरविणार आहे आणि त्यांत प्रांतांतील ठळक, ठळक लोक गोळा करणार आहेत असे कळतें. मोठ्या आनंदाची बातमी होय!

## विद्यासमाज

यंदाचा हा चौदावा वार्षिक समारंभ होय. गेल्या १८ वे तारखे पासून चार दिवस समाजाचीं कामें मोठ्या झपाट्यानें चाललीं होतीं. कार्यपत्रिका पूर्वींच ठरल्या होत्या. त्यांच्या अनुसंधानानें वादविवाद, व्याख्यानें, वर्ग शिकवून दाखविणें वगैरे गोष्टी पुष्कळ चालल्या होत्या. यंदा हायस्कूल, मिडल स्कूल, मराठी शाळा, आणि ट्रेनिंग कालेज यांतील शिक्षक गुरुवारीं व शुक्रवारीं आपापल्या निरनिराळ्या गटांत बसून स्वतांच्या शाळेंतील विद्यादानाच्या अडचणी संबंधानें परस्पराशीं बोलत बसून एकमेकांच्या अडचणी, दुर्बोध स्थळें, इत्यादिकांची परिफूटता करीत होते. गेल्या समाजांत हा विशेष प्रकार दिसून आला आणि तो फार इष्ट आहे. विद्यार्थ्यांस शिकविण्याच्या ग्रंथांतील कठीण वाक्यें व कठीण अर्थ कांहीं शिक्षक परस्परास कळवीत होते व समजावून देत घेत होते त्या वेळची भवति न भवति विशेष मौजेची व आल्हाद कारक वाटली. यंदाच्या समाजात शास्त्रीय व उपयुक्त विषयावर विद्वानांचीं व्याख्यानें झालीं आणि तीं सावकाशपणानें मनन करण्या सारखीं आहेत ह्मणून आह्मी त्यांस एकदम रजा न देतां सवडीप्रमाणें कांहीं निवडक व्याख्यानें वर्तमान पत्रांतूनही प्रकाशित करणार आहों. या प्रकाशनानें बहुत लोकांस त्या व्याख्यानांचा रसास्वाद मिळेल आणि विद्वानांच्या परिश्रमांचे चीज विशेष होऊन लोकांचा फायदा अधीक होईल. या सालच्या बैठकीला सरासरी १५० दीडशें शिक्षक जमले होते. उत्तरोत्तर या समाजाची उपयुक्तता वाढत आहे आणि इनस्पेक्टर मंडळी व शिक्षक मंडळी फार आस्थेनें समाजाच्या कार्यमालेला रमणीयता आणित आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. विद्यासमाज ही संस्था बहुत अंशीं मार्गदर्शक आहे आणि राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन हे या समाजाच्या सूचना फलद्रूप होण्यासाठीं विशेष कळकळ वाळगतात.

प्रारंभीं राव साहेब डायरेक्टर यांनीं समाजाच्या कार्यास सुरुवात करण्याची आज्ञा दिली तेव्हां त्यांनीं स्वतांच्या सहासात सूचना समाजापुढें अभिप्रायासाठीं मांडल्या होत्या. गेल्या शनिवारीं शिक्षकसमाज व परीक्षकसमाज यांनीं आपल्या चार दिवसांच्या कामाचा रिपोर्ट वाचून दाखविला आणि डायरेक्टर साहेबांनीं आपला त्या विषयीं अभिप्राय कळवून समाजाची समाप्ति केली. तेव्हां राव साहेब पटवर्धन यांनीं विद्यादानाच्या चालूं पद्धती विषयीं व तिच्यांतील फेरफारा विषयीं लोकांची समजूत घालून दिली आणि मागील वर्षाच्या नानाविध गोष्टींचें सिंहावलोकन केलें. राव साहेबांच्या संभाषणांत साधेपणा व मनाचा मोकळेपणा असून त्यांनीं आस्थेनें आवेशानें व प्रेमभावानें आपल्या अनुभवांतल्या चार हितबोधाच्या गोष्टी कळविण्या आणि कतर्व्यतत्पर राहण्या विषयीं सर्वांस निक्षून सांगितलें. रावसाहेब पटवर्धन यांच्या संभाषणांतील मुख्य मुख्य गोष्टी अशा:—

(१) जमलेल्या मंडळीस मित्र हो ह्मणून संबोधून चार दिवसांत झालेल्या कामाबद्दल रावसाहेबांनीं आनंद प्रदर्शित केला. यंदा काम चांगलें झालें आणि त्यांत विशेष आनंद मानण्यास कारण असें कीं शास्त्रीय विषयांवर व्याख्यानें व प्रयोग होऊन त्या विषयाची माहिती शिक्षकांस झाली. राजश्री दामले मास्तर यांचा निबंध चांगला आहे. उमरावतीची धंदे शिक्षणाची शाळा आकोल्यास ट्रेनिंग कालेजास जोडण्या विषयीं त्यांची सूचना होती पण त्या शाळेचा खर्च उमरावती जिल्हा बोर्डाकडून भागत असल्या मुळें ही सूचना अमलांत येऊं शकत नाहीं.

(२) नवीन इयत्तांतील अभ्यास कमी करण्याविषयीं समाजाकडून सूचना आली ह्मणून डायरेक्टर साहेबांनीं मोठा खेद प्रदर्शित केला. ते रागानें व आवेशानें ह्मणाले कीं निश्चयानें जर आपण करूं लागलों तर सर्व गोष्टी घडून येतील. इयत्ता कठीण आहेत किंवा लायक शिक्षक-मंडळी तयार नाहींत हें कांहीं सध्यांच कळत नाहीं. हें पक्कें ठरल्यावर इयत्तांत फेरफार करणें आवश्यक वाटल्यास तसे फेरफार पुढें करण्यांत येतील. मी लोकांच्या सोयी करितां ह्मणून ज्या ज्या गोष्टी केल्या त्यांस वाईट ह्मणण्यांत काय अर्थ आहे? रयतेच्या सुखा साठीं आह्मी शाळाखात्यांतून या गोष्टी केल्या आहेत. मला फिरतांनां असें आढळलें कीं कित्येक मास्तर मुलांची तिसरी इयत्ता झाली कीं मुलांस शाळेंतून काढून देतात. कित्येकांस आपलीं मुलें शिकण्या निमित्त बाहेर गांवीं धाडतां येत नाहींत ह्मणून आह्मी प्रत्येक शाळेंत चार इयत्ता ठेविल्या आहेत. मुंबई इलाख्यांत अशा चार हजार शाळा आहेत. साधारण शिक्षण ह्मणजे लेखन, वाचन, व गणित होय आणि तें चार इयत्ता शिवाय पुरेसें होत नाहीं. त्या शिवाय वऱ्हाडांत प्रत्येक मुलास रु. ६/८= खर्च येतो आणि सर्व हिंदुस्थानांत या पेक्षां खर्च कमी आहे. हा जास्ती खर्च पडण्यास कारण असें कीं शाळेंतील मुलांची संख्या फार कमी आहे. पगार कांहीं फारसे मोठे नाहींत. १०।१२ रुपये पगारापेक्षां कमी पगार करिताच येत नाहीं. प्रत्येक शाळेंत निदान ४०।५० मुलें जमलीं पाहिजेत. कोणतीही गोष्ट होत नाहीं, होत नाहीं ह्मणून गाऱ्हाणें किंवा तक्रार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शाळेंत २५ मुलें असलीं तर चार इयत्ता शिकविण्यास एका मास्तरास बिलकूल अडचण नसावी. प्रत्येक वर्गांत २५।२५ मुलें असलीं तर दोन इयत्ता देखील नीटशा शिकवितां येणार नाहींत पण मुलें कमीं असलीं तर चार इयत्तेंची लोकांच्या सोयी साठीं केलेली व्यवस्था अंमलांत आलीच पाहिजे. लोकांच्या होतील तितक्या सोयी साधल्याच पाहिजेत.

( ३ ) उर्दू समाजानें उर्दू क्रमिक पुस्तकें तयार करविण्या बद्दल सूचना केली आहे. ही सूचना ह्मणजे मांजराच्या गळ्यांत घांट बांधण्यांस सांगण्या प्रमाणेंच आहे. उद्योगीपणाचें लक्षण हें नव्हें कीं क्रमिक बुकें तयार करून द्या असें ह्मणत राहावें. बुके तुह्मी तयार केल्याबद्दल आह्मी बक्षिसें देऊं श्रम कोणी केले तर त्यांस बक्षीस दिलेंच पाहिजे.

( ४ ) फीचे दर कमी करून जुने दर चालूं करण्याची सूचना ठीक आहे. माझाही प्रयत्न वरिष्ठ अधिकाऱ्या मार्फतीनें चालूं आहे. पण नादार विद्यार्थी अधिक घेण्याविषयींच्या सूचने विषयीं मला मोठीशी उमेद नाहीं कांकीं रेसिडेंट साहेबांची त्या गोष्टीला परवानगी लागते.

( ५ ) गांवठी शाळा कमी कमी होत आहेत ही गोष्ट वाईट होय. ही शाळा कशी तरी थोड्या खर्चानें चालवितात आणि सरकारी Grant मिळाली कीं लागलेंच मास्तर पवबारा करितात. १८९४ सालीं असें आढळलें कीं ग्रयांट मिळाल्या नंतर साल अखेरीस ८० गांवठी शाळा बंद झाल्या. या शाळा सुधारण्याला दोन गोष्टी केल्या पाहिजेत. त्यांतील इयत्तामध्यें फार दोष आहेत तर त्या इयत्ता सरकारी शाळा प्रमाणेंच केल्या पाहिजेत. आणि त्या शाळांस मासिक तक्ते वगैरे सक्तीचे नियम लागूं केले ह्मणजे बारा महिने शाळा चालतील. सरकारी शाळांचा व गांवठी शाळांचा प्लाटफार्म एक पाहिजे.

[६] मास्तरांचा पगार अधीक करण्या संबंधानें रावसाहेबांनीं सांगितले कीं कमींत कमी १० रुपये पगार असावा. ही माझी सूचना अद्याप चांगलीशी अमलांत आली नाहीं. १० चे ११ किंवा ११ चे ठिकाणीं १२ रुपये पगार करण्यास तयारी आहे. पण जसें बोलावें तसें करावें असें माझें ह्मणणें आहे. शिक्षकांस दोघा नवराबायकोंच्या पोटा पुरता तरी पगार असलाच पाहिजे. १० रुपये पगार अगोदर सर्वत्र करा असें सांगितलें.

( ७ ) क्रमिक पुस्तके चांगलीं आहेत त्यांत स्थानिक माहिती पुष्कळ आहे. पण तीं मोडींत व बाळबोधींत असल्यामुळें छपाई मनोहर होत नाहीं. निर्णयसागरांतल्या ठशां सारख्यां ठशांनीं बाळबोधींत पुस्तकें सुवाच्य छापावींत. मुंबई इलाख्यांतील मोडी पुस्तकें निराळीं चालूं करावीं ह्मणजे झालें. वऱ्हाडचीं अंकलिपी अगदीं वाईट आहे. छपाई चांगली नसते आणि विषयही नीटसा दिलेला नाहीं. त्यापेक्षां मुंबई इलाख्याचें उजळणीचें ६४ पानांचे पुस्तक एक आण्यास मिळतें तें उत्तम होय. शिक्षकांसही त्यांत शिकविण्या संबंधानें सूचना आहेत. दादोबाचें लघु व्याकरण शिकण्यास सोपें नाहीं ह्मणून प्रारंभी व्याकरणमाला हें पुस्तक योजिलें आहे.

( ८ ) पब्लिक सरव्हिस सर्टीफिकीट मुंबई इलाख्यांतील चाली प्रमाणें मराठी ६ व्या इयत्तेचें आणि इंग्रजी ५ व्या इयत्तेचें असावें ह्मणजे या इयत्ता झाल्यावर सरकारी नोकरीला पात्रता यावी असा माझा विचार आहे. पण ही शिक्षणाची सामुग्री कशी करून देतां येईल इकडे सध्या लक्ष्य आहे.

( ९ ) निबंध लिहिण्याची संवय असावी हें अवश्य आहे ह्मणून तत्संबंधी सूचना मला पसंत आहेत.

( १० ) नवीन सुधारलेल्या इयत्तांतून विषय कमी केले आहेत ह्मणून अडचणी कांहीं नसाव्यात असा समज आहे. हायस्कूल मिडलस्कूल व मराठी शाळा या मधून नवीन इयत्ता प्रमाणें मी फेरफार केले आहेत ते असे:—

( अ ) हायस्कुला संबंधानें—शिकवितांना प्रश्नोत्तरें इंग्रजींत असलीं पाहिजेत. मराठी जन्मभाषा चटकन तोंडीं येतें तर निश्चयानें इंग्रजींतच सर्व सवालजबाब चालवावेत. असा क्रम झाला ह्मणजे अर्धे काम झालें असें मी समजतों. हल्लीं कमी विद्यार्थी पास होतात याला कारण तर हेंच कीं त्यांस इंग्रजी सोपा प्रश्न कळत नाहीं आणि भलतींच उत्तरें देतात. मुलांच्या अंतःकरण नंदींत शिक्षकानें पोहत असलें पाहिजे ह्मणजे च मुलांचें विचार सहज कळतील आणि शिक्षक व विद्यार्थी याच्या मध्यें ऐक्यभाव व प्रेम उत्पन्न होईल. हायस्कुलांतून भाषांतरपाठमाला काढल्या आहेत. आपल्या समक्ष भाषांतरें करण्यास विद्यार्थ्यांस लावलें पाहिजे ह्मणजे वाक्य रचनेची चांगली ओळख होते. हल्लीं भाषांतरांची घोंकपट्टी होत असल्यामुळें शेंकडा ७५ विद्यार्थी नापास होतात. वाचना विषयीं ही विशेष काळजी घेतली पाहिजे. मुलांचें वाचन अगदीं वाईट असतें. स्पष्ट उच्चार व योग्य स्थळीं विराम हे चांगले शिकविले ह्मणजे वर्ष भरा नंतर शिक्षकाचें काम आनंददायक होईल. वाचनाची गोष्ट प्रथम अवघड आहे पण ती परिणामीं अमृतासारखी आहे.

( ब ) मिडलस्कूला संबधानें- पहिले इयत्ते पासून मुलास पारसिंग शिकवावें. हा नियम चांगला असून थोडेजण तो पाळतात मराठींतल्या व्याकरणावरून इंग्रजी नांवें सांगून इंग्रजी व्याकारण लावण्यास शिकवावें. तृतीया वगैरे विभक्ती संबंधानें अडी येतील पण तीं स्थळें समजून दिलीं ह्मणजे झालें. हावर्डचें पुस्तक चांगलें आहे आणि त्याच्या जोडीला रायल रीडरही शिकवावें. दीर्घ व्याससंगानें कै० नामदार काशिनाथ पंत तेलंग दरदिवशीं ४०० पानें वाचीत होते. तास दीड तासांत आपणही १०० मराठी पानें वाचूं शकतों. भाषान्तरें मुलें पाठ करितात असा माझा अनुभव आहे. भाषांतर पाठमालेचीं बुकें सुंदर आहेत पण तीं वाईट शिक्षणानें वाईट ठरतात. ग्रंथकर्त्याच्या हेतुप्रमाणें चांगलें शिक्षण होत नाहीं ह्मणून तीं पुस्तकें बंद केलीं आहेत.

( क ) मराठी शाळा संबधानें--माझे सक्युलर पहा आणि त्या प्रमाणें वागा ह्मणजे झालें. रोजच्या रोज पाटीवर पुस्तकांतील दोन दोन ओळी लिहून आणविल्यानें बाळबोध शुद्धलेखन नामी होईल. शिक्षक ह्मणजे मातापितरांच्या योग्यतेचे आहेत तेव्हां त्यांनीं आपली जबाबदारी नीट बजावली पाहिजे.

(११) परीक्षा जवळ जवळ सारख्या होण्यासाठीं इनस्पेक्टरांस सूचना केलेलीच आहे. ती अमलांत आल्यानें सर्व प्रांतांत एकवाक्यता होईल.

( १२ ) नवीन इयत्तामध्यें इंग्रजी ३री आणि मराठी ६वी या इयत्ता इंग्रजी रेंगीज करून जवळ जवळ सारख्या आहेत. ह्मणजे इंग्रजी न शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस मराठींत निदान चांगली माहिती होईल.

(१३) टेनिंग कालेजची सुधारणा करण्याविषयीं मंजुरात मिळाली मिळाली पण दुःख वाटतें कीं पगारी विद्यार्थ्यांची संख्या कमी करून ९० करण्यांत आली आहे. ही संख्या अशीः---

| वर्ग | पगारी विद्यार्थी |
|---|---|
| १ ला | १० |
| २ रा | १९ |
| ३ रा | २९ |

नवीन व्यवस्थे प्रमाणें शिक्षक चांगले तयार होतील आणि अभ्यासक्रम जवळ जवळ म्याट्रीक्युलेशन परीक्षेच्या अभ्यासापर्यंत ठेविला जाईल.

(१४) यंदाच्या सालीं आनंदाची गोष्ट अशी कीं राजश्री भागवत यांनीं दुसऱ्या खेपेस आपला वेळ व पैसा खर्चून आगगाडी संबंधानें व्याख्यान दिलें. तसेंच डाक्टर मुधोळकर यांनीं सानिटरी प्रायमरचा विषय विशेष सुबोध करून दाखविला. तसेंच राजश्री पटवर्धन, डांगे, धर्माधिकारि व जोगदंड यांचीं व्याख्यानें चांगलीं झालीं.

( १५ ) स्त्री शिक्षणाचा जोंपर्यंत आपल्या देशांत अभाव अ'हे तोंपर्यंत देशाचें पाऊल पुढें पडावयाचें नाहीं. या संबंधानें राज्यकर्त्यांस विशेष आस्था आहे.

( अ ) मुलामुलींच्या पहिल्या तीन चार इयत्ता सारख्या असाव्यात. बाराखड्या, शब्द लिहिण्यास शिकणें आणि वाचण्यास शिकणें यांत फरक तो काय असणार ! लेखन, वाचन, व गणित ह्या गोष्टी मुलींसहि आल्या पाहिजेत.

( ब ) शिक्षक मंडळीस मी आग्रहपूर्वक विनंती करितों—मी हुकूम ह्मणत नाहीं—कीं आस्थापूर्वक मुलांच्या शाळांतून मुलाबरोबर मुलींसही शिक्षकांनीं शिकवावें. मास्तरांनीं या कामीं खटपट करावी अशी माझी त्यांस विनंती आहे. मुलीच्या शाळा ठिकठिकाणीं असूं शकत नाहींत तेव्हां ही व्यवस्था अमलांत येईल तर मला मोठा आल्हाद होईल.

(१६) नीतिशिक्षण वेगळें देण्याची जरूरी नाहीं. वाचनाच्या पुस्तकांतील धडे शिकविते वेळीं विद्यार्थ्यां पुढें चांगल्या रातीनें प्रतिपादन करावे, दाखल्यासह नीतितत्वांची ओळख करून द्यावी, आणि साधक बाधक गोष्टी नीट समजून द्याव्या ह्मणजे नीतिशिक्षण कांहीं वेगळें नको'.

( १७ ) शारीर शिक्षण—हें अवश्य पाहिजे आहे. पण पैशा संबंधानें मोठी नड आहे. सक्तीनें तालीम शिकवावी असा नियम केला तर त्या निमित्त लागणारा खर्च भागविण्याची सध्यां तयारी नाहीं. मनुष्यानें साध्य असेल तेवढ्यांतच अडचणी कमी केल्या पाहिजेत. अडचणी उत्पन्न करणारा मनुष्य खरोखर वेडा होय. प्रत्येक मुलाकडून रोज २९।२९ नमस्कार घालविले तरी पुरें आहे; परवां ट्रेनिंग कालेजांतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली तेव्हां त्यांचीं शरीरें पाहून हा मृत्यूचा दरबारच आहे असें मला वाटलें.

(१८) धंदे शिक्षण वगैरे विशेष शिक्षण—आपल्या देशाचा कच्चा माल या देशांतच पक्का होईल तेव्हां आपला देश सुधारेल. दारिद्र्य १९ विस्वें आहे, कांहीं तरी उद्योग काढला पाहिजे आपण गरीब पडलों तरी होईल तितका प्रयत्न केलाच पाहिजे. हल्लीं दुष्काळास प्रारंभ झाल्या बरोबर सर्व देशभर एकच ओरड झाली आहे! गोरगरिबांची व गरीब मास्तरांची दशा फार वाईट आहे. डरून काय उपयोग ! परमेश्वराच्या साह्या वाचून आपला देश सुधारणार नाहीं ह्मणून आपण परमेश्वराची एकचित्तानें प्रार्थना करावी.

## वऱ्हाड सामाजिक सभा.

या सभेची सातवी वार्षिक बैठक गेल्या शुक्रवारीं आकोले येथें भरली. अध्यक्षस्थानीं रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी होते. कामास सुरवात होण्याचे आरंभीं त्यांचे फार मनोहर भाषण झालें. राजश्री अण्णा साहेबांची भाषासरणी गोड व साधी असून विषयप्रतिपादन सरळ व सुगम रीतीनें केलेलें होतें, त्यांच्या भाषणाचा सारांश थोडक्यांत पुढील अंकीं देण्याचा आह्मी यत्न करूं.

सामाजिक सभेच्या वेळीं रा. रा. नारायण बाळकृष्ण कढी यांनीं आपल्या सुधारणेला धर्मबंधनें घालावीं ह्मणून सूचना आणिली होती. तसेंच राजश्री पन्हाळकर यांचें समयस्फूर्तीचें जोरदार भाषण ज्ञातीभेद मोडण्या विषयीं व पुनर्विवाहाची रूढी करण्याविषयीं झालें. रा० रा० व्यंकटराव मुधोळकर, गुप्ते वकील, संपतराव देशमुख, व नारायणराव हारकरे यांनीं भिन्न भिन्न रिपोर्ट वाचले.

प्रोफेसर धोंडो केशव कर्वे पुण्याहून मुद्दाम सामाजिक सभेला आले आहेत. गतवर्षी हे मतभिक्षा मागण्यास आले होते पण यंदा द्रव्यभिक्षा मागण्यास हे आले आहेत पुण्यांतील विधवागृहाच्या पोरक्या संस्थेला द्रव्याद्वारा मदत करण्या विषयीं प्रोफेसर साहेबांनीं मोठ्या सुरस भाषणानें विनंती केली. पुनर्विवाह आणि शिक्षण अशी दुहेरी मदत आपल्या हतभागी विधवास पाहिजे आहे.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBE 23 1896

The Resident paid in this week a flying visit to Berar. His visit is, it is reported, in connection with the prevailing distress in the province. We hope he did very well in having personally inspected the extent and intensity of famine. The measures will no doubt be liberal and prove true to a word the consoling message of Her Magisty the Queen Empress to save life at any cost. The relief-works is the real want of the day. The next relief should be in the manner of suspensions or remissions of land-revenue. People feel most at this time the pressing and ruinous enhancements in the land-tax. With a large balance in hand to the credit of the Berar administration, Mr. T. C. Plowden is expected to do immense good to the people of Berar.

Mr. T. C. Plowden's visit to Berar was a private one. We know enough of him. He is a plain, simple, and honest gentleman. We guess he meant no harm or insult to those who went to see him off on both the occasions of his arrival and departure at the Railway station. Officers and gentlemen went to the station-platform but they could not see him nor could he be aware that they are waiting for him. We are sorry to see these gentlemen return with a heart full of chagrin and discomfort. We hope that a note will be made of this event and care will be taken to consult the wishes of a visitor before the gentry will be asked to pay him due respect.

Lord Dufferein is a familiar name to India. He wielded the destinies of the Indian people for a period of five years and showed himself to be a successful Viceroy. Towards the close of his career, we have gained the first political privileges in India. His true and congenial element was however diplomacy and won the highest honor in his line as a diplomatist of the first type. Lately he retired from public life and at a public meeting at Belfast he delivered a thoughtful lecture on the English polities. His opinions are most valuable because they are the ripe fruit of long experience and direct contact with diverse phases of human life. He has a deep insight into human affairs and has observed very truly the real currents and springs of man's activities. He upholds in all earnestness that justice should prevail but is also sorry for the sad turn human conduct takes in its relation towards his fellow—brethren. Lord Dufferein observes to the effect.

FORCE VS. RIGHT

"Another conviction which has been borne in upon me during my long contact with the outside world is this, that, in spite of Christianity and Civilization —in spite of humanitarian philosophies, the triumphs of scientific knowledge, in spite of the lessons of history and the bitter experiences of the more recent past, force and not right is still the dominant factor in human affairs—( here, here )—and that no nation's independence or possessions are safe for a moment unless she can guard them with her own right hand ( Cheers. ) It should be remembered that the possession of a sufficient strength to command the respect of a nation's neighbours does a great deal more than guarantee a successful defence in the case of unprovoked attack. It also discourages and prevents a hundred irritating provocations and diplomatic collisions, unjust pretensions and impossible demands."

We feel that Force vs. Right is the real law in India. The persistent ill—treatment of the Indian people will illustrate this law in a number of instances of a daily occurrence. At the very threshold of our contact with the Anglo—Indians we deeply mourn the want of sympathy and the despotic turn of their minds. Let us hope that the principle of arbitration to which Lord Dufferein referred as a great lever to adjust the balance of European powers will teach a useful lesson to the British rulers to arbitrate upon the Anglo—Indian bureaucracy in the light of the suggestions of the National Congress. Here is Lord Dufferein's principle af arbitration:—

ARBITRATION.

"Though confessing that I have returned to England with ... anticipations than I could have wished, there has recently dawned above the horison a consolatory idea, which, in spite of the difficulties which may impede its development, will I trust, prove eventually, if not a remedy, at all events a mitigation of the risks of international strife—I mean the notion of erecting the principle of arbitration into a permanent and abiding instrument of peace and conciliation. (Cheers) As was sure to be the case, it is in the bosom of the Anglo—Saxon race that the suggestion has germinated, and if anything practical in the direction I have indicated is to be elaborated, I sincerely trust that America and ourselves may have the first honour of its invention. ( Cheers. )"

## वऱ्हाड

हवामान—ईश्वरी कृपा खरी ह्मणून थोडा पर्जन्य पडला आणि अमृतवृष्टी विपुल हाईल अशीं आकाशांतील लक्षणें सांगतात रोगराई विशेष नाहीं.

अलिशान रेसिडेंट मि. प्लोडन गेल्या १८ वे तारखेस वऱ्हाडांत आले आणि दुष्काळा निमित्त कानफरन्स भरवून शनिवारीं परत गेले.

रा० रा० विठुजी नारायण यांस वाशिमास व मि० शेर महमदखान यांस पुसदास तहशिलदार नेमिलें.

दुरुस्ती— आकोला मुनसिपाल कमिटीचे सेक्रेटरी रा० रा० शंकर गोविंद यांनीं गेल्या आठवड्यांत मेहेतर पट्टी संबंधानें जो जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे त्यांतील परिशिष्ट नमुने या अंकीं पुरवणींत प्रसिद्ध केले आहेत ते त्या जाहिराती बरोबर वाचण्यांत यावे.

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९६॥ रुपये |
| जवारी | ९९ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२९ रु० |
| ,,( बनशी ) | १३९ रु० |
| चणे | ९९ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ७ मण |
| सोनें | २९ तोळा |
| चांदी | ८३ |

नोटीस

रा० रा० नंदराम उदाराम मारवाडी वस्ती मौजे घोडेगांव तालुके अकोट जिल्हा अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हांस कोर्टाचे काम चालविण्यास कुलमुखत्यार पत्र दिलें असून सदरहू प्रमाणें तुम्हांस मी दिलेले कुलमुखत्यारपत्र आज तारखे पासून रद्द केले आहे. तारीख २१ माहे नोवेंबर सन १८९६ इसवी. दस्तुर रामकृष्ण राजाराम पी.

सही

हरप्यारी भ्र० बलदेवदास

वस्ती घोडेगांव निशाणी

खुद्द हातची.

## वर्तमानसार.

व्हेल मासे विजेच्या धक्यानें मारण्याची युक्ति काढली आहे.

मुंबई इलाख्याचें इ० स० १८९४।९५ सालेंच छापी कागदांचे उत्पन्न सवाएकसष्ठ लाख रुपये झाले आहेत.

पारिस शहरांत एक राक्षसी दुर्बीण तयार होत आहे. तिनें चंद्र पृथ्वीपासून सुमोंर एक मैलाच्या अंतरावर असल्यासारखा दिसेल.

अमेरिकेंत एकानें पऱ्याचें मांजर तयार केलें आहे. त्याला रंग लाविला आहे त्यानें तें रात्रो चकाकतें व त्यास पाहून उंदीर घुशी पळून जातात.

केवळ अन्नामुळें कोणी प्राणी विव्हळ झाल्याची खात्री झाल्यास त्यास पोटास द्यावें व बिल करावें, अशा तऱ्हेचा हुकूम तालुक्यानव्हिाय सातारा कलेक्टरकडून गेल्याचें कळतें. ठा० आ०

आफ्रिकेच्या पूर्वेला कोलव्हे या नांवाच्या गांवीं एका रानांत एक झाड आहे. त्याला जो कोणी स्पर्श करितो, तो तत्काल वेडा होऊन रानांत इकडे तिकडे भटकत फिरूं लागतो. त्याचें देहभान नाहींसें होतें वगैरे गोष्टी ऐकून कांहीं सोल्जरांनीं त्या झाडाजवळ जाऊन त्याला स्पर्श करण्याचा मनाचा पक्का निश्चय केला. त्यांपैकीं एकानें आपल्या जिवाचा धडा करून त्या झाडाला हात लाविला मात्र. तोंच त्याचें डोकें संतापानें लाल झालें. त्याला कांहीं सुचेनासें झालें, तो रानांत इकडे तिकडे पळत सुटला. व शेवटीं तो इतका बेहोष झाला कीं त्यानें त्या आवेशांत पांच सात लोकांचे खून केले. त्याला धरण्यासाठीं दुसऱ्या शिपायांनीं पराकाष्टा केली. परंतु ती व्यर्थ. त्यांपैकीं एक शिपाई त्याचा पाटलाग करीत असतां त्याचाही त्या झाडाला स्पर्श झाला त्याचीही स्थिति त्याच्या सारखी झाली. आणि त्यानेंही पांच चार खून केले. ही गोष्ट पुढें सरकारांत समजतांच त्यांनीं त्या झाडाच्या भोंवतीं वाळलेलें गवत व लांकडें यांचें आळें करून तें पेटवून दिलें. तें झाड जेव्हां जळून खाक झालें तेव्हां ते लोक पुनः शुद्धीवर आले व खून होण्याचें बंद झालें. कर०

मुंबई बांकेचा व्याजाचा दर शेकडा ७ टके करण्यांत आला आहे.

प्रिन्स बिस्मार्क यांचें मत जर्मनी व रशिया यांच्यामध्यें झालेल्या सलोख्याच्या तहांत जर्मनी इंग्लंडचें घोडे बिलकूल पुढें येऊं देणार नाहीं असें आहे.

बार्शीच्या तुरुंगांत हल्लीं कैदी ठेवण्यालाही जागा नसून ज्या कोठड्यांत ४, ५ कैदी असावयाचे तेथें २०-२० पर्यंत कैदी खेचून भरले आहेत ह्मणतात.

नुकत्याच मिळालेल्या बातमीवरून असें समजतें कीं, हिंदुस्थानांतील पूर्व व दक्षिण भागांत लवकरच पर्जन्यवृष्टि व्हावी अशीं चिन्हें इकडे दिसत आहेत.

कडापा तालुक्यांत कित्येक लोक मशाली पेटवून रात्रीचे प्रसंगीं लूट करण्यास निघूं लागले आहेत त्यामुळें वंदाज लोक आपलीं घरें सोडून तालुक्याच्या गांवांत रहावयास जाऊं लागले आहेत. बुदवल, वलूर, डांगडी व पाली या गांवांतील धान्याचे बाजार लुटले गेल्याची बातमी आली आहे, तेथील लोकांनीं मद्रास सरकाराकडे आपलें संरक्षण करण्याबदल अर्ज केला आहे. स. वि.

संकेश्वर येथें १ सोनार अन्नपाणी सोडून पावसा साठीं डोंगरावर देवळांत ८ दिवस पडला होता. त्याची मेघराजास दया येऊन वृष्टी होऊन लोक आनंदी झाले. ७।८ शें लोकांनीं जाऊन मोठ्या समारंभानें त्या सोनारास गांवांत आणिलें.

धन्यवाद— नासिक येथील गृहस्थ रा. रा. दामोदर बळवंत आठवले इनामदार यांनीं असें कळविलें आहे कीं, अनाथ हिंदूंचीं बारा मुलें पोसण्यास मी तयार आहे. त्यांना आणविण्याचा खर्च मी करीन. व दुष्काळ संपल्यावर तीं ज्याचीं त्यांस परत देईन परंतु तीं मिशनरी लोकांना देऊं नयेत ही खरी धर्माची कळकळ. इतरांनीं असा हात पुढें केल्यावांचून सोय नाहीं.

मध्य एशियेंत रशिया सरकारचे दोन नवीन रेलवेचे रस्ते ता० २७ आक्टोबर रोजीं सुरू झाले.

दीप माशा— अमेरिकेंतील मेक्सिको, हवान्ना, व ब्राझील वगैरे देशांत प्रकाश देणाऱ्या एक प्रकारच्या माशा आहेत. ह्या माशांच्या पंखांपासून चांगलें वाचतां येण्यासारखा प्रकाश पडतो. तिकडील लोक रात्रींच्या वेळीं आपल्या बुटावर ह्या माशा चिकटवितात; आणि सर्पही त्या प्रकाशाला भितात ! तिकडील स्त्रियाही ह्या प्रकाशद माशांची योजना आपल्या सुंदर केशकलापांत जवाहिरांचें ठिकाण करून शोभा आणीत असतात !

हंगारी प्रांतांत इलेक्शनांच्या संबंधानें दंगे होऊन त्यांत गोळ्या घालण्या पर्यंत मजल येऊन बरेच लोक जखमी झाले आहेत.

गांव ओस पडले.—करमाळें तालुक्यापैकीं मौजे रुई येथील सर्व लोक पोटाकरितां देशोधडी गेले. फक्त पाटील कुळकर्णी गांवांत राहिले आहेत. याचप्रमाणें अनेक खेडीं पाडीं लवकरच बेचिराख होण्याचा रंग दिसत आहे. क. त.

हिंदुस्थानांत दुष्काळ पडल्याची बातमी एकून रशिया देशांतील वर्तमानपत्रें वर्गणी जमवून हिंदुस्थानांत रुपये पाठवावे असें तेथील लोकांस सांगत आहेत. व रशियांतून हिंदुस्थानांत गहूं पाठवून ते स्वस्त दरानें विकता यावें अशी तजवीज तिकडील मुत्सदी करीत आहे. न्या. सु.

मुंबईतील व कलकत्यांतील साथीच्या रोगानें हल्लीं नवें रूप घेतल्याचें ऐकण्यांत येऊं लागलें आहे. मुंबईत साथीच्या आरंभीं उंदीर घुशी मेल्या, तशींच हल्लीं त्या साथीनें खबुतरें मराभर मरूं लागलीं आहेत.—कलकत्यांतील साथीचा असा चमत्कार आहे कीं,—पांच मिनिटांच्या आंत एकाएकी मनुष्य मरण पावतें–विकार इजा वगैरे कांहीं होत नाहीं!

परिक्षेच्या निकाल तारखा—युनिव्हर्सिटीच्या यंदांच्या परिक्षांचे निकाल दिजंबर महिन्यांत होणार, त्यांच्या तारखा पुढें लिहिल्याप्रमाणें ठरल्या आहेतः—इंटरमीजिएट ता० ९ दिजंबर; एल्. सी. ई. ता० १०; एम्. ए. ता० १२; एल्. एम्. एस्. ता० १४; प्रीव्हियस १५; म्याट्रिक्युलं० १७ दिजंबर; बी. ए. व फर्स्ट एल्. एल्. बी. १८ दिजं०; आणि सेकंड एल. एल्. बी. २० दिजंबर.

सिलोन ( लंकाबेट ) येथें उपवर मुलींचा भरणा फारच झाला असून त्यांस नवरे मिळत नाहींत ह्मणून अमेरिकेंत त्या मुली नेण्याचा विचार तिकडील वर्तमान पत्रांतून येऊं लागला आहे!!

सर्पदंशावर विंचवाचें तेल हें दिव्य औषध आहे असा विलायती डाक्टरांचा अनुभव 'नेचर' पत्रांत लिहिला आहे. तेलांत जिवंत विंचू घालून ठेविले ह्मणजे ते आंत मरून जाऊन त्यांचें जे तेल बनतें. तें तेल सर्पदंशाच जागेवर न लावितां सभोंवार लावावे ह्मणजे विष उतरते असें त्यांचें ह्मणणें आहे.

पुणें येथें कोणी मि० प्लेंकेट यांची सही घालून लिहिलेले जाहिरनामे जागोजाग चिकटविले होते असें ह्मणतात. त्या जाहिरनाम्यांत असें लिहिलें होतें कीं, दुष्काळ फंडाचे २४ कोट रुपये सरकारच्या तिजोरींत आहेत व ते हुंडणावळीच्या वगैरे रूपानें गोऱ्या लोकांचे पदरांत पडले आहेत ते बाहेर काढून दुष्काळ पीडित लोकांची तजवीज आठ दिवसाचे आंत न केली तर लोकांस योग्य ते उपाय करणें भाग आहे. हे जाहिरनामे पोलिसानें काढून नेले असें समजतें. स. शो.

बंदी— तुर्कस्थानच्या सुलतानानें मुंबईचें टा० ऑफ इंडिया पत्र आपल्या राज्यांत कोठेंही येऊं देऊं नये असा हुकूम फिरविला आहे.

अमेरिकेंतली संपत्तिमता— न्यूयार्क शहरांतली सर्व संपात्ति जर सारखी विभागली तर ती माणशीं ७५० पौंड प्रमाणें वाटली जाईल एवढी संपत्ति पृथ्वीवरील कोणत्याही शहरांत नाहीं. ज्ञा. च.

मुंबईचे धर्मात्मे शेट्ये सर पेटिट, मेसर्स टाटा, लखमीदास खिमजी, मुळजी जेठा, वगैरेनी दुष्काळ निवारणार्थ वर्गणीनें लाखों रुपयांची रकम जमा करण्याचें ठरविलें असून त्या प्रमाणें १२ जणांनीं मिळून ६९,००० रुपये जमाही केले.

पुष्कळ रशियन वर्तमानपत्रें हिंदुस्थानांतल्या दुष्काळग्रस्त लोकांच्या मदतीकरतां वर्गणीनें पैसा जमविण्याच्या उद्योगास लागले आहेत असें १२ ची तार सांगत्ये. आणि रशियन लोक आमच्या करितां इतकी काळजी करूं लागले हें पाहून आश्चर्य वाटतें. अ. द.

---

नोटीस

सिवलाल गुलाबचंद दुकान पलसी तालुके जळगांव वहिवाटदार सेवाराम मारवाडी यासी.

आह्मी खाली सह्या करणार वस्ती बावनबीर तालुके जळगांव जिल्हा अकोले याजकडून तुह्मापासून आह्मी चौघांनीं जवारी खंडी १३॥ साडे तेरा चार शेरी मापीचा सवदा पेवातली जुनी जवारी शेंभर १०० देण्याचे कबूल करून मिती भाद्रपद वद्य ४ रोज शनिवार शके १८१८ मुताबीक तारीख २६-९-९६ इसवी रोजीं टिकीट लावून रुजू करून दिली पुढें यादवही प्रमाणें मोहोनलाल मारवाडी दुकान पळशी याचे घरांत जाते वेळेस दरवाज्याचे डावे बाजूस पेंव आहे तें खोदण्यास तुह्मी सांगितल्याप्रमाणें तुमचे समक्ष मजूर लावून तारीख २७ रोजीं पेव उकरलें असतां जवारी निघाली नाहीं. पेव खालीं आहे या साठीं सवदा झाल्या प्रमाणें जुनी जवारी खंडी १३॥ नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत मोजून द्यावी नाहींपेक्षां आपसांत तोडजोड करून नफ्याबद्दल रकम जो ठरेल ती देण्याची तजवीज करावी. बाजार भाव सवदा झाल्या पासून दररोज तेजीचा आहे सबब कळविले आहे. जर तसे तुह्मकडून होणार नाहीं तर तुह्मी आह्मापासून रुजू करून घेतलेली रकम वजा जातां जी बाकी नफ्याची बाजार भावा प्रमाणें होईल ती व नोटीसीचा खर्च तुह्मां भरून घेण्या बद्दल योग्य कोर्टांत दावा केला जाईल. तारीख १४ माहे नोवेंबर सन १८९६ इसवी.

सह्या

रामु वल्लद सदाशिव कानडा<br>
गंगाराम मनोहर नाईक<br>
तुकाराम वल्लद रंजाजी<br>
बळवंत बापूजी.

---

नोटीस.

( १ ) गंगाराम वल्लद भोनासा सोनार ( २ ) लहानी मर्द गंगाराम उभयतां राहणार डोंगरगांव तालुका बाळापूर, आणि ( ३ ) मिरा मर्द रामुसा राहणार, उटीबुगी तालुके नेहकर—त्रिवर्ग हल्लीं राहणार बाळापूर—यांस.

खाली सही करणारीण इजकडून या लेखानें कळविण्यांत येतें कीं माझा नवरा नथोबा सखाराम सोनार यांस मरण पाऊन अदमासें तीन महिने झाले. तुह्मी त्रिवर्ग नाते वाईकांनीं माझ्या नवऱ्याच्या मरणानंतर बाळापूर येथील बंद केलेल्या राहत्या घराचें कुलूप माझ्या मागे व संमती शिवाय उघडलें आणि आंतील चीजवस्तूची अफरातफर सुरूं केली. आणि तुह्मी अद्याप घरातच आहा. नात्यातल्या लोकांनीं पाहुणे ह्मणून राहण्याची सीमा झाली ह्मणून तुह्मास माझ्या घरून जाण्या विषयीं निक्षून सांगितलें तथापि तुह्मी माझ्या मनाईला झुगारलें नाहीं. तुमचा बेत माझीं इस्टेट लुबाडण्याचा व मला विनाकारण त्रास देण्याचा दिसतो. ह्मणून ही अखेरची नोटीस पोचल्या नंतर आठ दिवसाचे आंत घर खाली करावें आणि जाते वेळीं माझ्या घरांतल्या चीजवस्तूंचा झाडा द्यावा असें घडून न आलें तर तुह्मा त्रिवर्गावर फौजदारी चालवूं आणि त्या शिवाय प्रत्येक दिवशीं घरीं राहण्या बद्दल माणशीं चार आणे भाडें पडेल. आणि हें भाडें दिवाणी कोर्टाच्या हुकूमानें तुह्मास काढून देई पर्यंत द्यावे लागेल. कळावें. तारीख १९ नावेंबर सन १८९६ इ०

सही

सखु मर्द नधु सोनार राहणार<br>
बाळापूर हल्लीं आकोला इच्या हातची<br>
निशाणी.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७
साल अखेर ,, ७ ,, १ ८
किरकोळ अंकास.......................४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........४१ ८६
दुसरे खेपेस ..........४१

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 ac 5
Six monthly......... 3 ...... ... ...,, 8 as
Single copy ............... ...... .. 4 as

Advertisement.
Below 10 lines ,.. 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX | AKOLA MONDAY 30 NOVEMBER 1896 | NO 46

वर्ष ३० | आकोला सोमवार तारीख ३० माहे नोवेंबर सन १८९६ इ० | अंक ४६

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ११ शके १८१

## वऱ्हाड सामाजिक सभा.

गेल्या २० वे तारखेस आकोल्यास वऱ्हाडसामाजिकसभा भरली होती त्यावेळी रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी हे अध्यक्षाच्या नात्यानें प्रारंभीं बोलले. त्यांच्या भाषणांतील मुख्य मुख्य मुद्याच्या गोष्टी आह्मी खालीं देतों:—

गुदस्त खालीं उमरावतीस या सभेनें ठराव केला आहेच कीं सभेचे जे सभासद असतील त्यांनाच मात्र सभेंत बोलण्याचा अधिकार आहे. गुदस्ता पुणें येथें राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद् न भरतां निराळ्या मंडपांत भरली हें सर्वांस माहित आहेच. राजकीय प्रश्नांचा विचार ज्या स्थळीं होतो त्या स्थळीं सामाजिक विषयाचा विचार होणें बरोबर न वाटल्यावरून वर सांगितल्या प्रमाणें राष्ट्रीय सभेचा व सामाजिक सभेचा संबंध तुटला. हा झालेला वियोग एक प्रकारें ठीक झाला असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण लोकसमाज साधारणतः दुटप्पी असतो. ह्मणजे लोक वाटेल तेव्हां या बाजूस व वाटेल तेव्हां त्या बाजूस जातात. वाटेल तेव्हां अनुकूळ होतात व वाटेल तेव्हां प्रतिकूळ होतात. अशा लोकसमाजांत खरे एकमताचे लोक कोणते, खोटे कोणते व अधले मधले कोणते याची निवडा निवड करणें इष्ट आहे. व वर सांगितल्या प्रमाणें सामाजिक सभेचा मंडप निराळा झाल्यामुळें ही निवड करण्यास फार सोपें जातें. निराळा मंडप झाल्या कारणानें अर्थात समाजास येणारी मंडळी समाजास अनुकूळ आहे हें उघड आहे. या समाजास निराळा मंडप झाल्यामुळें दुसरा ही एक फायदा झाला तो असा कीं आपल्या पैकीं पुष्कळ लोक सरकारी नौकरींत असल्या कारणानें राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक विषयांची चर्चा करण्यास बाध होता; तो हा कीं सरकारी हुकुमा अन्वयें राष्ट्रीय सभेंत सरकारी नौकरांचें अंग असूं नये; अशा सरकारी नौकरांना आतां निराळा मंडप झाल्यामुळें या समाजास येण्यास व त्यांत खटपट करण्यास कोणत्याही तऱ्हेचा प्रतिबंद राहिला नाहीं हें फार उत्तम झालें. ज्यांच्या प्रयत्नांनें ही सभा राष्ट्रीय सभेच्या मंडपांतून बाहेर निघाली त्यांनीं ह्या कृत्यामुळें आपले पायावर धोंडा पाडून घेतला अगर काय केलें वगैरे गोष्टींचा विचार करणें प्रस्तुत प्रसंगीं अनुचित होईल. गेल्या सालच्या रिपोर्टावरून सहज लक्ष्यांत येईल कीं सर्व देशभर या सभेचे कळकळ बाळगणारे कैवारी पुष्कळ आहेत. त्यांत जे पुढें आले आहेत त्यांनीं तर या कामीं देह झिजवून पैसा व वेळही खर्चिला आहे. चोहोंकडून असा आक्षेप येतो कीं हे सर्व सुधारक केवळ तोंडानें गप्पा मारणारे असून अर्थशः कांहीं एक न करणारे लोक आहेत. व या आक्षेपाचे बोलक्या सुधारकांनीं आपल्या कृतीनें निर्मूलन करणें रास्त आहे. तरी पण या आक्षेपावरूनच उघड होत आहे कीं लोकांत सत्यप्रियतेची चाड अधीक होत चालली आहे. ही गोष्ट लहान नव्हे. ही आनंद मानण्या सारखी मोठी महत्वाची गोष्ट आहे.

कित्येक लोक सह्या देण्यास नाखूष असतात परंतु शुद्ध आचरण ठेवण्याची प्रतिज्ञा करितात. या प्रकारचे लोक पुष्कळ दिसून येतात. बोलून न दाखवितां खरें करून दाखविणारे लोक चांगले. व हे सर्व या समाजास अनुकूल आहेत. करितां फक्त ज्या विवाक्षित गृहस्थांनीं सह्या दिल्या आहेत तितकेच समाजास अनुकूल आहेत असें नव्हें तर त्यांहून ही वर सांगितलेले पुष्कळ इजोरे लोक या समाजाचे सभासद आहेत असें मानण्यास हरकत नाहीं.

या सभेचें नांव 'वऱ्हाड सामाजिक परिषद्' ठेवण्यास वऱ्हाडच्या कोणत्या लोकांनीं या समाजास अधिकार दिला असा आक्षेप कित्येक घेतात. त्यास उत्तर हें कीं या नामाभिधानाचा अर्थ वऱ्हाडांतील सामाजिक सभा इतकाच आहे; ह्मणजे जसे आपणास असें जर कोणी ह्मटलें कीं कां हो तुह्मी कोण तर आपण सहज ह्मणतों कीं बुवा आह्मी धुळेकर अगर अकोलेकर इत्यादि आहोंत ह्मणजे आह्मी धुळयास अगर अकोल्यास राहणारे आहोंत या पलीकडे अर्थ नाहीं.

कांहीं लोकांचा असाही आक्षेप आहे कीं एका कलमांत जरी नुसती सही टाकली तरी समाजाचे सभासद होतां येते तर मग असल्या समाजापासून काय अर्थ? मालें साहेबांच्या मताप्रमाणें या पक्षाचे लोकांचा भाव कीं असल्या प्रकारच्या लहान सहान बाबतींत सुधारणा करण्यांत हांशील नाहीं वेळ मात्र मोडेल. कांहीं कालपर्यंत स्तब्ध बसून जेव्हां आपोआप सुधारणेची आवश्यकता ढळढळीतपणें लोकांच्या नजरेस येईल तेव्हां तो अंमलांत आणण्याच्या दिशेकडे साहजिकच लोकांची वृत्ति कलेल व सुधारणा चटकन होईल. या आक्षेपाचा जोर विशेष सकळ रीतीनें एकाच कलमा संबंधानें विशेष दिसून येतो. इतर कलमा संबंधानें तसा दिसून आला नाहीं. मुलीचे लग्नासंबंधानें ८।९ व मुलाचे लग्नासंबंधानें १९ वर्षाची ईयत्ता पाळण्याच्या प्रतिज्ञेंत विशेषसा अर्थ दिसत नाहीं. कारण पुष्कळ सुधारणा प्रतिकूल लोकही त्या मर्यादेपर्यंत आपल्या मुलांस व मुलीस अविवाहित ठेवतात या वया संबंधानें कलम घालण्याची जरूरी नाहीं असें आतां या ९।६ वर्षातच आढळून आलें. यावरून या वर्षाचे आंतील मुलीस बालवैधव्य प्राप्त होण्याचा संभव तरी बराच कमी झाला ही विशेष अभिनंदनीय गोष्ट आहे.

मुलामुलींचीं प्रौढपणीं लग्नें व्हावीं ही जरूरी हल्लींच्या काळाला विशेष आहे. शरीरसंपत्ति कमी होत चालली आहे. तेव्हां वयाची मर्यादा वाढवून शरीरसंपत्ति चांगली असतांना समागम घडेल तर प्रजा क्षीण व अल्पायु होणार नाहीं.

स्त्री शिक्षणा बद्दल लोक सह्या देतात पण ते आपल्या मुली प्रमाणें सुनांस शिक्षण देत नाहींत. प्रत्येकानें आपापल्या मनाशीं पाहून हा आक्षेप दूर करावा ह्मणजे झालें.

सुधारका पैकीं कित्येक दारू पितात ह्मणून समाजांत येण्यास लोक नाखुष असतात तथापि शोधांतीं असें आढळतें कीं सह्या देऊन दारू बेधडक पिणारे लोक विरळा; शिवाय पूर्वीं दारू पीत होते पण अलिकडे या व्यसना पासून मुक्त आहेत असे पुष्कळ आढळतात.

लोकसमूहाला सामाजिक सुधारणे विषयीं अनुकुळ करण्यासाठीं मोठमोठ्या सभा भरवून व्याख्यानें देण्यांत मला कांहीं अर्थ दिसत नाहीं. खानगी रितीनें हें काम फार चांगलें होतें. माझा समज आहे कीं शहाण्या मंडळीशी बोलून त्यांस सुधारणेला अनुकूळ करून घेणें कठीण नाहीं. ही गोष्ट चांगली सफळ होते. ज्या प्रमाणें पूर्वीं पार्लमेंटांत जाण्यासाठीं मत देणाऱ्या लोकांस दारू पाजवून त्यांची अनुकूळ मतें गोळा करीत असत तद्वत् जनसमूहाची अनुकुळता संपादण्याल सभा, व्याख्यानें वगैरे उपाय आहेत. साधारण लोकांस फारसा विचार नसतो. जे लोक चांगले ह्मणून असतात त्यांच्या वागण्या प्रमाणें हे लोक वागतात. पूर्वीं ब्राह्मणांनीं या साधारण लोकांचीं अशी भक्ती मिळविली होती. हल्लीं अज्ञानरूपी दारू पिऊन मत देणारा असा जनसमूह आहे तेव्हां त्यास मत देण्याचा अधिकारच नाहीं. मोठमोठ्या गोष्टींचें समालोचन करून मत देण्यासारखा हल्लींचा समाज नाहीं.

समाजाच्या सभासदांस बंधनें तीन प्रकारची आहेतः—पहिलें, सुधारणा व्हावीं अशी आपली इच्छा होय. दुसरें, मी वचन देतों कीं माझ्या प्रतिज्ञेप्रमाणें मी शुद्धाचरण ठेवीन. आणि तिसरें, समाजाला माझ्या मताला वळवून दुसऱ्याचें कल्याण करीन. हें त्रिधा वचन अनुक्त होय. हें आपण पाळलें ह्मणजे निराळें बंधन नको.

आजपर्यंतचा आपला प्रयत्न एकटा दुकटा आहे. जुटीनें काम होण्यासाठीं मंडळी निवडून तिनें लोकांस भेटून त्यांचीं मनें वळवावीं, अनुकूळ झालेल्या लोकांच्या सह्या घ्याव्या, आणि सह्या करणारे लोक तसें शुद्धाचरण ठेवितात किंवा नाहीं याची नोंद ठेवावी. जरूर पडल्यास या उद्योगासाठीं वर्गणीही जमवावी. दुसऱ्या मंडळीनें घरांतल्या घरांत लेख व चुटके लिहून लोकांस सुधारणे विषयीं सन्मुख केलें पाहिजे. अशा कृत्याला तत्वमसि पाहिजे तेव्हां योग्य विचार करून व्यवस्था करावी.

यंदाचें साल आपत्तीचें आहे. आपत्काळ येणें चांगलें नाहीं पण वेळ बेतली आहे तेव्हां समाजाच्या सभासदांनीं खरोखर अंगमेहनत करून द्रव्यद्वारा हस्तेंपरहस्तें आपल्या बांधवास मदत करावी. ह्या विनंतीला आपण अवश्य मान द्यावा.

समाजाच्या कामगार व सहकारी मंडळीस सांगणें असें कीं सतत वर्षभर श्रम करणें आपलें कर्तव्य आहे. निदान तीन तीन महिन्यांनीं किती काम झालें याचा अंदाज घ्यावा. यशप्राप्ती ईश्वराच्या आधीन आहे तरी खऱ्या मनोभावानें झटणें मनुष्याच्या आधीन आहे.

सामाजिक सभा ही नोंदणीची सभा आहे. वऱ्हाडांत सुधारणा कोठें कोठें व काय काय होत आहे याचा इतिहास लिहून ठेवण्याचें काम ही सभा करीत असते. सत्कृत्याचा उद्धार व्हावा. एवढाच सभेचा लहानसा व नम्र उद्देश आहे. दुसऱ्या पुढें चांगली गोष्ट मांडावी याच धोरणावर कांहीं रिपोर्ट आपल्या समोर वाचण्यांत येतील.

सुधारणा आपोआप होईल असें समजूं नका. कालमहिमा, कलियुग, किंवा कालमान ह्मणजे कांहीं वाफेची शक्ती नाहीं. अर्थात त्याच्यामुळें कोणतीच घटना चालणार नाहीं. चालक शक्ति मनुष्यामध्यें आहे. मनुष्याचे आचार विचार हीच काय ती शक्ति होय. ही शक्ति सफळ होण्यास काल लागतो. काल व दिक् या मर्यादा आहेत. त्यामध्यें आपली शक्ति आहे. कालावर भरंवसा ठेवून आपण वागूं नये. आपण मनोभावें यत्न केला पाहिजे.

आपल्या कृत्याला यशप्राप्ति झाली नाहीं तर त्याचा अर्थ असा कीं समाजाला ओढण्या इतकी आपली शक्ति समर्थ नाहीं. आपण आपल्या पूर्वजांच्या कृतीचा लाभ घेत आहों तर तें ऋण फेडण्यासाठीं आपली पांचवी सहावी पिढी आपल्या कृतीचें फळ भोगील या आशेवर आपण प्रयत्नशील अ-

सर्जे पाहिजे. खटपट न करणें हा पाजीपणाच आहे. निदान समाधानवृत्तीनें पुढील विध्यासाठीं आपण प्रयत्न केला पाहिजे.

## सुधारणा आणि तिचे प्रचारक.

गेल्या मंगळवारीं सांयकाळीं येथील नेटिव जनरल लायब्ररी मध्यें प्रोफेसर धोंडो केशव कर्वे यांचे व्याख्यान ' सुधारणा आणि तिचे प्रचारक ' या विषयावर झालें. अध्यक्षस्थान रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर यांनीं स्वीकारलें होतें. व्याख्यानांत प्रौढपणा विशेष होता. विचार सरळ, उपयुक्त व वजनदार होते. व्याख्यात्याची मुद्रा गंभीर व वृत्ति अती शांतपणाची होती. आमच्या एका मित्रानें त्या भाषणांतील मुख्य मुख्य मुद्यांचें टिपण आह्मांकडे धाडलें आहे तें आह्मी आमच्या वाचकासाठीं प्रसिद्ध करीत आहों:—

सुधारणा हा शद्ब बहुव्यापक आहे तथापि त्याचा अर्थ व्याख्यानापुरता ' सामाजिक सुधारणा ' असा घेऊं. सामाजिक सुधारणा हे शद्ब लोकांस चांगले परिचित आहेत. सुधारणा ह्मणजे पूर्वीच्या स्थितीपेक्षां अधिक सुखदायक स्थिती. परंतु सुधारणेचा रूढ अर्थ अगदीं निंदाव्यंजक आहे आणि असा भलता अर्थ रूढींत येण्यास कारण सुधारकांचें आचरण होय. सुधारणा व सुधारक या नांवाला शोभण्यासारखे लोक निपजतील तेव्हां खरा अर्थ समजेल. या विषयाचा मार्मिक रीतीनें विचार करितां येण्यासाठीं त्यांत ज्या गोष्टींचा अंतर्भाव होतो त्या गोष्टी कळल्या पाहिजेत. त्या गोष्टींचें वर्गीकरण केलें ह्मणजे विशेष फायदा हा होतो कीं त्यांचें स्वरूप विशेष स्पष्टतेनें कळेंत.

वर्गीकरणाचे कांहीं प्रकार मी सांगतों. यापेक्षां जास्तही प्रकार असूं शकतील पण त्यांतील कांहींचें उद्घाटन मी करणार आहें.

प्रकार पहिलाः—पायरी पायरीनें होण्यासारख्या सुधारणा आणि उडी मारून एकदम करावयाच्या सुधारणा. पायरीपायरीनें होणारी सुधारणा ह्मणजे जसे, प्रौढ वयांत मुलामुलींचीं लग्नें करणें. गेल्या १५।२० वर्षांपूर्वीं मुलींच्या वयाची मर्यादा ७।८ होती ती हल्लीं ९॥--१० झाली आहे ही सुधारणा सुधारक किंवा असुधारक यांच्यामध्यें तंटे न होतां होत असते. पण पायरीनें नाहीं अशी सुधारणा ह्मणजे, उदाहरणार्थ, विधवांचे केशवपन बंद करणें. अशा सुधारणेंत तंटा होण्याचा संभव विशेष असतो आणि धर्म संबंधीं प्रकरणांत बहिष्काराचें कारण देखील घडतें.

वर्गीकरणाचें दुसरें तत्व सुधारणेच्या परिणामावर बसविलें आहे. कांहीं सुधारणांचे परिणाम व्यक्तिमात्रावर ढळढळीत असतात आणि त्यांत वस्तुमात्रांचा तात्कालिक फायदा दृष्टी समोर असतो. उदाहरणार्थ, लग्नसंबंधीं खर्च कमी करणें. पूर्वीं जेथे १००० रुपये खर्च होत होते तेथें १०० ५० रुपयातच कार्य होतें. व्यक्तिमात्रावर परिणाम ढळढळींत नसतात. अशा सुधारणा म्हणजे भिन्न भिन्न जातीच्या लोकामध्यें शरीर संबंध व अन्नसंबंध चालू होणें ( मी उल्लेख केलेल्या सुधारणा मला पसंत आहेत असें मात्र कोणी समजूं नये ) सर्व मनुष्यें एकाच ईश्वराचीं लेकरें आहेत या दृष्टीनें ही सुधारणा बरी असेल. तसेंच एका गोत्रांतील स्त्री पुरुषांचे विवाह होऊं नयेत या सुधारणेचें समर्थन वैद्यशास्त्राच्या तत्वावर करीत असतात पण यांचे परिणाम व्यक्तीच्या दृष्टीनें फार सूक्ष्म आहेत. कदाचित् राष्ट्राच्या संबंधानें, हे परिणाम फार मोठे असतील.

वर्गीकरणाचा प्रकार ३ राः—कित्येक सुधारणांना मनुष्याच्या साधारण वृत्तीकडून प्रोत्साहन मिळतें. उदाहरणार्थ, विधवा विवाह. संन्यस्त वृत्तीनें विधवांनीं रहावें हें फार चांगलें होय पण १०० विधवा पैकीं ९९ विधवांस नैसर्गिक मनोवृत्ती पुनर्विवाहाला प्रोत्साहन देत असतात. आगंतुक बंधना मुळें नैसर्गिक प्रबळ मनोवृत्ती कोंडल्या प्रमाणें होत असतात. तसेंच ३० वर्षांचा विधूर किंवा अविवाहित असला तर त्याच्या मनोवृत्ती प्रमाणें तो १२।१३ वर्षांच्या मुलीशी विवाह करणार नाहीं पण तो आगांतुक कारणामुळें तसेंच करितो.

प्रकार ४ थाः—कांहीं सुधारणा गुप्तपणें व कांहीं उघडपणें करावयाच्या असतात. पुनर्विवाह किंवा भिन्न जातीयाशी विवाह हे उघडपणें करावे लागतात. गुप्त सुधारणेचें उदाहरण, ऋतुप्राप्ती नंतर कुमारिकांशीं लग्न करणें मातापितरांस ही गोष्ट झाकून ठेवूनही करितां येतें.

प्रकार ५ वाः—धर्माशी विरोध करणाऱ्या सुधारणा जसें, ऋतुप्राप्ती नंतर विवाह करणें धर्मा विरुद्ध आहे. धर्माशी विरोध नाहीं अशा सुधारणा ह्मणजे स्त्रीशिक्षण वगैरे होय. ऋतुप्राप्ती नंतर विवाह, पुनर्विवाह, केशवपन निशेध इत्यादि धर्माविरुद्ध गोष्टीमध्यें देखील विरोध कमजास्त मानानें आढळतो.

वरील पांच प्रकारच्या वर्गीकरणांत सांगितलेल्या सुधारणा प्रचारांत आणण्याचें काम कमजास्त मानानें कठीण असतें. पायरी पायरीनें होणाऱ्या सुधारणा सहज होऊन जातात. कधीं कधीं तंटे पडतात पण केव्हां केव्हां त्या कशा होतात हें देखील कळण्यांत येत नाहीं.

पुण्याची ' सार्वजनिक सभा ' आणि तिची प्रतिस्पर्धी ' डेकन सभा ' या दोन्हीं संस्थांनीं दुष्काळा संबंधानें आपली कामगिरी उत्कृष्ठ बजावण्यास प्रारंभ केला आहे. महाराष्ट्रांतील लोकांच्या अडचणी व दुःखें काय काय आहेत यांचा चांगला तपास करून नंतर कळून आलेली लोक स्थिती सरकारास हुबेहुब कळविण्याचें श्रेय या दोन्ही संस्थाकडे आहे. दोन्ही सभांनीं सुचविलेले उपाय फार पोक्तपणाचे व दूरदर्शिपणाचे असून मुंबई सरकारानें त्या उपायांस आपली मान्यता दर्शविली आहे. हे उपाय इतर प्रांतिक सरकारांनीं देखील लक्ष्यांत घेण्यासारखे आहेत. उभय संस्थांचे उद्देश एकच आहेत पण स्वकीय मनोरथ सिद्धीस नेण्याचे विचार या सभांमध्यें भिन्न भिन्न कोठें पडतात आणि विशेषें करून राजकीय बाबदींत यांच्या लढाया केव्हां व कशा होतात हें पाहण्याकडे तटस्थ लोकांचें आस्थापूर्वक लक्ष्य लागलें आहे. दोन सभा पाहिजे होत्या किंवा नको होत्या हा प्रश्न हल्लीं राहिला नाहीं; पण सध्यां या आपलें कर्तव्य कसें बजावतात एवढाच प्रश्न आहे. स्पर्धा व अहमहमिका यामुळें अत्युत्तम लाभ होत असतो त्याप्रमाणें या सभा पासून खरोखर सार्वजनिक कार्यें चांगलीं होवोत आणि महाराष्ट्रांतील ज्ञानदीपाचा प्रकाश सर्वत्र आनंदप्रद होवो असें आह्मी इच्छितों.

राष्ट्रीय सभेला प्रतिकूलता दर्शविणारी एक मुसलमान लोकांची सभा मुंबईस भरली होती. सुमोर आडाचेंशें लोक सभेला गेले होते. येत्या राष्ट्रीय सभेचे लोकनियुक्त अध्यक्ष नामदार आर. एम सयानी हे होणार आहेत तेव्हां त्यांचा तेजोभंग करण्या साठीं हा सभेचा उत्पाद योजिला होता. नामदार सयानी यांस मुंबईच्या सभावाल्यानीं आपला मताश्रय दिला नाहीं तरी कांहीं नडत नव्हते. सूर्याला काजव्यानें प्रकाशाश्रय देत नाहीं असें म्हणण्यांतलाच हा वेडेपणाचा चाळा आहे. दुःखांत सुख एवढेच कीं सभेतल्या ठरावावरच स्वकीय कर्तव्य आटोपलें. असें वाटून मुंबईच्या सभावाल्यांस समाधान झालें.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBE 30 1896

Famine is less severe now than when it will be towards the close of the winter season. There is at present field-labour open to agriculturists and day—labourers. But when the winter-crops are over by the end of Phalgun we shall have to face scarcity in the most severe form. The beginnings are so intensely felt that we are at a loss to know what is in store for the Indian ryots. The present out-look is gloomy and dismal. The welcome rains have to a slight degree, brightened our prospect but as it does not rain well enough, we can hardly expect a good return out of it.

Since Mr. T. C. Plowden's visit to Berar, rumour has been pregnant with large schemes of measures of famine—relief. There is however no official declaration and public mind is in suspense as to what relief people should expect at the hands of the British Government. In these days of distress and severity it is only the Governmental help that will avert the danger. Private charity and benevolence are very good in fact, but they will hardly go a long way to enable people to face boldly the deadly foe. The masses are gradually sinking to depths of poverty and starvation. The poorer classes are pulling on with life at the loss of their dearest things in life. Relief should, if it come at all, reach them before they are desperate and hopeless of life. It is a high time now that people should learn where and how they will find a field for their labour and will earn their bread therein.

The crop-reports are not satisfactory. The autumn crops have failed immensely and the winter—crops we cannot expect unless it rains in profuse showers. The failure of crops of food—stuffs directs our attention to the grain—stock in hand in the province. It is depleted by large exports to stations out—side the province. The difficulty is how to retain it where it is wanted in stern reality. The present arrangements will have to continue because there is the principle of Free—trade as our greatest guide. The Government is afraid that the least interference will disturb and dislocate trade, the fact is true to a certain extent. There is also another danger to our food—supplies, when the Government will demand its revenue, people will have to sell their grain stocks to pay off the land—tax. It is higly necessary to proclaim suspensions and remissions of the land—revenue when there is a real failure of crops either total or partial. From such measures people will find ample means to afford a helping hand to their distressed neighbours. Besides there is the difficulty of paying the land—tax according to the new rates. The new assessments press very hard against the purse of the poor ryot and the experiences of famine will teach the Government to lessen the weight and rigour of their demands. The Berar administration is rich with a balance of some forty-lacs of Rupees to its credit in the hands of the paramount Government and it is therefore most natural to expect that the land—tax will be suspended or remitted in a liberal and generous manner.

Relief-works is the prime necessity of the long period to come. The minor works of the District Boards will afford a relief though not a sufficient and continuous one. Large works of feeder railways will have to be opened, The project of the Akola—Hingoli Railway was reserved or rather shelved for want of an opportune famine. We think that the the time has come for it. Let us hope that the British Government will save life with their cordial measures of relief.

Famine has brought to a stand-still all other public activities. Our political and social progress is rather retarded and even the Congress movements have received a lull all over the country. The 12th sessions will commence in the last week of the next month and we are most anxious to learn of a general awakening of the public spirit. Famine will no doubt occupy a prominent place in the deliberations of the Council and it is therefore most imperative that the next Congress should be a complete success like its preceding sessions. The present warfare in the politial arena promises a good return in the long run and we shall have to show to the world that in our worst extremes we cannot put aside our political battle—fields. Those of our countrymen who have means and ability to further the pro—gramme of the next Congress will have to prove the inward patriotic mettle of which they are made. The real springs of action in these matters is a noble wish to do our duty to our country. It is a pleasant thing to hope that we are worthy sons of our fore—fathers who founded this Indian nation hoary with age and the perfections of science, art and literature.

The Pioneer has a recently contributed to important articles in connection with the Berar administration. The Berar public value then more because they proceed from unexpected quarters. The main argument is against the highly expensive administration. There are no two opinions as to the most costly system of Government in Berar. The Berar administration, excels in point of expenditure all other local Governments in the

whole of India. Such heavy expenses are defrayed out of the people's purse. If taxation in India has reached its maximum it has done so in Berar to a double extent. Under these circumstances we feign to justify the growing demands of the revenue department. As a matter of fact expenditure knows no bounds and to meet it the people are being taxed to higher and higher degree. We quote below the closing remarks of the Pioneer on the effect of the treaty of 1860 with the Nizam.--

"The material benefits to the Nizam from this new treaty were (1) the restoration of the districts in the Raichore Doab yielding about 12 lakhs of rupees, (2) the gift of the Shorapore State—worth about Rs. 50,000 per annum, and (3) the cancelment of the debt of about 50 lakhs. As a matter of fact Colonel Davidson had shown that this debt did not really exist, and therefore its cancelment was only a piece of justice. In addition there was a promise of a surplus which however, at the time, the Government of India did not think was likely to occor, and the the guarantee that the Berars should be held in trust for the Nizam, and in the event of the Contingent being abandoned that they should be returned to him intact. All that the Nizsm gave up were some small districts on the left side of the Godavery. On the whole the treaty was advantageous to the Nizam, and would have been still more so, if the tacit understanding as to the cost of Administration had been adhered to. If the Berar Administration cost only 25 per cent of the gross revenue and if the expenses of the Contingent and Public Works had been confined to the figures of 1860, there should now be an annual surplus to the Nizam of about fifty lakhs of rupees. As a matter of fact however the actual surplus handed over averages only about 10 lakhs. Under the circumstances we are surely justified in asking why instead of $12\frac{1}{2}$ per cent, or even 25 per cent, we are now spending nearly 50 per cent of the revenues of the Province upon its administration.

But we confess we do not agree with the Pioneer when the learned editor opines that in the interests of the public and for political reasons this 'Garden of the Deccon' cannot with propriety be handed over to H. H. the Nizam. To our plain mind, this means a case of a breach of trust and a want of fair and honest conduct.

---

The Educational report of the last year is as usual full of interesting and instructive suggestions on the present short—comings of the machinery at work throughout the province. With regard to village schools Rao Sahib Patwardhan holds that few schools are started on the right principal and therefore unwilling to promote them on the present footing. Instruction in village schools ought to be according to the Government standards and the grants—in—aid should be a great stimulus to their continuance. Mr. Bullock has made a very pertinent observation on this subject and we think that it deserves a wide and attentive perusal. He remarks:—

"Looking back three years earlier than 1892—93, I find that in 1889—90 the number of indigenous schools was 536 and the attendance was 10,049, and that in three years the number of aided private schools had risen from 430 to 617, and in the following three years they have receded to 419. It would appear, therefore, that there is something more than the increase and decrease of prosperity to which the Director attributes the rise and fall of these schools. In 1887-88 the rates of fees charged in Government schools were enhanced, and the grant-in-aid rules were made more liberal with a view to encourage private enterprise. The result of this action was to stimulate the indigenous agency to such an extent that the number of aided schools rose from 244 in 1886-87 to 617 in 1892-93, and they have now fallen to 419.

It was perhaps, therefore, only natural that the special impetus imparted to private schools by the liberal rules of 1887-88 should have a period of re-action, and this no doubt is the real cause of the decrease both in schools and pupils. But if this be the correct explanation of the considerable falling-off shown in the past three years, it is perhaps possible to find a remedy. It is no doubt due to a want of system and thoroughness in the management of the indigenous schools that they have become less popular, and perhaps a comparison of the education received at these schools with that given at Government schools has led to their abandonment; but if this is the case, it is the duty of the Educational Department to find the means of improving them and restoring them to favor, and I think that Mr. Patwardhan's attention should be devoted to the necessity of taking special measures to the improvement of these schools and making them more popular. I would venture to lay stress on this point, because I think we are rapidly reaching the limit of expenditure on education which the Government and the District Boards can afford, while we have by no means satisfied the craving for it that the population has acquired owing to the encouragements hitherto given by our administration. A comparison of the expenditure on Government primary schools amounting to upwards of Rs. 2,00,000 for some 30,000 pupils with the grant-in-aid expenditure of Rs. 15,000 for about 10,000 pupils is sufficient to show the desirability from an economical point of view of encouraging indigenous schools, and I have therefore thought proper to draw the Resident's special attention to this falling off as being the most important feature of the report."

---

## वऱ्हाड

हवामान—पावसाचीं चिन्हें दूरावलीं असें वाटतें. पाऊस थोडा बहुत पडेल तर कांहीं निभाव लागेल. हवेचा दाब, पूर्व समुद्रांतील वादळें, हवेतील आद्रता वगैरे पावसाची आशा दाखवीत आहेत. ईश्वर करो आणि अमृत वृष्टी होवो. सार्वजनिक आरोग्य वाईट नाहीं.

रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. एक्स्ट्रा असि. कमिशनर यांची इलिचपुराहून आकोल्यास बदली झाली आणि इलिचपुरास त्यांच्या जागीं मि. क्रे. असि. कमिशनर यांस उमरावतीहून धाडण्यांत आलें.

मि. ए. सी. करी नांवाचे नवीन असि० कमिशनर उमरावतीस येत आहे नवीन भरती बाह्य प्रांतांतून होत आहे ही वाईट गोष्ट आहे.

आम्हांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं शेट मि. शापूरजी वीरजी एक्स्ट्रा असि. कमिशनर, दर्यापूर यांस एकाएकी मधुमेहाच्या विकारामुळें देवाज्ञा झाली. गृहस्थ बोलून गोड व जुना अनुभवलेला असा अधिकारी होता. मरणसमयीं त्यांचें वय ५० वर्षा वर होतें.

येथील ट्रेनिंग कालेजाच्या प्रिन्सिपालच्या जागीं रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे यांस अकोटाहून येथें बदलले आणि अकोल्याहून रा० रा० कृष्णराव मल्हार पैठणकर यांस त्यांच्या पूर्वस्थळीं ह्मणजे मलकापूरच्या इंग्लिश मराठी शाळेवर पाठविलें. मलकापुराहून रा० रा० पांडुरंगपंत लिमये यांस अकोटच्या इंग्रजी मराठी शाळेवर बदलण्यांत आलें.

मि. आबासख, हिंदुस्थानी शिक्षक नंबर २ ट्रेनिंग कालेज, आकोला, यांची बदली आकोटास हिंदुस्थानी शाळेचे हेड मास्तरचे जागीं झाली.

रा. रा. कृष्णराव हरी कोल्हटकर ए० असि० कमिशनर यांस एक वर्षाची फर्लो देण्यांत आली. मोठ्या आनंदाची गोष्ट कीं हल्लीं त्यांची प्रकृती चांगली दुरुस्त होत आहे.

मि० प्रीडो डेपुटी कमिशनर, अकोला यांची स्वारी गेल्या शनिवार पासून फिरण्यास निघाली असून बाळापूर तालुक्यांत आजकालचा मुक्काम होता.

काल दिवसा उमरावतीस 'वऱ्हाड सार्वजनिक' सभेच्या आश्रया खालीं एक छोटे खानी प्रांतिक सभा भरून खालील ठराव करण्यांत येणार होते. ह्या ठरावा वरूनच त्यांची अवश्यकता स्पष्टपणें कळून येईल:--

यंदा वेळेवर पाऊस न पडल्यामुळें पिकें बुडालीं व धान्याचे भाव फारच वाढले यामुळे सर्व प्रांतांत दुष्काळाचीं चिन्हें दिसत आहेत. सबब रिलिफ वर्कस (गरिब लोकांसाठीं मजुरीचीं कामें) सुरूं करणें, अनाथ व अशक्त लोकांना धर्मार्थ अन्न देणें, शेत साऱ्याची माफी अगर महकुबी मागणें, मजूर लोकांसाठीं व गुरांच्या रक्षणासाठीं जंगल संबंधीं सवलती मागणें वगैरे गोष्टीबद्दल सरकारास विनंती करण्याविषयीं विचार करणें.

२ जमीन धान्यासंबधानें विचार करणें

३ जंगला संबंधानें लोकांच्या अडचणी सरकारास कळविणें व जंगलखात्याचें नियमांत हिंदुस्थान सरकारचे ठरावा अन्वयें रयतेस फायदे कारक फेरफार करण्याविषयीं सरकाराकडे अर्ज करणें.

---

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९२ रुपये |
| जवारी | ९५ रु० |
| गहूं (कांठे) | १२० रु० |
| ,, (बनशी) | १३० रु० |
| चणे | ११० रु० |
| तेल ६।॥= रु० मण | तूप ७ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८७ |

---

### नोटीस

नोटीस बेशमी आत्माराम मनसाराम रंगारी राहणार नांदुरें यांस. वासुदेव ज्याननकीराम सोनार नांदुरें तालुके मलकापूर

नोटीस देतो ऐसाजे आपले उभयताचे शर्तीत मौजे खुदानपूर प्रगणें नांदुरें तालुके मलकापूर येथें जवारीचे पेव खंडी १२ चें भरलें आहे. त्या जवारीस हल्लीं भाव बराच ह्मणजे सुमारे १०० पर्यंत असले मुळें कळवितो कीं ती पेव आपण नोटीस पावताच ८ दिवसाचे आंत विकून टाकावी. बिलकूलच ठेवूं नये, न विकल्यास त्याचे नुकसानीचे जबाबदार तुह्मी राहाल.

आह्मी तुह्माजवळ रुपये ४ चा स्टांप कागद कोरा ठेविला आहे. तो आह्मी तुह्मांपाशीं मागितला तो दिला नाहीं तो परत द्यावा. कळावें तारीख २७ माहे नोवेंबर सन १८९६ इ.

(सही)

वासुदेव जानकीराम सोनार

दस्तुर खुद्द

---

### नोटीस.

मेहेरबान चेअरमन, सेक्रेटरी, व ट्रेझरर ऑफ "धी आकोला नेटिव्ह कॉटन जिनिंग प्रेसिंग अणि स्पिनिंग कंपनी." यांस—

केशरीमल रिदकरण साहू दुकान ज्याहनाबाद; बऱ्हाणपूर. अर्जदार इंडियन कंपनीज आक्ट नंबर ६ सन १८८२ चा कलम २९ अन्वयें. मी अर्ज करितों कीं वरील कंपनी बदरीनारायण धनराज मारवाडी दुकान आकोलें याच्या मालकीचे १६ सोळा शेर आहेत ते मी तारीख २४।१०।९६ रोजीं विकत घेतले आहेत तर मारुजा करितों कीं, ते सोळा शेर माझ्या नांवानें बदलून मेंबराचे रजिष्टरांत माझें नांव शेरीक करावें. ही विनंती. तारीख २९ माहे नोवेंबर सन १८९६ इ. मु॥ आकोले

सही

केशरमिल वल्लद रीदकरण

दस्कद कुलमुखत्यार मंगनीराम काछे

---

### नोटीस

मारुती वा। बापुजी ढोले कजबे बावनबीर तालुके जळगांव जिल्हा अकोले यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझी मुलगी गंधर्वानें केली ते वेळेस ता. २३ नवंबर सन १८९२ इसवी रोजी करारनामा लिहून दिला कीं तुमच्या मुलीची माझे कडून व बिरादर कडून वागणुकी बद्दल कांहीं हरकत झाल्यास तुमचे मुलीचे अंगावरील सर्व डागिने सहीत माझी फारकती न घेता तिजला कोठें ही उचलून द्यावे माझी कांहीं हरकत नाहीं असा करारनामा लिहून दिला असून तुमची आई व बहीण व भावजाई या त्री वर्गाकडून तुह्मी बळजबरीने डागिने काढून घेऊन तिजला काढून दिले. तिचे अंगांवरील डागिने काढले ते तपशीलवार.

(२४) गुंडाळ्या अजमासे, (१०) पोलट २ व पाटल्या २, (१२) साखळी अजमासें, (१६) कोपरवाळ्या अजमासे, (२४) बाळ्या ६ अजमासे, (१२) तांदळी पोत, (१६) नथ अजमासे, (४) आरसी बोटातील, (५) पुतळी अजमासे, (४०) तोडे अजमासे, (२) मणी. एकूण १६५ रु.

येणें प्रमाणें डागिनें काढून घेऊन तिजला काढून दिले त्यास सुमारे दोन वर्षे झाली ती माझे येथें आहे. आह्मी तीन चार वेळ तुमचे येथें आलो परंतु तुह्मी करारनाम्या प्रमाणें कोणतीच वर्तणुक केली नाहीं तेव्हां माझी गरीबी असल्यामुळें सावकाराचे कर्ज काढून तर तिजला पोसावें लागले व ही नोटीस देणें भाग पडले तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत वर लिहीलेले डागिनें व पोट खर्चीबद्दल रुपये ९६ व नोटिशीचा खर्च असे देऊन करारनाम्या प्रमाणें व्यवस्था करावी. नाहीं तर योग्य कोर्टांत दावा करून निकाल करूं. कळावें, तारीख २५ माहे नोवेंबर सन १८९६ इसवी.

[सही].

पंढरी वल्लद गरबड तराळे कुणबी कजबे वानखेड निशानी खुद्द हातची.

---

## वर्तमानसार.

बजबज ( कलकत्ता ) येथें एक हिंदु कुटुंब एवढें मोठें आहे कीं, त्यांत ७०० मनुष्य असून पुन्हां तीं तंटाबखेडा न करिता परस्पराशी मोठ्या प्रेमानें वागतात.

पारीसच्या पशु संग्रहालयांत कोणी एकानें चेष्टेनें बिड्या पेटवून माकडांस वाटल्या त्या त्यांणीं चांगल्या माणसा प्रमाणें ओढल्या !

अमेटस लुसीटेनस नांवाचे एक साहेब कळवितात कीं, एक गोसावी आहे त्याला गुलाबांचें फूल पाहिल्याबरोबर मूर्छा येते. दुसरी एक बाई आहे, तिला रेशमाचा व मखमालिचा स्पर्श होतांच देहभान राहत नाहीं. तिसरा एक पुरुष आहे, त्याला त्याची खोली खरुल झाडलेली पाहिली कीं भोंवळ येऊन तो खालीं कोसळलाच. आणखी एक मनुष्य आहे, तो तंतूवाद्याचा आवाज ऐकल्याबरोबर देहभान विसरतो ! ईश्वरी लीला.

धा. वृ.

एकदां आगगाडीच्या डब्यांत एक अतोनातांत उंच गृहस्थ आला असतां आंत बसलेल्या एक विनोदी गृहस्थानें आपल्या स्नेह्याजवळ हलकेच पण त्या उंच गृहस्थाला ऐकूं यईल अशा आवाजानें ह्मटलें, "भला थोरला उंटच दिसतो आहे." त्याबरोबर तो गृहस्थ शांतपणें त्याच्याकडे वळून ह्मणतो, "अहो. ही आगगाडी काय सगळ्यांचें मायपोट आहे! ती अमक्याला नेईल आणि अमक्याला टाकील असें नाहीं उंटाबरोबर गाढवांलासुद्धां नेतें !"

गांवाहून आलेला गृहस्थः—(दारांतच) अरे, माझ्या पश्चात् सगळीं पांखरं, मांजरं, कुत्रीं ठीक आहेतना ? सगळ्यांना वेळच्यावेळी खायाला घालीत होतासना ?

गडीः—हो. एकदां काय तो मांजराला खायला घालायला विसरलों.

गांवा०:—बरं मग, पण ते नीट आहेना?

गडीः—हो. हो. मीं घातलं नाहीं ह्मणून काय झालें? त्यानं जाऊन ती साळुंकी आणखी पोपट यांच्यावर झडप घातलीनच तेव्हां कुत्र्यानं त्याच्यावर घातलीन् आणखि मी संतापून त्या कुत्र्याला एक लाकडाचा टोला मारला.

करमणूक.

हिंदुस्थानच्या रुपयाची किंमत विलायतच्या बाजारांत वाढूं लागली आहे व त्यामुळें विलायतच्या व्यापारात गोंधळ होण्याचा संभव आहे अशी विलायतच्या लोकांची ओरड आहे.

हिंदुस्थानसरकारच्या छावण्यांत जे अनेक रोग सुरू होतात त्याचें एक कारण निर्भेळ दूध मिळत नाहीं हें आहे अशी ओरड आहे.

गेला गुरुवार तारीख (१९।११।९६) हा मोठा पुण्यवानं गेला त्या दिवशीं आकाश ढगानीं भरून गेलें व रात्रीं चहूंकडे कमी जास्त बराच पाऊस पडला. ठाणें मुंबईस पडल्यान कांहीं फायदा नाहीं, पण घाटावर दुष्काळाच्या प्रांतांत या पावसाने फार मोठा फायदा होईल. पेरलेली शेतें जीं वाळून चाललीं होतीं तीं चांगलीं जोरांत येतील, जेथें पेरणी झाली नव्हती तेथें आतां पेरणी होईल, पाण्याचा तोटा भरून निघेल व चाऱ्याच्या तोट्यानें जे हाल चालले होते तेही बरेच कमी होतील.

अ० द०

ईश्वराला अखेर तरी करुणा आली.—गेले गुरुवारी सोलापुरास उत्कृष्ट पाऊस पडला. असा या सबंद वर्षांत पडला नव्हता. त्या दिवशीं तिसरे प्रहरीं आकाशांत ढग येऊन किंचित् बारीक बारीक तुषार येऊं लागले, तथापि पावसाविषयीं कोणासही खात्री वाटली नाहीं. पुढें अस्तमानपासून तो बळावून पहांटच्या २ वाजेपर्यंत पडत होता. तो ९ इंच ३ सेंट झाला. कालही थोडा पाऊस पडला व आणखी पडण्याचीं चिन्हें आहेत. आतां गहूं व हरबरा यांच्या तर पेरण्या होतीलच, पण चांगल्या जमिनींत जोंधळ्याच्या देखील पेरण्यास लोकांना उमेद आली आहे. ज्यांनीं पर्जन्य नसतांना केवळ नशीबावर हवाला ठेऊन जमीनींत बी टाकलें होतें, त्यांना तर हा पर्जन्य ह्मणजे अमृतवृष्टीच झाली, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. यामुळें सध्यां लोकांच्या तोंडावर टवटवी आली आहें. हा पाऊस रायचूरपासून मुंबईपर्यंत झाल्याचें कळतें. त्यांत दक्षिणेच्या बाजूला जास्त आहे.

पाऊस पडतांच धारणेचें मान एकदम उतरलें. ज्वारीचा भाव हल्लीं ८ पासून ९।१० शेर पर्यंत आहे. तसेंच चांगली ज्वारी बाजारांत नुस्ती दृष्टीही पडत नसे, ती घ्या घ्या ह्मणून व्यापारी लोक आतां पाठीं लागत आहेत.

दुष्काळामुळें उठून चाललेले लोक पाऊस पडल्याचें पाहून वाटेंतूनच मागें परतु लागले आहेत.

या आठवड्यांत मद्रासकडे, महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत, कर्नाटकांत व आग्रा वगैरेकडे पाऊस पडला,

नगरचे सिटी पोष्ट मास्तर मि. शर्नी यांस सेव्हिंग ब्यांकेंतले पैसे खाल्याबद्दल ९ वर्षे कैद व १००० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

बडोद्यास खाशांचे गाडीकरितां अठ्ठाचाळीस हजारांच्या किंमतीचे चार घोडे विलायतेहून मागविले आहेत.

क० त०

आग लावण्याचें भयंकर कृत्य—मनुष्याच्या मनांत एकदां पापवासना उत्पन्न झाली ह्मणजे ती तडीस नेण्याकरितां तो काय करील आणि काय न करील याचा नेम नाहीं. मुंबई येथें ता० १ नोव्हेंबर रोजीं कुलाब्यावरील निकल प्रेसला आग लागून सुमारें २० लक्ष रुपये किंमतीचा कापूस जळून भस्म झाला ही बातमी पूर्वीच प्रसिद्ध झाली आहे. ही आग जयसिंग नांवाच्या परदेशानें लाविली असें आतां उघडकीस आलें आहे. हें कृत्य त्यानें खिरजी शिरपाल नांवाच्या गुजराथ्याच्या सल्ल्यानें व आणखी दोघां मजुरांच्या साहाय्यानें केलें. त्यानें त्या वखारींतील कापसाचे ८ गठ्ठे बाहेर काढून व दोन खटाऱ्यांमध्यें भरून दुसरेकडे पाठविले व आपण त्या प्रेसमध्यें शिरला. नंतर बाहेर येऊन कांहीं वेळानें त्या वखारींतून धूर येत आहे कीं नाहीं अशी चौकशी करण्याकरितां यानें आपले साथ्यांस पाठविलें. चोरलेले गठ्ठे दुसऱ्या एका वखारींत ठेवीत असतां त्यावरील खुणांवरून तेथील मोकदमाला संशय आला. मोकदमानें ती गोष्ट पोलिसाच्या कानांवर घातली व चौकशी अंतीं सर्व वर्तमान बाहेर पडलें. हा खटला मुंबई येथील सेशन कोर्टांत कमिट झाला आहे.

नागपूर—गेल्या आठवड्यांत आकाश बहुधा साभ्र होतें तथापि पर्जन्य पडेलच अशीं कोणास खातरी वाटत नव्हती. परंतु ईश्वरास गरीबांची दया येऊन गेल्या शनिवारीं रात्रीं सुमारें १२ वाजल्यापासून बारीक पर्जन्य पडण्यास आरंभ झाला तो तसाच सूर्योदय होईपर्यंत पडत होता. रविवारीं दिवसा व रात्रीं थोडा पाऊस पडला. आज प्रातःकाळपासून ही पर्जन्य पडत आहे. ह्या वृष्टीपासून रबीचे पिकास फारच उपयोग होईल. ह्या वृष्टीनें दुष्काळाचा जोर कमी होईल. सर्व लोकांचीं मुखें आनंदानें प्रफुल्लित झाली आहेत. अशा वेळीं फायदा मिळविणाऱ्या बनियांस मात्र फार वाईट वाटेल. इतक्यांतच धान्याचे भाव उतरले. गहूं १ रुपयास १० शेर ( ८ पायली ); ज्वारी १२॥ शेर; तांदुळ ८॥। शेर मिळूं लागले आहेत धान्य याहूनही सवंग होण्याचा संभव आहे.

पर्जन्य पडला एवढ्यांवरच दुष्काळ निवारणार्थ जीं कामें चालू आहेत तीं इतक्यांतच बंद करण्याची वेळ आली नाहीं. तसें केल्यास शेंकडों मनुष्यें उपाशी मरतील.

भंग्यावरील मुकादमाची संपत्ति—जीवा जेसा नांवाच्या एका भंग्याचे मुकदमाजवळ येथील डिटेक्टिव्ह पोलिसास १२८२८ रुपयांचे जवाहीर वगैरे सामान मिळाल्यामुळें त्यांना तें चोरीचे किंवा लबाडीनें मिळविले ले वाटून त्यांनीं त्याजवर मि० हेमिलटन यांचे पुढें फिर्याद केली. परंतु त्यानें ते सर्व पैसे सावकारी धंद्यावर मिळविल्याबद्दल पोलिसची खात्री झाल्यावरून त्यांनीं आपली फिर्याद काढून घेतील.

बँक नोटीवरील गुप्त खुणा वेळोवेळीं बदलण्यांत येतात, कारण अशा योगानें बनावट नोटा तावडतोब ओळखण्यात येतात.

सिकंदराबाद येथें पुष्कळ पुढारी व्यापाऱ्यांनीं शपथा घेऊन असा ठराव केला आहे कीं दुष्काळ चालूं आहे तेथपर्यंत तेथें गरीबांना खरेदीच्याच दरानें आपण धान्य विकूं.

मि० नारायणदास पुरुषोत्तमदास व मि० गोविंदजी ठाकरसी मूलजी ह्यांनी बॉम्बे ट्रेडिंग कंपनीच्या वतीनें ५०,००० खंडी परदेशीय धान्य खरेदी करण्याची व्यवस्था केली आहे असें समजतें. ऑ० मि० बाफर्ट, मि. एल. आर. डब्ल्यू. फॉरेस्ट, मिसेस सासून वगैरे मंडळीनें सदहू कंपनीचे डायरेक्टर होण्याचें कबूल केले आहे. अमेरिकेमध्यें ५००० टन गहूं, बाजरी वगैरे धान्य आणण्याबद्दल मागण्या रवाना झाल्याच आहेत आणि तुर्कस्थान व एशियाखंडातल्या इतर देशांमधून जानेवारी महिन्यांत सुमारें २०,००० टन धान्य मुंबईस येऊन पोंचेल असा अजमास आहे. कंपनीचे प्रसिद्धी पत्रकामध्यें कंपनी स्थापन करण्याचे उद्देश सांगतांना धान्याच्या व्यापाराची सांप्रतची स्थिति, शेतांची बूड, धारणेची चढ व सरकारची प्रत्यक्ष व्यापार न करण्याची इच्छा या गोष्टींचें सविस्तर विवेचन केलेलें असून कंपनीचें भांडवल एकंदर पंधरा लाखांचें दर्शविलें आहे. भांडवलाचे १०० रुपयांचा एक असे १५,००० भाग केले आहेत आणि मुदत दोन वर्षांची ठेविली आहे. दोन वर्षांचे अखेरीस कंपनी मोडावयाची असें ठरलें आहे. कंपनीच्या प्रसिद्धीपत्रकांतील पुढें दिलेल्या उताऱ्यावरून कंपनीचें काम कोणत्या धोरणानें चालेल ते स्पष्ट कळण्यासारखें आहे थोड्याशा चढत्या परंतु फार फाजील नव्हे अशा भावानें लोकांना पुरेसा धान्याचा पुरवठा व्हावा या दिशेनें मुख्यतः प्रयत्न झाले पाहिजेत. इष्ट त्या सर्व ठिकाणीं खरेदी केल्यानें व परदेशांतून लागेल तितके धान्य आणिल्यानें इलाख्यांतल्या बाजारावर कंपनीच्या प्रयत्नांचा परिणाम घडेल आणि सांप्रत असाधरण रीतीनें जे भाव वाढत आहेत त्यांना प्रतिबंध होईल अशी आशा वाटत आहे. व्यापारांत नफा मिळविणें हा कांहीं या कंपनीचा उद्देश नाहीं. ती नफ्याकडे दृष्टी न देतां फक्त औदार्य प्रगट करण्याचे सदिच्छेनें निघाली आहे.—ह्या कंपनीचे कांहीं भाग घेण्याबद्दल मद्रासेहूनही कांहीं अर्ज मेसर्स नारायणदास व गोविंदजी यांजकडे आले असल्याचे समजतें. ह्या कंपनीला यश येऊन गरीब लोकांची पीडा कांहीं तरी कमी होवो. असें आह्मी इच्छितों.

न्या० सु०

इंग्लंड व राशिया यांचें सख्य व्हावें अशी इच्छा असेल तर रशियास काळ्या समुद्रात स्वेच्छाचार करण्यास मोकळीक देऊन पासिफिक सागरांत एक चांगले बंदर मिळाले पाहिजे असें रशियन पत्रांचें ह्मणणें आहे.

फौजेची तयारी फार चांगली पाहिजे व त्या कामांत निष्काळजी राहाणें चांगलें नव्हे असे बडे इंग्रज लार्ड लॅन्सडौन ह्मणतात.

ठा. अ.


## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent


☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.